यातनामय करीत आहेत!''

''अरुंधतीताई, मला वाटतं, तुमच्या अपमृत्यूच्या प्रश्नाचं समाधान यात आलं आहे! वर दिलेल्या कारणाखेरीज व्यक्तीची पूर्वकर्मंही त्याच्या अपमृत्यूला कारणीभूत ठरत असतातच!''

''आता तुमचा दुसरा प्रश्न– एकाच वेळी अनेक माणसं मृत्युमुखी का पडतात?''

''अरुंधतीताई, तुम्हाला जीवमात्रांविषयी एवढं प्रेम वाटत असेल तर तुमच्या घरात मुंग्यांची रांग लागल्यावर तुम्ही 'हीट'चा किंवा 'बेगॉन'चा स्प्रे उडवून एकाच वेळी असंख्य मुंग्यांना मृत्युमुखी का देता? असा प्रश्न तुम्हाला मुंग्यांनी विचारला तर? तुम्ही म्हणाल, त्या मुंग्यांना माझ्या घरात यायची गरजच काय? अशावेळी मुंग्या म्हणतील, बाई, ही पृथ्वी काय तुम्हा माणसांच्या तीर्थरूपांना परमेश्वरानं आंदण दिली होती? यावर तुमच्याकडेच काय, कुणाकडेही उत्तर नसेल. कारण हे जग आणि त्याची भूमी, त्यावर राहणाऱ्या प्रत्येक जीवमात्राच्या मालकीची आहेही आणि नाहीही! कारण मालकीची म्हटली तरी कधीतरी त्याला या भूमीचा त्याग करावाच लागतो! आणि मालकीची नाही म्हटली तरी प्रत्येक जीवमात्राच्या शारीरिक अस्तित्वाला ही भूमीच जन्म देते, पोसते आणि वाढवीत असते! मग या भूमीशी जीवमात्राचं कायमचं नातं कोणतं? साक्षीत्वाचं! होय, आपण फक्त साक्षीदाराच्या भूमिकेतूनच या भूमीशी कायमचं नातं ठेवू शकतो! बाकी सगळी नाती उपरी आणि तात्पुरती असतात.''

''पण बहुसंख्य प्राणीमात्र नेमकं हेच विसरतात. ही भूमी, त्यावरील व्यक्ती आणि वस्तूंशी वेगवेगळ्या भूमिकांतून नाती जोडतात. त्याविषयी स्मृती तयार करतात आणि या भ्रामक स्मृतींची नोंद अवकाशातील आकाशिक रेकॉर्डमध्ये होत राहते. हे स्मृतीरूपी विचारसमूह अवकाशातील विद्युत संयुगांवर मळभ आणून त्या संयुगांतील सृजनता बधीर अथवा विकृत करतात. सृजनताच बधीर झाली तर अणूरेणूतील चेतनेचा स्त्रोत खंडीत होऊन विश्वाच्या एकेक भागाचे रूपांतर 'ब्लॅक होल' (कृष्ण विवर) मध्ये होईल!''

''असं होऊ नये म्हणून ह्या स्मृतींच्या संख्येवर नियंत्रण ठेवावं लागतं. आकाशिक रेकॉर्डमध्ये स्मृतींवर नियंत्रण ठेवणारं जे केंद्रस्थान आहे त्या केंद्रस्थानास हिंदू धर्म 'महामाता चंडिका देवी' असं म्हणतो. स्मृतींची संख्या वाढू लागली तर ती कमी करण्यासाठी जिवंत शरीरं मृत करावी लागतात. कारण जिवंत व्यक्तीच आपल्या कर्मानं स्मृतींच्या संख्येत भर घालीत असतात. तेव्हा स्मृतींची संख्या अनियंत्रित होऊ लागली की ती नियंत्रणात आणण्यासाठी एकाच वेळी असंख्य जीव मृत्युमुखात जातात! त्यात माणसंही एकाच वेळी असंख्येने मरतात यास आश्चर्य कसले?''

''असे सामूहिक मृत्यू होऊ नयेत असं वाटत असेल तर प्रत्येक व्यक्तीनं अनावश्यक घटनाक्रमांना जन्म देऊन स्मृती वाढवू नयेत!''

आपला नम्र
साईसेवक **श्रुतनाथ**

## श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच!



'श्री साईलीला'च्या वाचकांना स्मरतच असेल की संमेलन विशेषांकात 'जे न बोलायचे....' या सदरात 'बाबांची शिकवण' या शीर्षकांतर्गत प्रसिद्ध झालेल्या लेखात म्हटले होते की.... आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. पण शिवाजी पार्कवर ज्या पादुकांचे आगमन होणार आहे त्या पादुकांच्या प्रतिमा नसून साक्षात् श्री साईबाबांनी वापरलेली ती प्रत्यक्ष पवित्र पादत्राणं आहेत....

आता श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

# प्राचीन भारतीय साहित्य

(मागील अंकावरून)

**चंपुकाव्य:** संस्कृत साहित्यात चंपु म्हणजे गद्य-पद्यात्मक काव्य, यासही विशेष स्थान आहे. पंडित त्रिविक्रमभट्टाने ९१५ इ.स.च्या दरम्यान नलचंपु नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यानंतर पंडित सोमदेवाने यशस्तिकल या नावाचे उत्कृष्ट काव्य तयार केले. मालवसम्राट राजा भोज याने चंपुरामायण या ग्रंथाची रचना केली. त्याच्याकडून केवळ पाचच कांडे लिहिली गेली.

**नाटक:** प्राचीन भारतात वेदपूर्व काळापासून नाटक हा प्रकार चालत आलेला दिसतो. काही लिखीत नाटक, काही अलिखीत नाटके असे यांचे दोन भाग दिसतात. अलिखीत नाटके ही पितृपरंपरेने– पाठांतराने खेळली जात असत. तर लिखीत नाटके ताडपत्रावर कोरली जात असत. नाटक करण्याविषयीचे नियमही ग्रंथित केलेले दिसतात. व्याकरणकार पाणिनी (६ वे शतक) यानें शिलाली व कृषाश्व यांच्या नटसुत्रांची नावेही दिलेली दिसतात. ६ व्या शतकानंतर भरत मुनिंनी नाट्यशास्त्र ग्रंथ लिहिला. भास, कालीदास, अश्वघोष यांनी भरत मुनिंच्या नाट्यशास्त्रास आधारभूत मानून नाटकांचे लेखन केलेले दिसते. महाराजा शुद्रक याने लिहिलेले मृच्छकटिकम् हे नाटक अत्यंत उच्च कोटीचे नाटक दिसते. या नाटकात जीव, जीवन, शक्ति आणि कर्मव्यता या भावांना नितांत सुंदर रूपाने रंगविलेल्या आहेत. स्थानेश्वर किंवा कन्नोज येथील राजा सम्राट श्रीहर्षवर्धन याने रत्नावली आणि प्रियदर्शिका ही दोन नाटकें प्रथम लिहीली. या दोन्हीत (दोनहीत) पात्रांचे चरित्र चित्रण तथा वस्तुविन्यास अत्यंत उत्तमतेने रंगविले आहे.

याचे तिसरे नाटक नागनंद. या नाटकाची प्रशंसा जगभरातील सर्व विद्वान् आजही करताना दिसतात. नाटककार भवभूती (८ वे शतक) हा विदर्भातला राहणारा असून एक अनाथ ब्राह्मण कुमार होता. यांनी आपले साहित्य म्हणजे नाटक काव्य इत्यादि. अग्निस अर्पण केले. त्यामुळे याचे साहित्य कमीतकमी उपलब्ध दिसते. उपलब्ध साहित्यात मालती-माधवम्, महावीरचरितम् आणि उत्तररामचरितम् अशी तीन नाटके दिसतात. मालती-माधवम्मध्ये शृंगाररस, महावीरचरितम्मध्ये वीररस, उत्तररामचरितम्मध्ये करूणरस अशा वेगवेगळ्या रसांचा उत्कर्ष महाकवि भवभुतीने केलेला दिसतो. करूणरसाच्या प्रदर्शनामध्ये भवभुती सर्वाधिक महत्त्वाचा ठरतो. याची कल्पनाशक्ति अनाकलनीय तथा प्रशंसनीय आहे. खुप लांब-लांब मोठी वाक्ये या नाटकात असल्याने याची नाटके रंगभूमीसाठी फारशी चांगली मानली जात नाहीत. जसे की भास, कालीदास यांची नाटके मानली जातात. पंडित भट्टनारायणाने लिहिलेले 'वेणीसंहार' हे एक उत्तम नाटक आहे. यात महाभारतातील युद्धाचे वर्णन आहे. वीररस हा या नाटकाचा मुख्य गाभा आहे. पंडित विशाखदत्त (८ वे शतक) याने लिहिलेले 'मुद्राराक्षसम्' हे एक अनमोल नाटक आहे. राजनीती, धर्मनीती, दंडनीती, नीतीशास्त्र यांचे उत्कृष्ट असे हे सम्मिलीत उदाहरण आहे. कनोज प्रांताचा राजा महेंद्रपाल आणि सम्राट महिपाल यांच्यासह राहणारा पंडित राजशेखर हा संस्कृत आणि प्राकृत या दोनही भाषांचा प्रकांड पंडित होता. याने आपल्या नाटकात नव्या नव्या छंदांची रचना केली. सुभाषिते आणि म्हणी यांचाही प्रयोग याने नाटकात केला. याने बालरामायण आणि बालभारत या नावांची नाटके आणि विद्धशास्त्रभंजिका (विद्धशास्त्रभंजिका) नावाची एक हास्यरसपूर्ण नाटीका लिहिली. महाकवि दामोदराने हनुमन नाटक किंवा महानाटक हा नाटकग्रंथ लिहिला. या ग्रंथाला नाटक म्हणण्यापेक्षा काव्य म्हणावे लागेल. कृष्णमिश्रकवि (११ वे शतक) याने 'प्रबोध चंद्रोदय' या नावाचे एक अतिउत्कृष्ट नाटक लिहिले. हे अलंकारात्मक आणि भावात्मक नाटक ऐतिहासिक दृष्टीने अतीव महत्त्वाचे आहे. या नाटकात शांती, क्षमा, काम, लोभ, क्रोध, दंभ, अहंकार, अविद्या, मिथ्यादृष्टी, भ्रांती, अवधान अशा नावाची पात्रें आहेत. याव्यतिरिक्त उपलब्ध असलेल्या नाटकात– मुरारीकृत अनर्घराघव, बिल्हणरचित कर्णसुंदरी (नाटीका) चंदेलराजा परमर्दिदेव याचा मंत्री पंडित वत्सराजकृत किरातार्जुनियम् (व्यायोग) कर्पुरचरितम् (भाण) रूक्मिणी परिणयम् (इहामृग) त्रिपुरदाह (डिम) हास्यचुडामणि (प्रहसन) आणि समुद्रमंथनम् (समवकार) ही सहा रूपके प्रसिद्ध आहेत. चौहान राजा विग्रहराजरचित हरकेली नाटक', सोमेश्वरविरचित 'ललित विग्रहराज नाटक' परमार राजा धारवर्मा बंधु प्रल्हाददेव यांचेही पार्थपराक्रमम् (व्यायोग) अशी कितीतरी नाटके सांगता येतील.

## ध्वनी अलंकारादि साहित्यिक अंगे

ध्वनी, अलंकार, रस आदि साहित्याच्या उपयुक्त अंगांवर कित्येक ग्रंथ लिहिलेले दिसतात. श्री मम्मटाचार्यांनी 'काव्यप्रकाश' लिहिला. आचार्यांना हा ग्रंथ पूर्ण करता आला नाही, तत्पूर्वी त्यांचे देहावसान झाले. म्हणून त्यांचा शिष्य श्री अल्लटाचार्य (अलखाचार्य) सूरि यांनी पूर्ण केला. गोवर्धनाचार्यांनी 'ध्वन्यालोक', भामहाचार्यांनी 'अलंकारशास्त्र', राजशेखरकृत 'काव्यमीमांसा', हेमचंद्ररचित 'काव्यानुशासन', वाग्भटलिखित 'वाग्भटालंकार' आणि 'काव्यानुशासन', उद्भटरचित 'काव्यालंकार संग्रह', रूद्रटाचा 'काव्यालंकार-संग्रह', राजा भोजरचित 'सरस्वती कंठाभरणम्' हे विशेष ग्रंथ आहेत. छंदशास्त्र हा वेदाचा एक भाग (अंश) समजला जातो. यावरही अनेक ग्रंथ लिहिलेले दिसतात. पिंगलाचार्यांचा 'पिंगल-छंदसूत्र', दामोदर पंडिताचा 'वाणिभूषण', हेमचंद्रकृत 'छंदोऽनुशासन' तथा क्षेमेंद्रकृत 'सुवृत्त तिलक' असे काही

उल्लेखनीय ग्रंथ दिसतात.

**व्याकरण :**

वेदांच्या सहा अंगांपैकी व्याकरण हे प्रथम तथा प्रधान अंग समजले जाते. ६ व्या शतकापर्यंत व्याकरण खूपच उन्नत अवस्थेत पोहोचले होते. पाणिनींच्या अष्टाध्यायीवर कात्यायन तथा पतंजली यांनी 'वार्तिक' तथा 'महाभाष्य' लिहिलेले आहे. पंडित सर्वशर्मा यांनी प्रारंभिक विद्यार्थ्यांसाठी 'कातंत्र व्याकरण' लिहिले. यावर सात वेगवेगळ्या टीका तयार झाल्या. साहित्यशास्त्रात व्याकरणास विशेष महत्त्व असते. भारतात वेगवेगळ्या काळातील साहित्याच्या विकासानुसार व्याकरणाचाही विकास झालेला आहे. व्याकरण हा विषय समजल्याशिवाय पांडित्य येत नाही. म्हणून प्रकाण्ड विद्वान होण्यासाठी व्याकरण येणे आवश्यक आहे. त्यामुळे व्याकरणास्त्रावर अनेकानेक ग्रंथ उत्पन्न झालेले आपणास दिसतात. सन ६६२ मध्ये पंडित जयादित्य आणि पंडित वामन यांनी 'काशिकावृत्ति' नावाचे भाष्य पाणिनीच्या व्याकरणसूत्रांवर केले. हे भाष्य अत्यंत उपयुक्त आहे. भर्तृहरिने भाषाशास्त्राच्या दृष्टीने व्याकरणावर 'वाक्य प्रदीप' नामक बृहद्ग्रंथ तथा 'महाभाष्य दीपिका' आणि 'महाभाष्य त्रिपदी' व्याख्यान नामक ग्रंथ लिहिले. उण नावाच्या पंडिताने 'उणादिसूत्र' या ग्रंथाची निर्मिती केली. यावर १२५० साली पंडित उज्वलदत्ताने टीका लिहिली. पाणिनीच्या अष्टाध्यायीवर अनेक ग्रंथ बनले. त्याव्यतिरिक्त अनेक स्वतंत्र असे ग्रंथ व्याकरणावर लिहिले गेलेले दिसतात. पंडित चंद्रगोमिन याने ६ व्या शतकाच्यापूर्वी 'चांद्र व्याकरण' नावाचा ग्रंथ लिहिला यात काही ठिकाणी पाणिनीच्या व्याकरणाचा तथा पतंजलीकृत 'महाभाष्य' याचाही उपयोग केलेला दिसतो. जैन पंडित शाकटायन याने ९ व्या शतकात एक ग्रंथ व्याकरणशास्त्रावर लिहिला. प्रसिद्ध जैन आचार्य हेमचंद्र याने गुजरातचा राजा सिद्धराज याची स्मृति ठेवण्यासाठी म्हणजे स्मृतिप्रीत्यर्थ, शाकटायनाच्या व्याकरणापेक्षा विस्तृत 'सिद्धहेम' नामक व्याकरण ग्रंथ लिहिला. यात वैदिक भाषेच्या संबंधातील नियम दिसत नाहीत म्हणून यास जैन व्याकरण असेही म्हणतात.

वर उल्लेखिलेल्या व्याकरण ग्रंथांव्यतिरिक्त अनेक छोटे-मोठे ग्रंथ उत्पन्न झालेले दिसतात. पंडित वर्धमानप्रणित 'गण रत्न महादधि', पंडित भासर्वज्ञकृत 'गणकारिका', पंडित वामनविरचित 'लिंगानुशासन', पंडित हेमचंद्रलिखित 'उणादि सूत्रावली', 'धातुपाठ', 'धातु पारायण', 'धातुमाला', 'शब्दानुशासन' इत्यादि.

**कोष :**

जसजसे शब्दभांडार वाढत गेले तसतसे 'कोष' बनत गेले. काही नामकोषात एका नामाचे सर्व पर्यायवाची शब्द एकत्र केलेले दिसतात तर काही कोषात एका शब्दाचे सर्व अर्थ एकत्र दिलेले असतात. अशांना शब्दकोष म्हणतात. शब्दांचे लिंगही बऱ्याच नाम-शब्दकोषात दिलेले दिसतात. पंडित अमरसिंहाने लिहिलेला 'अमरकोष' अतिप्रसिद्ध आहे, यावर पन्नासहून अधिक टीका लिहिल्या गेल्या. पैकी १०५० सनात भट्ट क्षीरस्वामी या पंडिताने लिहिलेली टीका सुंदर आहे. पुरुषोत्तमदेव पंडिताने 'त्रिकाण्डशेष' या नावाचे एक परिशिष्ट अमर कोषावर लिहिले. हा उपयुक्तकोष आहे. यात बौद्ध, संस्कृत, प्राकृत अशा अनेक भाषेतील शब्द एकत्रित दिलेले आहेत. याच लेखकाने 'हारावलि' नावाचा आणखी एक ग्रंथ लिहिला ज्यात या पूर्वीच्या ग्रंथात समाविष्ट नसलेले अनेक कठिण शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. शाश्वतपंडिताने 'अनेकार्थ समुच्चय' या नावाचा एक कोष लिहिला. ९५० ईस्वीत पंडित हलायुध याने 'अभिधानरत्नमाला' हा कोष लिहिला. यात एकूण ९०० श्लोक आहेत. दक्षिणी विद्वान् यादवभट्टाचा 'वैजयंतिकोष', यांत शब्द, अक्षरांची संख्या तथा लिंगासह अकारादि क्रमानुसार लिहिलेले दिसतात. याव्यतिरिक्त धनंजयकृत नाममाला, महेश्वर विनिर्मित विश्वप्रकाश, मंखकविरचित अनेकार्थकोष असे बरेच कोष दिसतात.

पंडित हेमचंद्राचा अभिधान चिंतामणिकोष हाही विशेष महत्त्वाचा कोष आहे. या कोषाच्या परिशिष्टात त्याने वनस्पतिशास्त्राच्या संबंधिच्या शब्दांचा ३९६ श्लोकांचा 'निघण्टुकोष' लिहिला. याने अनेकार्थ संग्रह हा कोषही लिहिला. १२व्या शतकात पंडित केशवस्वामी याने 'नानार्थ संकल्प' नावाचाही कोष लिहिलेला दिसतो.

## प्राचीन भारतीय भाषा

**या**पूर्वी आपण संस्कृत साहित्यातील विकास समजावून घेतला आहे. तेव्हा आपण पाहिले की, संस्कृत व्यतिरिक्त अन्य भाषाही भारतात बोलल्या, लिहिल्या जात होत्या. आपण क्रमाने प्राकृत, मागधी, शौरसेनी, महाराष्ट्री, पैशाची, अवन्तिक, अपभ्रंश या भाषांविषयी माहिती घेऊ.

(१) प्राकृत– संस्कृत पाठोपाठ राजदरबारात सन्मान असलेली संस्कृतच्या उपभाषांपैकी ही एक आहे.

**प्राकृत साहित्याचा विकास:** खिस्ति शक १ ल्या शतकात ही भाषा माहीत होती. ही प्राकृत भाषा अनेक पद्धतिने किंवा शाखांनी बोलली लिहिली गेलेली दिसते. यातील मुख्य देहाभेद प्राकृत तथा दुसरा कालभेद प्राकृत असे आहेत. महात्मा बुद्धाने आपला उपदेश याच प्राकृत भाषेत (नंतरचा भाग पाली भाषा म्हणून ओळखला गेला) म्हणजे प्रचलित भाषेत दिला. पाली भाषेस वृद्धप्राकृत–पाली असेच म्हणतात. हे संस्कृतचे बिघडलेले एक रूप आहे. संस्कृत जाणणाऱ्या बहुतेकांस ही भाषा समजत असे. पण ही भाषा जाणणारास संस्कृत समजत नसे. श्रीलंका, ब्रह्मदेश आणि सयाम अशा अतिपूर्वेकडील देशात गेलेल्या बौद्ध हीनयान भिक्षुंनी याच वृद्धप्राकृत किंवा पाली भाषेत ग्रंथ निर्माण केले. या प्राकृत भाषेचे स्वतंत्र व्याकरण असून त्यास 'कच्चायन व्याकरण' (कात्यायन व्याकरण) असे म्हणतात. सम्राट अशोकाने आपल्या सर्व धर्माज्ञा याच प्राकृत भाषेत तथा ब्राह्मी लिपित लिहिल्या आहेत. याच्या मूल प्रतिलिपी संस्कृतमध्ये नागरी लिपित लिहिलेल्या आहेत. भिन्न भिन्न भागात गेलेल्या अधिकाऱ्यांनी त्या त्या भागातील भाषामध्ये याचे आलेख उतरविले. तथापि धर्माज्ञेतील मजकूर तोच दिसतो. कधी पालीव्यतिरिक्त प्रचलित भाषेतील किंवा पाली भाषेच्या ब्राह्मी लिपित प्रचलित

भाषेतील अक्षर, शब्दक्रम वापरलेले असून हे सर्व भिन्न भिन्न स्थानी खोदलेले, पर्वतलेख, स्तंभलेख, रस्त्यावरील मार्गशिलालेख असेच आहेत.

**प्राकृत:** सम्राट अशोकानंतर कालभेद तथा देशभेद हे वादाचे प्रश्न ठरले. त्यातून फक्त प्राकृत जाणणाऱ्या समाजावर संस्कृत-प्राकृत दोनही जाणणाऱ्या समाजाने भेद उत्पन्न केला. यातून प्राकृत भाषेच्या विकासाची दिशा, राजाश्रय प्राप्त न झाल्याने प्राकृत भाषा ६ वेगवेगळ्या भाषांमध्ये विभागली गेली. (१) मागधी, (२) शौरसेनी, (३) महाराष्ट्री, (४) पैशाची, (५) अवन्तिक आणि (६) अपभ्रंश असे ते ६ प्राकृत भाषाभेद आहेत.

## प्राकृत भाषाभेद –

**मागधी:** मगध साम्राज्याची ही बोलीभाषा आहे. प्राचीन मागधी सम्राट अशोकाच्या लेखात दिसते. तथापि या भाषेचे इतर लिखित पुरावे सापडत नाही. या भाषेत लिहिला गेलेला व्याकरणग्रंथही प्राप्त होत नाही – तरीही ही भाषा संस्कृत भाषेशी अधिक जवळ आहे. साधारणत: सर्व संस्कृत नाटकात, सेवक, धीवर, शिपाई, विदुषक, जैनसाधु, खेड्यातील लहान मुलगा इत्यादि दुय्यम पात्रांच्या तोंडी ही मागधी भाषा बोलाविली गेली आहे. आपापसांतील संवाद ही पात्रे रंगमंचावर मागधी किंवा प्राकृत-मागधी भाषेत बोलतात. अभिज्ञान शाकुंतलम्, प्रबोध चंद्रोदय, वेणीसंहार, ललित विग्रहराज, इत्यादी नाटकांमध्ये प्रसंगवशात् ही भाषा दिसते. या भाषेत नंतरच्या काळात एक भेद झाला. (१) अर्धमागधी– यात मागधी आणि शौरसेनी भाषांचे मिश्रण आहे. म्हणून यास अर्धमागधि असे म्हणतात. जैन धर्माचे बहुतेक सर्व ग्रंथ या अर्धमागधी भाषेतच लिहिलेले दिसतात. प्राचीन जैन काव्य 'पउमचरीय' अर्धमागधीतच आहे. महाराजा उदयन्ची प्रसिद्ध कथाही याच भाषेतील आहे.

(क्रमश:)

---

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिरडी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली काही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखो भाविकांना शिरडीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विद्यमान विश्वस्त मंडळ शिरडीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकविध योजना राबवित आहे.

'साईबाबा भक्तनिवास' या इमारतीचे बांधकाम हाती घेऊन ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने संस्थानने पहिले पाऊल उचलले आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येतील. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय केली जाईल. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, अशा २ सभागृहांची योजना असून या सोयीमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था येथे होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असेल असे एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत असेल. लवकरच ही इमारत भाविकांना निवासाकरिता उपलब्ध होणार आहे.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन मंदिर-परिसराच्या नूतनीकरणाची योजनाही हाती घेण्यात येणार आहे. या नूतनीकरणामुळे श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

विद्यमान विश्वस्त मंडळाने स्वच्छ व मुबलक पाणी, उत्तम वैद्यकीय सेवा, हृदयरोग अतिदक्षता विभाग, सोनोग्राफी, इंग्रजी माध्यमाची शाळा, संस्थानच्या उत्पन्नात वाढ, कामात सूसूत्रीपणा आदी योजनांना दृश्यरूप दिले असून मंदिर-परिसराचा विकास, रुग्णालयाचा विस्तार, 'साईबाबा भक्तनिवास' आदी योजनाही अल्पावधीतच दृश्यरूप धारण करणार आहेत.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थानने वरील नमूद केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल धार्मिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता देणगी दिल्याने होणार आहे.

शिरडी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणाला या कार्याकरिता उदारहस्ते मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

आपल्या देणग्या खालील पत्त्यावर पाठवाव्यात:–

कार्यकारी अधिकारी,<br>
श्री साईबाबा संस्थान, शिरडी<br>
मु. पो.: शिरडी, तालुका: कोपरगांव, जिल्हा: अहमदनगर.

सूचना: चेक 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावाने पाठवावेत.

## श्री साईलीलास

मला छायाचित्रे खूपच आवडतात. घरात तर मी चिक्कार छायाचित्रे साठविली आहेत. एकदा मला 'श्री साईलीला'चा अंक वाचायला मिळाला. त्यातील छायाचित्रे पाहून मी अक्षरशः भारावून गेलो. त्याचप्रमाणे अंकातील भक्ती, बाबांचे दोन पैसे, संपादकीय हे सारे लेख वाचल्यामुळे माझ्या आध्यात्मिक विचारांना अधिक चालना मिळाली.

**– श्री. संतोष लवंदे**
दापोली, रत्नागिरी.

मी 'श्री साईलीला' नेहमी आवर्जून वाचतो. ते वाचल्यावर अमृतप्राप्ती झाल्याचा आनंद होतो. हे नियतकालिक असे आहे की ते वाचल्यावर लहानथोर सर्वांचीच वाचनाची भूक भागते. खळाळणाऱ्या ओढ्याप्रमाणे निखळ आनंद देणारे हे द्वैमासिक आहे. त्यातील लेख म्हणजे हव्याहव्याशा वाटणाऱ्या श्रावणातल्या सरीच जणू! धार्मिक ज्ञान मिळवू इच्छिणाऱ्यांसाठी 'श्री साईलीला' ही ज्ञानगंगाच आहे. सध्याच्या मन विषण्ण करणाऱ्या काळात 'श्री साईलीला'चा दर्जा टिकविण्यासाठी आपण सातत्याने परिश्रम घेत आहात ही बाब खरोखरच वाखाणण्याजोगी असून ती एक सत्त्वपरीक्षाच आहे.

**– श्री. रविंद्र सोनार**
ग्रामसेवक,
जव्हार, ठाणे.

१९९२ या वर्षातील 'श्री साईलीला'चे मे-जून, जुलै-ऑगस्ट हे अंक वाचायला मिळाले. विशेषतः श्री. ग. रा. सावंत यांचे ज्योतिषविषयक लेख उत्तम वाटले. धार्मिक क्षेत्रात एक उत्तम नियतकालिक गेली कित्येक वर्षे नियमितपणे निघत असल्याचे पाहून समाधान वाटले.

**– श्री. वसंत विसपुते**
भुसावळ, जळगाव.

'श्री साईलीला' हे ऑफसेटवर छापले जात असल्याने अंकाचा दर्जा निश्चितच खूप उंचावला आहे. सरस लिखाण शुद्ध छापले जात असल्याने अंक वाचनीय असतात. रंगीत छायाचित्रांमुळे अंक उठावदार दिसतो.

**– श्री. बबन येरम**
मुंबई.

'श्री साईलीला'च्या जुलै-ऑगस्ट, १९९२च्या अंकातील 'त्या तिथे पलीकडे' पुन्हा पुन्हा वाचले. आपले लिखाण सरळ हृदयाला भिडणारे, प्रामाणिक व मानवजातीचे कल्याण चिंतणारे आहे. असेच मार्गदर्शन पुढील अंकांतूनही मिळत राहील, याची खात्री आहे.

**– श्री. विद्याधर पुराणिक**
कोथरूड, पुणे.

मी 'श्री साईलीला' नियमित वाचतो. आपल्या जुलै-ऑगस्ट, १९९२च्या अंकात प्रसिद्ध झालेले प्राचीन भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, प्राचीन भारतीय कला, व्यापार, शिल्प, चित्रकला, संगीत हे लेख माहितीपूर्ण आहेत. तसेच, मुखपृष्ठावरील 'उनकेश्वर' येथील चित्रे फारच आकर्षक व उद्बोधक आहेत.

**– श्री. द. श्री. देशपांडे**
अलिबाग, रायगड.

'श्री साईलीला'चे प्रकाशन साहित्य व छपाई ह्या दोन्ही दृष्टींनी उच्च दर्जाचे होत असल्याचे अलिकडच्या अंकांवरून दिसून येते. याबद्दल आपल्याला धन्यवाद!

'श्री साईलीला'चे महत्त्व असेच उत्तरोत्तर वाढत राहो व असेच उच्च दर्जाचे लिखाण वाचायला मिळो, हीच श्री साईचरणी प्रार्थना!

**– श्री. सचिन राजे**
कराड, सातारा.

'श्री साईलीला'चा जुलै-ऑगस्ट, १९९२चा अंक वाचला. हा अतिसुंदर अंक वाचून मनाचे फार समाधान झाले. साईगुण, स्मृती, चंद्ररहस्य, वाजे नगारा इत्यादी लेख वाचनीय आहेत.

**– श्री. राजेंद्र कुंभार**
विक्रोळी (पूर्व), मुंबई.

'श्री साईलीला'च्या मे-जून, १९९२च्या अंकातील श्री. अरूण ताम्हणकर यांचा 'अंतरिक्ष नाग' हा लेख वाचून आमच्या ज्ञानात भर पडली. आपल्या शास्त्रीय आध्यात्मिक ज्ञानाबद्दल अभिनंदन करण्यास शब्दच अपुरे पडतात. 'अंतरिक्ष नाग' हा लेख पुन्हा पुन्हा वाचला तेव्हा कुठे त्यातील आशय उमगला. शंकराच्या गळ्यातील नाग वासुकी याबद्दलची माहिती अगदी शास्त्राधारे दिली आहे.

**– श्री. व्ही. बी. खुपसरे**
अंधेरी (प.), मुंबई.

सांगायचं म्हणजे 'श्री साईलीला'तील श्री. मोहनलाल अग्रवाल यांची 'वाजे नगारा' ही लेखमाला म्हणजे आजच्या विज्ञानयुगात कल्पित कथानकच वाटत होतं; पण मे-जूनच्या अंकात कार्यकारी संपादकांबरोबर त्यांचा फोटो व एका प्रश्नाच्या संदर्भात हे सत्यकथन असल्याचा कार्यकारी संपादकांचा निर्वाळा यामुळे या लेखमालेबद्दलची उत्कंठा अधिकच वाढली आहे.

कार्यकारी संपादकांचे विविध विषयांवरील लेख, वैज्ञानिक दृष्टीने आत्म्याबद्दलची माहिती, जैविक स्मृती, नरक-यातना, स्वर्गसुख, स्वर्ग व नरक म्हणजे काय? पिंडदान विधी का करतात, त्यातील कावळ्याचे महत्त्व व त्याला असलेली इन्फ्रासाईट इत्यादी विपुल माहिती वाचून मन नकळत गूढ होऊन अंतराळात विहार करू लागतं.

कार्यकारी संपादकांचा 'अंतरिक्ष नाग' हा लेखही खूप सुंदर आणि माहितीपूर्ण आहे. त्यांची शारीरिक तसेच मानसिक गोष्टींबद्दल बारीक-सारीक लिहिण्याची हातोटी अगदी आकर्षित करणारी आहे. त्यांचा 'गूढाचे गूढ' हा लेख चमत्कारांमागील रहस्य उलगडून दाखवतो.

(पृष्ठ क्र. ६४ वर)

# बाबांचा चौऱ्याहत्तरावा पुण्यतिथी उत्सव थाटात साजरा!

सालाबादप्रमाणे श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या वतीने श्री पुण्यतिथी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. भक्तांची गर्दी लक्षात घेता संस्थानतर्फे प्रथमोपचार केंद्र, मदत केंद्र, यांची व्यवस्था उत्सवकाळात अहोरात्र ठेवण्यात आली होती. संस्थान-परिसर व संस्थान इमारतींवर विद्युत-रोषणाई केल्यामुळे इमारती चकमकत होत्या. ऊन व पावसापासून भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून मंडप टाकण्यात आले होते. श्री पुण्यतिथी उत्सव दिनांक ४-१०-९२ ते ६-१०-९२ अखेर तीन दिवस साजरा करण्यात आला.

### प्रारंभ दिन
### दिनांक ४-१०-१९९२

पहाटे ४-१५ वाजता समाधी-मंदिर उघडले. ५-१५ वाजता श्रींची काकड आरती सुरू झाली व ठीक ५-४५ वाजता वीणा, पोथी व श्रींच्या फोटोची मिरवणूक निघाली. त्यात मा. विश्वस्त श्री. श्रीपतराव जाधव यांनी वीणा, मा. विश्वस्त श्री. दादा पाटील रोहमारे यांनी पोथी आणि फोटो मा. विश्वस्त श्री. उत्तमराव शेळके व मा. विश्वस्त श्री. बी. ए. नरोडे यांनी धरला होता. नित्यनियमाप्रमाणे वीणा, पोथी, फोटोची मिरवणूक समाधी-मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत आली व श्री साईसत्चरित्राचे अध्याय-वाचन सुरू झाले. त्याआधी एकूण ४८ भाग्यवान साईभक्तांची नावे आदल्या दिवशी दि. ३-१०-९२ रोजी सायंकाळी ७-०० वाजता चिट्‌ठ्या टाकून ड्रॉ-पद्धतीने विश्वस्तांच्या समक्ष काढण्यात आली. विश्वस्तांचे राखीव अ. नं. १ ते ५ अध्याय मा. विश्वस्त यांनी वाचले. ते पुढीलप्रमाणे; अध्याय पहिला मा. विश्वस्त श्री. दादा पाटील रोहमारे, अध्याय दुसरा मा. विश्वस्त श्री. गोपीनाथ बयाजी कोते पाटील, अध्याय तिसरा मा. विश्वस्त श्री. श्रीपतराव एम. जाधव, अध्याय चौथा मा. विश्वस्त श्री. एस. आर. शिंदे, अध्याय पाचवा मा. विश्वस्त श्री. बाबुराव ए. नरोडे यांनी वाचला. त्यानंतर ड्रॉ-पद्धतीने (निवडलेल्या) काढलेल्या भक्तांचे अध्याय-वाचन सुरू झाले. त्यानंतर श्रींचे पवित्र स्नान सनई चौघड्याच्या मंगलमय वातावरणात व मंत्रोच्चारात पार पडले.

दुपारी १२-३० वाजता माध्यान्ह आरती सुरु झाली व नंतर तीर्थ-प्रसाद झाला. त्यानंतर दुपारी २-०० ते ३-०० यावेळेत मा. प्रा. श्री. जी. जी. वर्पे, के. जे. सोमय्या महाविद्यालय, कोपरगाव यांचे समाधी-मंदिरासमोर साईबाबांवर प्रवचन झाले. त्याचा अनेक भक्तांनी लाभ घेतला. नंतर ३-०० ते ५-०० यावेळेत ह.भ.प. श्री. निवृत्ती महाराज देशमुख, भक्ति-वेदान्त विद्यामंदिर, आळंदी (देवाची), पुणे यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी ६-०० वाजता नित्याप्रमाणे धुपारती सुरू झाली व तीर्थ-प्रसाद वाटण्यात आला. सायंकाळी ७-०० वाजता निमंत्रित सुप्रसिद्ध गायिका श्रीमती शोभादेवी पाटील व सहकारी यांची सुश्राव्य भक्तिगीते व साईभजनाचा कार्यक्रम हजारो भक्तांच्या उपस्थितीत पार पडला.

रात्रौ ९-१५ वाजता निघालेली श्रींची पालखीची मिरवणूक गावातून वाद्यांच्या गजरात पार पडली. सदर मिरवणूक गुरुस्थानसमोर आल्यानंतर मिरवणुकीसमोर भारूड व भजनाचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये श्री. रघुनाथ सांडभोर, पुणे यांचा, तसेच श्री. रत्नाकर कोराटे, श्री. गाडेकर यांचा भारूड-गायन कार्यक्रम झाला. सदर पालखीसाठी समाधी-मंदिरातून पादुका द्वारकामाईत नेल्या. त्यावेळी मा. अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक, तसेच मा. विश्वस्त हजर होते.

पालखी पुन्हा समाधी-मंदिरात आल्यानंतर रात्री शेजारती होऊन समाधी-मंदिर बंद झाले.

द्वारकामाई-मंदिरात श्री साईसत्चरित्राचे अखंड पारायण चालू असल्याने द्वारकामाई-मंदिर दर्शनाकरिता रात्रभर उघडे होते. अनेक भक्तांनी द्वारकामाईत दर्शनाचा लाभ घेतला.

### मुख्य दिवस

श्री पुण्यतिथी उत्सवाचा दुसरा व मुख्य दिवस असल्याने समाधी-मंदिरासमोर सकाळी ४-३० वाजल्यापासूनच भक्तांची गर्दी झाली होती. समाधी-मंदिर पहाटे ४-१५ वाजता उघडले. ५-१५ वाजता श्रींची काकड आरती सुरू झाली व आरती संपल्यावर अखंड पारायण समाप्ती मिरवणूक निघाली. परत येणाऱ्या मिरवणुकीमध्ये पोथी मा. विश्वस्त श्री. दादा शहाजी रोहमारे पाटील यांच्या हातात, वीणा मा. विश्वस्त श्री. श्रीपतराव जाधव यांच्या हातात, तर फोटो मा. विश्वस्त श्री. उत्तमराव शेळके व मा. विश्वस्त श्री. बाबूराव नरोडे यांनी धरला होता. फोटो, वीणा, पोथी यांची मिरवणूक द्वारकामाई-मंदिरातून गुरुस्थानमार्गे समाधी-मंदिरात आली व नंतर ठीक साडेसहा वाजता श्रींचे मंगलस्नान मंगलमय वातावरणात व मंत्रोच्चारात सुरु झाले. श्री पुण्यतिथी उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने गावातून भिक्षा-झोळी घेऊन भिक्षा घेण्याचा कार्यक्रम ९-०० वाजता पालखी व रथाच्या मार्गाने सुरू झाला. त्याच्या आदल्या दिवशी सकाळी ९-०० ते दुपारी १२-३० पर्यंत भक्तांची नावे भिक्षा-झोळी घेऊन (नोंदवून) ड्रॉ-पद्धतीने दुपारी २-०० वाजता काढण्यात आली. त्यात २० भाग्यवान भक्तांची व ५ राखीव भक्त निवडून त्यांची नावे बोर्डवर जाहीर करण्यात आली आणि त्या भक्तांना गावातून भिक्षा-झोळीच्या मिरवणुकीत सामील करून घेण्यात आले व झोळ्या देण्यात आल्या. तसेच विश्वस्तांच्या राखीव झोळ्या त्याचवेळी संस्थानच्या मा. अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक यांच्या हस्ते हजर असलेले मा. विश्वस्त श्री. गोपीनाथ बयाजी पा. कोते, मा. विश्वस्त श्री. एस. आर. शिंदे, मा. विश्वस्त श्री. नरोडे, मा. विश्वस्त श्री. उत्तमराव शेळके पाटील, मा. विश्वस्त श्री. श्रीपतराव जाधव, मा. विश्वस्त श्री. खांबेकर, मा. विश्वस्त श्री. एम. एम.

जयकर, मा. विश्वस्त डॉ. गोंदकर आदींना देण्यात आल्या. त्यावेळी संस्थानचे मा. कार्यकारी अधिकारी श्री. निर्मलकुमार देशमुख हे हजर होते. भिक्षा-झोळी गावातून दुपारी ११-३० वाजता श्री समाधी-मंदिरात आली. त्याअगोदर सकाळी १०-३० वाजता श्री पुण्यतिथी कीर्तन ह.भ.प. श्री. विठ्ठल महाराज चौधरी यांनी केले. त्याचा अनेक भक्तांनी लाभ घेतला.

दुपारी १२-०० वाजता 'श्रीं'ची आराधना-विधि पूजा यजमान मा. विश्वस्त श्री. दादा शहाजी रोहमारे यांच्या हस्ते सुरू होऊन पूर्ण झाली. त्यावेळी मा. अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक, इतर मा. विश्वस्त व मा. कार्यकारी अधिकारी श्री. निर्मलकुमार देशमुख हे उपस्थित होते. पूजाविधि संपल्यानंतर २५ ब्राह्मण व २५ ब्राह्मण सुवासिनी यांना अन्नदान व वस्त्रदान केले गेले.

दुपारी १२-३० वाजता माध्यान्ह आरती सुरू होऊन आरतीनंतर तीर्थ-प्रसादाचे वाटप झाले. दुपारी ४-३० वाजता श्रींचा सीमोल्लंघन कार्यक्रम झाला. त्यावेळी मा. विश्वस्त श्री. गोपीनाथ बयाजी पाटील कोते, मा. विश्वस्त श्री. एस्. आर. शिंदे, प्रभारी मंदिर-प्रमुख व इतर साईभक्त मिरवणुकीत हजर होते.

सायंकाळी ६-०० वाजता नित्यनियमाप्रमाणे धुपारती सुरू झाली व आरतीनंतर तीर्थ वाटण्याचा कार्यक्रम झाला.

धुपारतीनंतर रात्री सात वाजता निमंत्रित कलाकार आनंद संगीत विद्यालय, कोपरगाव यांचा ७-०० ते ९-१५ ते रथ मंदिरात येईपर्यंत भक्तिगीते, तसेच साईभजन व गायन कार्यक्रम झाला. त्याचा अनेक भक्तांनी लाभ घेतला.

रात्री ९-१५ वाजता 'श्रीं'च्या रथाची मिरवणूक गावातून निघाली. मिरवणुकीमध्ये मा. विश्वस्त सहभागी झाले होते. मिरवणूक गावातून गुरुस्थानसमोर आल्यानंतर रथाच्या मिरवणुकीसमोर श्री. रघुनाथ सांडभोर, कलाकार, पुणे यांचा, तसेच श्री. रत्नाकर कोराटे, श्री. गाडेकर यांचा भारूड व भजनाचा कार्यक्रम झाला. नंतर रथाची मिरवणूक मंदिरात आल्यानंतर रात्री १२-०० ते सकाळी ६-०० वाजेपर्यंत श्रींच्या समोर स्टेजवर कलाकार-हजेऱ्यांचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये अनेक मान्यवर कलाकारांनी भाग घेतला होता.

श्री पुण्यतिथी उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने समाधी-मंदिर भक्तांना दर्शनाकरिता रात्रभर उघडे होते. अनेक भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.

### सांगता दिन

समाधी-मंदिर रात्रभर उघडे असल्याने सकाळी काकड आरती झाली नाही. सकाळी ६-०० वाजता 'श्रीं'चे मंगलस्नान मंगलमय वातावरणात व मंत्रोच्चारात सुरू झाले. सकाळी ७-३० वाजता श्री गुरुस्थान मंदिरामध्ये मा. विश्वस्त श्री. पृथ्वीराज आदिक यांच्या हस्ते रुद्राभिषेक पूजा करण्यात आली.

सकाळी १०-३० ते १२-०० वाजेपर्यंत दही-हंडी कीर्तन ह.भ.प. काशिनाथ भालेराव त्र्यंबकेश्वर यांनी केले. १२-०० वाजता दहीहंडी कार्यक्रम झाला.

सायंकाळी ६-०० वाजता धुपारती सुरू झाली. धुपारतीनंतर ७-०० ते ९-४५ वाजेपर्यंत निमंत्रित कलाकार सुप्रसिद्ध सिनेपार्श्वगायक श्री. जयवंतराव कुलकर्णी व पार्श्वगायिका सौ. पुष्पा पागधरे यांचा संगीत व भक्तिगीत-गायन कार्यक्रम झाला. त्याचा अनेक भक्तांनी लाभ घेतला. रात्री १०-०० वाजता शेजारती सुरू झाली व प्रसाद-वाटप होऊन समाधी-मंदिर बंद करण्यात आले.

अशाप्रकारे श्री पुण्यतिथी उत्सव श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या वतीने दिनांक ४-१०-९२ ते ६-१०-९२ अखेर तीन दिवस साजरा करण्यात आला, असे प्रभारी मंदिर-प्रमुख शिरडी येथून कळवितात.

---

(पृष्ठ क्र. ६२ वरून)

कार्यकारी संपादकांनी प्राचीन काळातील विविध विषयांवर लिहिलेल्या लेखांनी त्यांचा या विषयावरील अभ्यास किती दांडगा आहे, हे दिसून येते.

श्री. ग. रा. सावंत यांचे चंद्ररहस्य व त्यांचे भविष्यविषयक अन्य लेख खूप काही सांगून जातात. परंतु हे लेख समजायला त्याविषयीच्या मुलभूत ज्ञानाची आवश्यकता हवी!

**—श्री. विनायक वरळीकर**
वरळी गाव, मुंबई.

'श्री साईलीला'चा अंक मी स्टॉलवर विकत घेत असतो. अंकातील माहिती वाचनीय, संग्राह्य, दर्जेदार, गूढ विषयांचे ज्ञान देणारी अशी उत्तम असते. 'वाजे नगारा' ही लेखमाला (सत्य कथन) विशेष लक्षवेधी आहे. आपण त्याचा अनुवाद फारच उत्कृष्ट केला आहे.

**—श्री. रेणुकादास कानोले**
ज्योतिषशास्त्री,
परभणी, औरंगाबाद.

'श्री साईलीला'चा मी नियमित वाचक आहे. जुलै-ऑगस्ट, १९९२च्या अंकातील श्री. अरुण ताम्हणकर लिखित 'त्या तिथे पलीकडे' हा लेख इतका सुंदर आहे की मी त्याचे वर्णन शब्दात व्यक्त करू शकत नाही.

**—श्री. गोविंद प्रतापवार**
भोकर, नांदेड.

'श्री साईलीला'चा मी सभासद असून अंक नियमित वाचत असतो. आपल्या सप्टेंबर-ऑक्टोबर, १९९२च्या अंकावरील 'हातात दाखविलेले साईबाबा' मुखपृष्ठामुळे अंक एकदम आवडला! त्यात प्रसिद्ध झालेल्या 'तुमचं नशीब तुमच्या हातात' या लेखामुळे मला आपल्या हाताचे महत्त्व किती आहे ते समजण्यास खूपच मदत झाली. म्हणूनच हा अंक वैशिष्ट्यपूर्ण असून संग्रही ठेवण्यासारखा आहे. 'श्री साईलीला'स धन्यवाद!

**—श्री. सुरबा ज. गडेकर**
चेंबूर, मुंबई.

'श्री साईलीला'चे जुलै-ऑगस्ट व सप्टेंबर-ऑक्टोबर, १९९२चे अंक वाचनात आले. अंकातील मजकूर अतिशय सात्विक आणि विचारशील आहेत. वरील दोन्ही अंकातील भविष्यविषयक सदर माझ्यासारख्या अभ्यासूंकरिता फार-फार मोलाचे आहे! तरी कृपया भविष्य या विषयावरील हे अभ्यासपूर्ण सदर कायमचे प्रसिद्ध करावे. आभारी आहे.

**—सुभाष लवंदे**
काळाचौकी, मुंबई.

---

# साईनाथ रुग्णालयासाठी १ कोटी २० लाख रुपयांचे अनुदान

## – केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची घोषणा –

**श्री** साईबाबा संस्थान, शिरडी द्वारा शिरडी येथे चालविण्यात येणाऱ्या साईनाथ रुग्णालयाकरिता सिटी स्कॅन युनिट खरेदी करण्यासाठी केंद्रीय आरोग्य विभागाकडून एक कोटी वीस लाख रुपयांची आर्थिक मदत श्री साईबाबा संस्थानला देण्यात येईल, अशी घोषणा मा. केंद्रीय आरोग्यमंत्री ना. माखनलाल फोतेदार यांनी सोमवार, दिनांक ७-सप्टेंबर, १९९२ रोजी शिरडी येथे केली.

ते येथे श्री साईबाबांच्या दर्शनाकरिता आले असताना महाराष्ट्राचे मा. अर्थ व नियोजनमंत्री श्री. रामराव आदिक व मा. परिवहनमंत्री श्री. शंकरराव कोल्हे यांच्या समवेत त्यांनी साईनाथ रुग्णालयास आवर्जून भेट दिली व तेथील विविध विभागांची पाहणी करून कामकाजाची आस्थेने चौकशी केली.

संस्थानच्या मा. अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक यांनी मान्यवर मंत्र्यांचे श्री साईबाबांच्या समाधी-मंदिरात स्वागत केले व त्यांना विद्यमान विश्वस्त मंडळाने केलेल्या विकास-योजनांची व नियोजित कार्यक्रमांची माहिती दिली.

मा. केंद्रीय आरोग्यमंत्री यांनी सपत्नीक श्री साईबाबांची पूजा केली व त्यानंतर संस्थानतर्फे बांधण्यात येणाऱ्या ५०० खोल्यांच्या नियोजित 'साईबाबा भक्त-निवास' या इमारतीची मंत्रीमहोदयांनी पहाणी करून भक्तांच्या निवासाची गैरसोय दूर व्हावी म्हणून संस्थान करीत असलेल्या शर्थीच्या प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी मा. खासदार शंकरराव काळे, संस्थानचे मा. विश्वस्त सर्वश्री भीमाशंकर खांबेकर, गोपीनाथ कोते पाटील, डॉ. एकनाथ गोंदकर, उत्तमराव शेळके, पी. टी. बोरावके, आमदार अण्णासाहेब म्हस्के, मा. कार्यकारी अधिकारी श्री. निर्मलकुमार देशमुख, मा. जिल्हाधिकारी श्री. अजय मेहता, मा. पोलिस अधिक्षक श्री. के. पी. रघुवंशी, कोपरगाव पंचायत समितीचे मा. सभापती श्री. बिपीनराव कोल्हे, मा. श्री. दादा शहाजी रोहमारे, साईनाथ रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. पी. पाटील, अति दक्षता विभागाचे प्रमुख व हृदयरोगतज्ञ डॉ. भाऊसाहेब साबळे, संस्थानचे प्रशासकीय अधिकारी सर्वश्री जी. एस्. धिवरे व व्ही. एस्. कुंटे आदी मान्यवर उपस्थित होते.

---


## श्री साईबाबा संस्थान, शिरडी

### विश्वस्त मंडळ

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. लेखा पाठक (अध्यक्षा) | श्री. भिमाशंकर व्यं. खांबेकर | श्री. प्रशांत व्यं. हिरे |
| श्री. हेमराज शहा | श्री. बाबुराव अ. नरोडे (पाटील) | प्रा. नारायण स. फरान्दे (आमदार) |
| श्री. मनोहर ना. गोगटे | श्री. दादासाहेब श. रोहमारे (पाटील) | श्री. अण्णासाहेब म्हस्के (आमदार) |
| श्री. ब्रिजमोहन भामशा | श्री. प्रभाकर मि. बोरावके | श्री. दिलीप अ. शिंदे |
| श्री. पृथ्वीराज रा. आदिक | श्री. उत्तमराव रं. शेळके | श्री. गोपीनाथ ब. कोते (पाटील) |
| श्री. शिवराम रा. शिंदे | श्री. सोपानराव मा. धोर्डे | श्री. श्रीपतराव मा. जाधव |
| श्री. राजीव प्र. कुलकर्णी | श्री. कारभारी भि. देवकर | श्री. मोहन मो. जयकर |
| डॉ. एकनाथ भा. गोंदकर | श्री. अनंतकुमार कि. पाटील | श्री. निर्मलकुमार देशमुख |
| श्री. प्रभाकर तु. बोरावके | श्री. मोतीराम सि. पवार | (कार्यकारी अधिकारी) |

# सर्व साईभक्तांना आवाहन !

प्रिय साईभक्तांनो !

सप्रेम नमस्कार.

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी अनेकांनी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा.

या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावरही कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकित,
**– अरुण ताम्हणकर**
कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला'**

------------------✂------------------ इथे कापा ------------------✂------------------

कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला',**
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई – ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण रु. २५० (एकूण दोनशेपन्नास रुपये मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

(पृष्ठ क्र. ४० वरून)

समजल्यावर मी त्यांना सांगितले, ''तुम्ही या संकटात मदत करा आणि दोघांना सुखरूप परत घेवून या.'' तेव्हा यक्षिणीने सांगितले की, हे कार्य करण्यास मी समर्थ नाही कारण हे कार्य माझ्या क्षेत्राबाहेरचे आहे.'' तिचे उत्तर ऐकून मी जरा खिन्न झालो. थोडावेळ विचार करून यक्षिणीला तुमची देखरेख ठेवण्यास व शक्य तेवढे संरक्षण देण्यास सांगून तिला जाण्यास सांगितले. ती गेल्यानंतर मी गुरुअनादीनाथांकडे जाण्याचा निर्णय घेतला. रात्री झोप आली नाही. प्रात:काळी टॅक्सी घेऊन माउंटला जायला निघालो. रस्त्यांतच ती टॅक्सी सोडली व गुरुमहाराजांजवळ गेलो. सद्भाग्याने ते गुहेतच होते. मला पाहून ते हसून म्हणाले, ''संसारी लोकांबरोबर प्रेमबंधन ठेवल्यामुळे किती धावाधाव करावी लागते ते बघितले ना!'' मी कशासाठी गेलो याचा त्यांना अंदाज होता, तरीही मी दंडवत प्रणाम केला व त्यांना सविस्तर सर्व सांगितले. माझे बोलणे ऐकल्यावर त्यांनी क्षणभर विचार केला. थोड्यावेळाने, त्यांनी स्वत:चे आसन बदलून, त्यांच्या साध्य देवी ताराचे स्मरण केले. स्मरण होतांच 'तारा' हजर झाली; ते मी पाहू शकत नव्हतो. अघोरी महाराजांनी त्यांचे कार्य संपवून, कापालिकाला यमलोकाला पाठवण्याची आज्ञा केली. या प्रमाणे व्यवस्था केल्यावर त्यांनी मला जायला सांगितले. शिवाय असेही सांगितले की, ''निश्चींत रहा! तुमचा मित्र कुशलतेने तुमच्याजवळ येईल.'' मी त्यांचे खूप आभार मानून त्यांचा निरोप घेतला. दुपारपर्यंत मी आश्रमात परत आलो. मनात सारखे तुमचेच विचार येत होते. कधीकधी तुमच्याजवळ येण्याची मन इच्छा करीत होते; पण तसे केल्याने कार्यात विलंब होण्याची संभावना होती, शिवाय गुरुमहाराजांच्या वचनांत शंका निर्माण केल्यासारखे झाले असते. वारंवार देवाजवळ तुमची खुशाली इच्छीत होतो. जेव्हा यक्षिणीने कापालिकाच्या जंजाळातून तुम्ही सहीसलामत सुटलात व कापालिकाचा मृत्यू झाला असे सांगितले तेव्हा माझे समाधान झाले. मी यक्षिणीला अशी सूचना दिली की, तुम्हाला कुशलतापूर्वक मार्गदर्शन करावे. तुम्हाला झाडीतून रस्त्यापर्यंत घेवून जाणारी मारवाडी, काठीयावाडी स्त्री यक्षिणी होती. तुम्ही तिला दिलेले पैसे पण ती मला देऊन गेली आहे. असे म्हणून त्यांनी आपल्या स्वत:च्या झोळीमध्ये मी दिलेले पैसे होते जे मी काठीयावाडी बाईला दिले होते; ते परत केले.

या सर्व स्पष्टीकरणाने मी विचारशून्य झालो होतो. सत्य असूनसुद्धा विश्वास बसत नव्हता; परंतु कापालिकाचे अशातऱ्हेने मृत्यु पावणे, ही गोष्ट मुख्य आणि सत्य पुरावा होती. बरोबर माझे अस्तित्वपण अटलगिरीजींनी सांगितलेल्या हकीकतींचा पुरावा बनले होते. अटलगिरीजींनी मला सांत्वनपर सांगितले की, ''घडायच्या गोष्टी घडतातच. तुम्ही तर भाग्यवान आहात की. गुरुमहाराजांसारख्या समर्थ गुरुंचे छत्र तुमच्या डोक्यावर आहे. मग कशासाठी खिन्न होता!''



मी परत अटलगिरीजींना प्रश्न केला; तो कापालिक कोण होता? आणि आमच्यावर इतका का खुश होता? त्याला उत्तर देताना अटलगिरीजी म्हणाले, ''तो मुळचा आसामचा आदीवासी होता; त्याने कुणा कापालिकाकडून स्मशान-साधना सिद्ध करून घेतली होती. या साधनेला सर्वोच्च मानून त्याने हिमालयात स्वत:चे स्थान स्थापित केले. तेथल्या साधूसमाजाबरोबर रहाण्यासाठी त्याने पुरीनामा पंथाच्या साधूकडून दिक्षा घेऊन भैरवपूरी नाव धारण केले; आणि तिथल्या साधू तसेच संतांना विनाकारण स्वत:च्या स्मशानसिद्धीच्या बळावर हैराण करू लागला. तिथे रहात असलेल्या भजनानंदी संतांमध्ये स्वत: सिद्ध हौण्याची महत्त्वाकांक्षा बाळगू लागला. शेवटी एक दिवस एका योग्याबरोबर वादविवाद होऊन, त्या योग्याने स्वत:च्या इच्छाशक्तीने भैरवपूरीला राजस्थानच्या रणात फेकून दिले; तेथून फिरत फिरत तो माउंटच्या विस्तारात येऊन राहू लागला. इथे तो खूप दिवसापासून रहात होता. तो साधू-संतांना छेडीत नव्हता, पण खूप शक्तीशाली बनण्याचा प्रयत्न करीत होता; आणि स्वत:च्या हुशारीने नेहमी शिकारीच्या शोधात रहायचा. त्याने यापूर्वी पण एक-दोन दुष्कृत्ये केली होती, त्याद्वारा त्याने थोडी शक्तीशाली विद्या हस्तगत केली होती. माउंटविस्ताराच्या सिद्धलोकांच्या नजरेबाहेर हा कापालिक नव्हता; पण विनाकारण त्याच्याबरोबर दुश्मनी करण्याचा कुणाही संताचा आग्रह नव्हता. ज्या कारणाने त्याची पाखंडलीला चालत होती. त्याने स्मशानभैरवाची सिद्धी प्राप्त करण्यासाठी एका आदीवासी बाईला संमोहनाद्वारे आकर्षित केली होती व बलीदानाची जोगवाई म्हणून ठेवले होते. परंतु ती बाई दुर्दैवाने नैसर्गिकरीतीने मृत्यू पावली. त्यामुळे कापालिक भैरवपूरी उदास झाला होता. प्रयोग पूर्ण व्हायला काही थोडे दिवस बाकी होते, आणि स्त्रीबलीची व्यवस्था झाली नव्हती. या कारणाने तो शक्य तितक्या लवकर स्त्रीबळीची व्यवस्था करण्याच्या

Registered with the Registrar
of News-papers for India
No. MH/527

चिंतेत होता. तेव्हा क्रिस व तुम्ही त्याला दिसलात; नाहीतरी त्याचा शेवट जवळ आला होता. तुम्ही त्याचे निमित्त बनलात, नाहीतर त्याच्या हातून खूप उपद्रव झाले असते; आणि कितीतरी अनिष्ठ गोष्टी घडल्या असत्या. मी अटलगिरीजींना विचारले, "या सर्व गोष्टी आपल्याला कशा समजल्या?" त्यावर ते म्हणाले, "या सर्व गोष्टी मला यक्षिणीद्वाराच समजल्या होत्या.

ते पुढे म्हणाले, "जेव्हा भैरवपूरी, क्रिसच्या शरीराला माध्यम बनवून बळी देण्याची क्रिया करीत होता, त्यावेळेस अनादीनाथांनी पाठविलेल्या तारादेवीने क्रिसच्या शरीरात प्रवेश करून भैरवपूरीला भ्रमात ठेवले; ज्यामुळे भैरवपूरी असे समजला की, आराध्य देवतेचे आगमन झाले आहे. स्वत:चे कार्य सफल झाले असे समजून त्याने तुम्हाला गुहेच्याबाहेर जायला सांगितले; परंतु तुम्ही खूप चिडलेले व व्यग्र होतात; व त्यापोटीच तुम्ही भैरवपूरीला घायाळ केलेत; त्याबरोबर तारादेवी गुहेच्याबाहेर गेली व अट्टहास्य करून तिने भैरवपूरीला बाहेर यायला प्रेरीत केले. भैरवपूरी या भ्रमात होता की, आराध्यदेवता हजर राहून बाहेर गेली व त्यामुळे आता केलेली मेहनत फुकट जाणार; असे वाटून तो वेड्यासारखा आराध्यदेवतेला काबूत ठेवण्यासाठी, तिला विनंती करण्यास तिच्या पाठोपाठ धावत गेला. बाहेर जाताच तारादेवीने तिच्या प्रचंड शक्तीने भैरवपूरीच्या शरीराचा एका क्षणार्धात विच्छेद केला. त्याचे काळीज खेचून घेवून ते स्वाहा केले व बाकीचे अवयव छिन्न-विछिन्न करून फेकून दिले. हे काम गुहेतही झाले असते परंतु तुम्ही केलेल्या प्रहाराने उन्मत्त झालेला भैरवपूरी तुम्हाला घातक झाला असता, त्यामुळे तारादेवीने त्याला गुहेच्या बाहेर खेचले. तुम्ही जी भयानक किंकाळी ऐकलीत, ती भैरवपूरीची होती. तारादेवीने एकाच प्रहाराने त्याची छाती फोडून उघडली."

अटलगिरीजींनी रहस्याचा घटस्फोट केला तेव्हा माझ्या शरीरावर भीतीचा काटा उभा राहीला. अटलगिरीजींनी व अनादीनाथांनी केलेल्या उपकाराने मी गद्गदून गेलो. मी मन:पूर्वक अनादिनाथजींचे आभार मानून अटलगिरीजींना म्हणालो, तुम्ही जर नसता तर माझी प्राणहानी झाली असती, शिवाय क्रिसला पळवल्याचा आरोपही माझ्यावर आला असता."

संध्याकाळी आरती-पूजा झाल्यावर साधे भोजन करून आही दोघे गप्पा मारीत खूप उशीरा रात्री झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व नित्यक्रम आटपून मी निघायची परवानगी मागितली व म्हणालो, "आज मी तुमच्या कृपेने जीवित आहे, तशीच कृपा नेहमी ठेवा." त्यावर अटलगिरीजी म्हणाले, "आम्ही विरक्त! रहाण्याचे घर, साधन, आई-वडिल सोडून, जंगलाचा आसरा घेतला. तरीसुद्धा ईश्वराची रचना-माया अनंत आहे. इथे तुमच्याबरोबर प्रेमबंधनात पडल्यामुळे भजनापासून मन विचलीत होऊन, दुसऱ्या प्रवृत्तीत गुंतून जाते."


मी त्यांचे प्रभावी बोलणे ऐकत होतो. थोड्यावेळाने मी त्यांना म्हणालो,

"माझ्यामुळे आपल्याला खूप कष्ट पडले; तेव्हा तुम्ही मला तुमचा अनुज समजून क्षमा करा. ईश्वरपण प्रेमाच्या व भक्ताच्या आधीन असतो. आत्मा हा ईश्वररूप असतो म्हणून तुमचा आत्मा, माझ्या प्रेमामुळे माझ्यावर प्रसन्न होणे हाच त्याचा धर्म आहे, हाच त्याचा स्वभाव आहे. त्यात अवास्तविक असे काहीच नाही. तरीसुद्धा तुम्ही साधू आहात, व मी संसारी आहे. आपल्यात एक मर्यादा आहे, ती परंपरागत आहे, ती आपण सांभाळतो. परंतु मन, आत्म्याच्या मर्यादारेषेचा विस्तार नक्की करू शकत नाही." अटलजींनी मध्येच अडवून मला सांगितले, "तुमची उपदेशवाणी सुंदर आहे, तिला परत कधीतरी उपयोगात आणा, आता सांभाळून ठेवा;" शिवाय बोलता बोलता लहान दोषाकडे निर्देश करत म्हणाले, "चमत्कार व विविध सिद्धी यांकडे जरूरीपेक्षा जास्त लक्ष देऊ नये. तसेच कुणाला चमत्कार दाखविण्यासाठी उत्तेजित करू नये. अयोग्य व्यक्तीपासून अनंत अरिष्ट निर्माण होतात, चमत्काराचा हेतू जर शुभ असेल तर तो योग्य आहे. नाहीतर विनाकारण मनोरंजनासाठी मदाऱ्याचा खेळ बनला जातो. भजन-उपासनांच्या शक्तीचा उपयोग विनाकारण करणे योग्य नाही. अजून तुम्हाला जीवनाची लांब मजल चालावयाची आहे. विवेक, संयम, मर्यादा इत्यादींचे धर्माद्वारे नियंत्रण नाही केले तर जीवनाची गति अनिश्चीत होऊन फुकट जाईल. ईश्वरांनी रचलेल्या मायांमधून, पंडित, विद्वान, जति, सती, योगी, भोगी, कुणीही अलिप्त होत नाही. तेव्हा फक्त ईश्वरस्मरणच जीवनाचे ध्येय समजा, नियम-संयमावर कायम रहा. बाकी सर्व व्यर्थ."

त्यांची वाणी शिलालेखाप्रमाणे कोरली गेली. मला स्टेशनपर्यंत ते सोडायला आले. प्रेमाने निरोप देता देता म्हणाले, "मी थोड्या दिवसांनी जुनागढला जाणार आहे, तेथून परत जाताना तुम्हाला भेटीन."

(पुढील अंकी)





# वाजे नगारा

मोहनलाल अग्रवाल

**मा**घ वद्य चतुर्दशीच्या सकाळी रैवताचलच्या उत्तुंग शिखरामागे सूर्यनारायण उदीत होण्याच्या तयारीत होते. सकाळच्या मंद संधीप्रकाशाबरोबर थंड, सुखद वाऱ्याच्या लहरीत अनेक धूनींत हवन केल्या जाणाऱ्या हविष्य द्रव्यांचा सुगंध वातावरणात व भावनेत नकळत पवित्रता भरत होता.

गिरनारच्या दहा पायऱ्या चढून डावीकडे मी वळलो. पायथ्याशीच असलेल्या जंगलात जवळजवळ ३ फर्लांग चालायचे होते. हा रस्ता व ही जागा माझ्या चांगलीच परिचयाची होती; कारण अधूनमधून या रस्त्याने महात्मा शंकरगिरीजी महाराजांना भेटण्यासाठी मी जात-येत होतो.

महात्मा शंकरगिरीजी वयोवृद्ध, तपस्वी, भजनानन्दी, महात्मा आहेत. ते लोकांच्या खूप कमी संपर्कात असतात. एका सुंदर व स्वच्छ झोपडीत ते भजनात लीन असतात. झोपडीच्या मध्यात सपाट जागी शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. लहान, मनमोहक बगीचा वातावरणात नेहमी ताजेपणा ठेवतो, सुगंध फैलावतो.

या महात्म्याबरोबर माझा फक्त एका वर्षाचाच परिचय होता. महाशिवरात्रीच्या मेळ्याला मी बहुतेक दरवर्षी जातो. त्याचवेळी त्यांच्याबरोबर माझा परिचय झाला. त्यांची मस्तकावरील एकच एक खूप मोठी हत्तीच्या सोंडेएवढी जटा पाहूनच, मी त्यांच्याकडे आकर्षित झालो होतो; या आकर्षणापोटी मी त्यांच्याशी परिचय करून घेतला. एकाच मुलाखतीत आम्ही एकमेकांजवळ आलो. त्यानंतर जेव्हा-जेव्हा जुनागडला जाणे होई, तेव्हा अचूक त्यांना भेटण्यासाठी मी जात असे.

आज शिवरात्रीला मी एका खास कारणासाठी त्यांच्याकडे जात होतो; ते कारण म्हणजे, त्यांनी मला सांगितले होते की, ''हिमालयातील एक 'सिद्धयोगी' आज माझ्याकडे येणार आहेत.''

शंकरगिरीजींच्या बांबूकुटीराजवळ

(पृष्ठ क्र. ५८ वर)

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७० अंक ९-१०

जानेवारी – फेब्रुवारी ९२

संपादक
**प्रो. डॉ. लेखा पाठक**

कार्यकारी संपादक
**अरूण ताम्हणकर**

संपादन सहाय्य
सौ. प्रविणा कांबळी, विजय क्षीरसागर, सुरेंद्र देसाई

मुखपृष्ठ आणि अंतर्गत सजावट
हेमंत चोणकर

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी – रु. ५०/-,
आजीव सभासद वर्गणी – रु. १,०००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी – रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक – रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक प्रो. डॉ. लेखा पाठक, अध्यक्षा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांविषयीची कोणतीही कायदेशीर कारवाई मुंबईच्या न्यायकक्षेतच होऊ शकते, याची कृपया नोंद घ्यावी.

## जे न बोलायचे...

# "थोडा वेळ थांबा!... विचार करतो!!..."

**का**ही दिवसांपूर्वी माझ्या एका मित्रानं त्याच्या मित्राला विचारलं,

"आमच्या कंपनीत नोकरी करशील?"

"विचार करून सांगतो!" – मित्राचा मित्र म्हणाला.

वास्तविक, यात विचार करण्यासारखं काही नव्हतं! सध्या तो मित्राचा मित्र, ज्या ठिकाणी नोकरीस होता ती त्याची नोकरी टेंपररीच होती! आणि नव्या नोकरीत त्याला पैसे अधिक मिळणार होते!

मित्रानं त्याला दुसऱ्या दिवशी पुन्हा विचारलं, तो म्हणाला,

"अजून विचार करायला वेळच मिळालेला नाही!"

मित्राच्या मित्रानं दिलेल्या या उत्तरानं मला उगीचच चीड आली. कारण या त्याच्या उत्तरात, आपण खूप विचारानं आयुष्य जगतो हा दांभिकपणा जगण्याचीच अधिक धडपड होती! "सिनेमाला येतोस का?" असं विचारलं तरी लोक, "विचार करतो!" असं म्हणतात. आता सिनेमाचा आणि विचाराचा काही संबंध आहे का?

आपण पावलागणिक 'विचार' हा शब्द वापरतो. त्याचा अर्थ तरी आपल्याला माहीत असतो का? किंवा विचार करा करायचा असतो, हे तरी आपल्याला कुठं माहीत असतं? भूतकाळातील ज्या चांगल्या गोष्टी आपण विसरतो आहोत, त्यात संस्काराप्रमाणेच विचार कसा करायचा हेही आपण विसरलेलो आहोत.

विचार म्हणजे काय?

विचाराच्या तीन पद्धती आहेत. चर्चा, संख्या (म्हणजे क्रमविकास) आणि विचारणा. एखाद्या विचारासाठी चर्चेची सुरुवात झाली कि, त्या चर्चेत भ्रांती, मिथ्यामती आणि भ्रम असे तीन दोष प्रथम येतात.

शास्त्रशुद्ध विचारासाठी निर्णय आणि निश्चय यांचीही गरज असते. परंतु सुरुवातीलाच मिथ्यादृष्टी आणि नास्तिकता यांमुळे बऱ्याच लोकांचा, मूळ विषयाशी द्रोह उत्पन्न होतो आणि यातून व्यापाद आणि द्रोहचिंतन जन्माला येतात. निर्णय झाला तरी निश्चयाच्या पातळीवर माणूस घसरतो. तिथे त्याच्या मनातील संदेह, विचिकित्सा, संशय हे दोष उफाळून वर येतात. यातून विमर्ष, भावना आणि वासना निर्माण होतात; आणि विचाराच्या विषयापासून माणूस इथूनही दूर फेकला जातो!

माणूस जेव्हा, 'मी विचार करतोय' असं म्हणतो, तेव्हा हा विचार तो बुद्धी वापरूनच करत असतो. पण बुद्धीचेही चौदा प्रकार आहेत. मनिषा, धीषणा, धीः, बुद्धी, प्रज्ञा, शेमुषी, मती, पेक्षा, उपलब्धी, चित्, संविद, प्रतिपद, ज्ञप्ति आणि चेतना... ही बुद्धीच्या चौदा प्रकारांची नावे आहेत. जगातील कुठल्याही वैज्ञानिकाला माणसाच्या विचाराच्या पद्धतीचा अभ्यास करून बुद्धीचे प्रकार शोधून काढता आलेले नाहीत! परंतु हिंदूंच्या प्राचीन ज्ञानपरंपरेनं हे प्रकार शोधून काढले आहेत!

माणसाचं मूळ अस्तित्व 'एक विचार समूह' (Group of thought vibrations) म्हणूनच खरं अस्तित्वात आहे. त्यामुळेच तो विचार कसा करतो यावर त्याचं जीवन अवलंबून असतं! म्हणून योग्य विचाराची पद्धत कशी असते, तेही प्राचीन हिंदू-परंपरेनं सांगितलेलं आहे.

कोणत्याही विचाराची पहिली पायरी 'संविद' म्हणजे संवेदनेनं सुरू होते. नंतर 'आगु:' म्हणजे, संवेदनेत विचार करावयाच्या विषयाचे आगमन! 'प्रतिज्ञान' म्हणजे विषय जाणण्याचा

(पृष्ठ क्र. ४ वर)

प्राथमिक प्रयत्न! यानंतर पायरी येते नियमाची. एखाद्या विशिष्ट विषयाचा विचार, हा त्या विषयाशी संबंधित असलेले नियम पाळूनच करता येतो. पाचवी पायरी आहे – 'आश्रवा:'! इथे विषयाच्या विचाराचा ध्यास नेणिवेपर्यंत पोहचतो. नंतर 'संश्रवा:'! म्हणजे विचार करताना कोणत्याही तऱ्हेच्या क्लेषांची पर्वा न करण्याची वृत्ती, विचाराबरोबर उभी रहावी लागते. यानंतर विचार करावयाच्या विषयाच्या अंगिकारापर्यंत माणूस पोहचतो. हा अंगिकार झाला की विषयाचे अभ्युपगम होते. म्हणजे विचार, विषयाच्या निकट जातात! मग विचारांची 'प्रतिश्रव:' अवस्था येते. म्हणजे अभ्यास-विषय आता, विचार करणाऱ्याच्या जाणीव आणि नेणिवेपलिकडे जातो. यानंतर माणसाचा विचार 'सम्यक-धी:-समाधी' अवस्थेत पोहचतो. म्हणजेच माणसाचा विचार विशिष्ट विषयाचा ध्यास घेतो! इथे विचाराची प्रक्रिया पूर्ण होत असली तरी अभ्यास पूर्ण होत नाही. फक्त अमूक विषयाचा अभ्यास करायचा; असा विचार निश्चित होतो! पण अभ्यास-विषय आणि विचार या दोघांत 'समाधी-अवस्था' म्हणजेच समश्वसन-अवस्था निर्माण झाल्यामुळे अभ्यासासाठी म्हणून वेगळा पवित्रा घ्यावाच लागत नाही.

पण इथपर्यंत पोहचणं खूप कठीण असतं!

विषयाच्या विचाराची संवेदना, विषयाचे आगमन आणि तो जाणण्याचा प्रयत्न इथपर्यंत माणसं सामान्यत: एखाद्या विषयाचा विचार करतात. पण नियम – म्हणजे विषय जाणण्यासाठी आवश्यक असणारे बंधन, म्हणजेच जीवनपद्धती, म्हणजेच कर्मकांड करण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा व्यक्ति किंवा समूह यांच्यातील व्यक्तिगत अहंकार, माणसाला नियमबद्ध होऊ देत नाही! त्यामुळे माणसाचा अश्रव: म्हणजे नेणीव बिघडते. यातूनच अज्ञान, अविद्या आणि अहंमती असे दोष येतात. हे दोष प्रतिज्ञानानंतर – म्हणजे विषय जाणण्याच्या प्रयत्नाच्या वेळीच क्रमश: येतात आणि विचार करताना, कोणत्याही तऱ्हेच्या क्लेषांची पर्वा न करण्याच्या वृत्तीत जाऊन दृढमूल होतात. यातूनच विषयाला वेगळे वळण लागते. अभ्यास-विषय बाजूलाच पडतो. जाणण्याचा प्रयत्न, बंधनं न पाळण्याची वृत्ती, यातून नेणिवेत झालेला बदल एकमेकांत मिसळून विचारात गोंगाट निर्माण होतो. त्यामुळे, विचारांच्या क्रमविकासाची सूत्रबद्धता बिघडते. यातून क्लेष निर्माण होतात; म्हणजेच स्थापकत्व, निश्चितता आणि स्थिती यात बदल होऊन, मेंदूच्या विचार करणाऱ्या संस्थांमध्ये गोंधळ होतो. मस्तिष्कातील चेतनांमध्ये ऱ्हस्व-दीर्घता येते. शरीरातील रासायनिक दाब बदलतात आणि भावनात्मक वृत्ती चिकटतात! यालाच 'अज्ञान' असे म्हणतात!! एकदा भावनात्मक वृत्ती चिकटल्या की; वस्तुमान-विषय आणि विश्लेषण यांना समजून घेण्याची एकसंघता बिघडते! या बिघडलेल्या एकसंघतेलाच 'अविद्या' असे म्हणतात. या अविद्येच्या घनीभूततेमुळेच चुकीचे निष्कर्ष आणि चुकीचे निर्णय घेतले जातात!

आणि... तरीही आपण वारंवार म्हणत असतो,

"थोडा वेळ थांबा! जरा विचार करतो!!"

आहे की नाही गंमत?

– अरूण ताम्हणकर


# SBAJ ELECTRONICS

*We Manufacture:*

Dc to Dc Converters • Sinewave Inverters
U. P. S. Systems • M. F. Sender/Receiver
Dial/Line Tester • Solid State V. F. T. Relays
Digital Frequency Counters

*Factory:*

Plot No. N-12, W-79 B TTC, M.I.D.C. Industrial Area,
Rabale, Thane-Belapur Road,
Thane – 400 701, INDIA.

*Sales & Service Office:*

7, Bungla Bldg., Topiwala Lane, Dr. Bhadkamkar Marg,
Grant Road, BOMBAY – 400 007.
Tel.: 355318 – 355319

Everytime comes with
new Telecommunication/Telephone products in India.

Product people trust by their own.
Contact: Sales & Service Office in Bombay.

Branch/Representation:

**DELHI, BANGALORE, MADRAS, GUJARAT, M.P., CALCUTTA.**

# गूढाचे गूढ!



अरूण ताम्हणकर

**श्री** साईनाथांचे दृष्टांत गूढ आहेत, चमत्कारही गूढ आहेत. बाबांनी परदेशातील भक्तांनाही दिलेले स्वप्नदृष्टांत गूढ आहेत. एकूण बाबा म्हणजेच साक्षात गूढ आहेत!

म्हणून बाबांविषयीचे अनुभव लिहिताना हे 'गूढ' म्हणजे काय आहे? ज्या गूढ विद्यांच्या साधनांनी परिपूर्ण होऊन साईनाथांनी पाण्याचे दिवे प्रज्वलित करण्याचा चमत्कार घडविला त्या गूढविद्याच आज 'अंधश्रद्धे'च्या नावाखाली मोडीत काढण्याची आणि स्वत:ला बुद्धीप्रामाण्यवादी म्हणवून घेण्याची हौस तथाकथित सुशिक्षितांत वाढते आहे! आपल्यासारख्या साईनाथांच्या भक्तांनी, समाजात अवधानश्रद्धा वृद्धींगत करण्यासाठी अश्रद्ध प्रवृत्तींना निष्ठेनं वेळीच बांध घालणं आवश्यक आहे.

पण त्यासाठी बाबांचे आपल्याला आलेले गूढ दृष्टांत लिहिताना गूढविद्येच्या अनुभवांचे लेखक म्हणून आपणच काही गोष्टींची काळजी घेणं आवश्यक आहे!

गूढविद्येच्या संबंधीचे लिखाण; जनमानसाच्या आहार-विहार, विकार-विचार, समज-अपसमज, तसेच, जीवनांतील घटना-क्रमांच्या गंभीर आघाताने उत्पन्न झालेले अनुकंप; अस्थिर विचारवृत्तीने वर्धिष्णु होणारा मानसिक महारोग, आणि संघर्षजन्य क्लेशांपासून; मानवमात्रांनी, साधकांनी सुरक्षितपणे अधिक तरल अवस्था कशी प्राप्त करावी, हे सांगण्यासाठी गूढविद्या आणि तदनुषंगिक अनुभव-लिखाण प्रकाशमान झाले पाहिजे. अस्थिर आयुष्याच्या वैराण मरूभूमीतून प्रवास करतांना थकल्या भागल्या श्रांत पथिकास पियूष म्हणजे अमृत किंवा थंड पाणी पाजणारे असावे. गूढविद्येविषयींचे असमज-अपसमज या द्वैतातून उत्पन्न होणारे संशय आणि अविचार यांच्यातील सतत वाढणाऱ्या तणावामुळे रूग्णाइत झालेल्या आसन्नमरण पथिकास, नवजीवन देणारे, जीवनाच्या अंग-उपांगांना, संकट-समस्यांना, शास्त्रार्थ चर्चेतून प्रामाणिक समाधान, तथा ज्ञानाबरोबर श्रमभंजन करणारे ते असले पाहिजे.

समाजात कार्यरत असलेल्या समाजसेवक, शास्त्रज्ञ, अध्यापक, विद्यार्थी, आर्त, अर्थि, जिज्ञासू आणि ज्ञानी या सर्वांस गूढविद्येच्या वाचनाने, अध्ययनाने, वैचारिक चुका, साधनेतील त्रुटी, समाज सन्मुखता, यांचे स्पष्ट चित्र, आरोग्यदायी नेत्रांनी कसें पहावे, हे समजावून सांगणे हा विचार, गूढविद्येचे लिखाण, विश्लेषण करणाऱ्यांनी प्रथम करावयास हवा.

कोणत्याही साहित्यकृतीत, निरूपणात, परिचर्चेत, 'प्रस्तावना' उपक्रमणिकेचाच भाग मानला जातो. कृतीच्या पुढील भागातील विचारांच्या, शब्दक्रमांच्या, सिद्धांतांच्या वा प्रमेयांच्या, सम्यक क्रम-विकासाच्या पूर्णतेसाठी घेतलेला तो 'प्रथम श्वास' असतो. तो असमान नसावा, तो लघुप्राण नसावा, तर; तो समान – महाप्राण असावा; म्हणजे श्रोत्यांच्या, वाचकांच्या आणि साधकांच्या शरीरातील समान वायु आणि प्राणवायु यांना एकाद क्षणी 'स्पंदित' करण्याची कुवत असलेला प्राणायामातील तो 'दीर्घश्वास' असावा; किमानपक्षी 'गूढ' विषयांच्या संदर्भात तो 'असाच' असला पाहिजे, अन्यथा 'गूढ संकल्पना' रूग्णास अनुप्राणित करणारी न होता, तनुप्राण हरण करणारी होत असते. याच कारणांसाठी गूढविद्येवर 'अंधश्रद्धा' उत्पन्न केल्याचे दूषण सतत विस्तारित होत आलेले आहे.

रामायण– महाभारत या महाकाव्यांनी, 'माणसांनी' कसे असावे, आणि 'माणसें' कशी असतात – या दोन मूलभूत धारणांच्या क्रमविकासांचे 'दर्शन' दिलेले आहे. त्या कालानंतरचे बहुतेक सर्व लिखाण-प्रयोजन, विशिष्ट व्यक्ति, संघटना, समूह किंवा भूभाग-खंड, यांना सुखविण्यासाठी अधिक प्रकर्षाने प्रतिगामित केलेले आहे. या प्रकारातून गूढ विषयांचे लिखाण करणारे आजही सुटलेले दिसत नाहीत.

चमत्काराची झालर गूढविद्येच्या लिखाणांस अनिवार्य आहे, पण जर ती अंतर्मुख करणारी नसेल, तर ती त्या विद्येवरच कुऱ्हाड मारते, प्रत्यही नवनवीन गैरसमज उत्पन्न करते, दांभिकतेच्या नाविन्यपूर्ण षंढ कल्पनांना परिपोषित करते, परिणामी समाजविघातक घटकांना समाजस्वास्थ्यावर विघातक प्रहार करण्यासाठी उद्युक्त करते.

जबरदस्त घटनाक्रमांच्या तडित् घातात आंदोलित असलेली, आयुष्याची चाळीस-पन्नास वर्षे, 'आध्यात्मिक मनुष्य' या नावाच्या 'विरंगुळ्या'खाली; धर्मग्रंथ, अध्यात्म, वाचन, निरूपण, संवाद, व्याख्यान, पारायणें, पुरश्चरणें, आणि तत्सम प्रकार करणारे व्यक्ति किंवा समूह यांचे प्रामाणिक अध्ययन केल्यास– उत्तर आयुष्यात, हे सर्व, सतत उद्विग्न, भकास, अपयश, उध्वस्त, अपमानित, परित्यक्त, नैराश्य आणि आत्महनन याच मार्गाने जात असलेले दिसतात. शेवटी नैराश्याला वैतागून हे बहुतांशी, व्यसनी, उत्पाती, दांभिक, अप्रामाणिक, षंढ आणि भित्रे होत असतात. अशा घटनांना मध्य कल्पून प्रमेय मांडणारे, स्वत:स सुशिक्षित 'बुद्धिवादी' या शब्दांनी संबोधितात. अशाच 'बुद्धिवादी' विचार-सरणीने 'धर्म म्हणजे अफूची गोळी आहे' – असा कुठल्यातरी काळांत प्रमेय मांडला होता.

नंतरच्या काळात या नवविचारावर नव्यासमाजाची नवविचारसरणी ठरली, वर्गसंघर्ष, वर्ण-संघर्ष, भावना-संघर्ष, यांची दिशा ठरली, वैफल्यग्रस्त अवस्थेत, नवनिर्माणाच्या आभासांत 'धर्मशास्त्र' हा विचार अडगळीच्या खोलीत ठेवला गेला आणि शेवटी अंधश्रद्धा नावाचे दूषण त्यांस भूषविते झाले.

हे असे कां व्हावे, तर कांहींनी 'अध्यात्म' हा 'विरंगुळा' अशा अर्थाने जगण्यात चूक केली म्हणून, कां, आणखीही प्रमाद आहेत –

रामायण – महाभारत काळानंतर महाकाव्यांनी स्पष्ट केलेल्या संकल्पनांना, विचारांना, प्रथम समजण्यात व नंतर जगण्यात अंतर उत्पन्न झाले. कोणत्याही अंतरात 'भय' असते. हे भय पुढील काळात दोन ध्रुवांना सांधणारा 'सेतु' ठरले.

संस्कार आणि संयम हे दोन, विचार नावाच्या 'वातीला' दिलेले एकसंघ असे पीळ असतात, यांनी वात बलवान् होत असते. अव्यभिचारी निरीक्षण तथा अनिर्बंध परीक्षण या स्निग्धतेचे तेल वापरून, ज्ञानदीप प्रकाशमान होत असतो. रामायण – महाभारत काळानंतर पीळ, वात, तेल यांना आकलन करण्याची विसंगती उत्पन्न झाली. या प्रत्येक घटकांत 'अन्तर' उत्पन्न झाले. जीवचक्राच्या प्रवासातील अविभाज्य असलेली भय नावाची दरी पार करण्याच्या दुर्दम्य इच्छेने निघालेला पथिक, ऐन सुरूवातीच्या वाटेत, विसंगतीमुळे अप्रकाशित दिव्याचे वजन पेलत पेलत, मार्ग शोधता शोधता, स्वत:चेच पार्थिवांत रूपांतर करूं लागला. मार्गदर्शकाविना पुन: तो नव्या जन्मांतरात गुंतला; आता असा प्रश्न उभा राहिला की, जीवन-मृत्यु नावाच्या या साप-शिडीच्या खेळात, 'भया'शिवाय कोणता 'सेतु' आपल्या पथिकास मिळू शकेल.

रामायण-महाभारत या महाकाव्यांची रचना केवळ रहस्यमय 'इतिहास कथा' म्हणून केलेली नसून, अंतिम सत्य साध्य करण्यासाठी मुमुक्षूंना पथदर्शी असलेल्या, 'निष्ठावानांची मांदियाळी' सांगणाऱ्या या सत्य अनुभूतिजन्य 'जीवन कथा' आहेत. रामायण-महाभारत या महाकाव्यांतील विचार कूट, म्हणजे समजण्यास कठिण आहेत. 'जे जे कूट ते ते झूट' असे म्हणून समजण्याचा समजुतदारपणा पथिक हरवून बसला, आकलनात भय उत्पन्न झाले की असूयांचे आवर्त वाढत असतात, या आवर्तांच्या गतीत जे जे येते ते ते दिशाहीन होत असते, आपण सर्व दिशाहीन अवस्थेत भरकटून या वातावरणांत सतत नवनव्या असूयांचीच भर घालीत असतो. अशाच भरीमुळे कधीतरी 'महाभारत' घडले हे आपण सर्व सोयिस्कररीत्या विसरतो आहोत.

श्रीमद्भगवद्गीतेच्या प्रथम अध्यायातील श्राद्ध-तर्पणादि संबंधीच्या अर्जुनाच्या शंकेस– 'तूं ही शंका सोडून दे' – यापेक्षा अधिक समाधान मिळालेले दिसत नाही. मानववंशाच्या क्रमविकासासाठी 'महाभारत' घडणे आवश्यक होते, त्याच विकासासाठी 'माणूस' घडणे अनिवार्य होते; यासाठी विंध्याचलाजवळ असलेल्या आचार्य सांदिपनींच्या वैष्णव तंत्र अनुशासनात 'नराचा नारायण' घडविण्याची प्रक्रिया अविरत प्रवाहीत होती. 'माणूस' उत्पन्न करण्याच्या प्रयोग प्रक्रिया आणि त्यांचा वापर, कूट रहस्य पद्धतीने केला असल्याने त्यांच्या विनियोग प्रक्रिया करण्याच्या विचारावर स्वयं आचार्यांनी एका वासंतिक उत्सवात श्रीकृष्णावर बंधने घातली, अनुशासन सन्मुख वत्स श्रीकृष्णाने स्वत:च्या वेणुनादास साक्षी ठेवून आचार्यांच्या अनुशासनाचा 'आदेश' शिरसावंद्य मानला. 'माणूस' घडविण्याच्या प्रयोग प्रक्रियेत नर आणि नारायण या दोनही संकल्पनेच्या अंतरांना सांधणारा श्रीकृष्ण आदर्श महामानव ठरला. महाभारताचा एकमेवाद्वितीय 'निरीक्षक' म्हणून प्रामाणिक भूमिका त्यानेच निभावली.

याउलट, महाभारतात वर्णिलेले रथी, अतिरथी, महारथी, युद्धविशारद, वीर, धीर, या सर्वांचे निरीक्षण करून महाभारत घडण्यासाठी कोणता मानसिक उद्रेक आधारभूत होता, हे समजणे आवश्यक आहे.

भौतिक शरीरधारी जीव हा एक वलयांकित तेज बिंदु असून, तो स्वत:च्या मर्यादा कक्षेत सतत गतिमान फिरत असतो. विचार नावाच्या लहरीस तेज संस्कार करण्याच्या प्रक्रियेत, अनवधानाने एक वलय त्यास सापडले, त्याचे नाव 'प्रतिष्ठा'वलय असे होते, तथापि नवनिर्मितीच्या नवआवृत्तीत असलेल्या जीवाने त्यास 'विचार' असेच नाव दिलें, आता . हा

प्रतिष्ठाविचार आणि जीवबिंदु या दोहोंना एकत्रित करून समूहातील व्यक्तिमत्त्व, समूहस्वयं (सोशियल सेल्फ) सिद्ध झाला. नंतर स्वयं आणि समूहस्वयं यांच्या गतिमानतेमुळे दोहोत 'अंतर' उत्पन्न झाले. या भयातून 'धन' किंवा 'जीविका' नावाचे तिसरे तेजोवलय उत्पन्न झाले. आता 'स्वयं' संज्ञेस 'प्रतिष्ठा' आणि 'जीविका-धन' यांच्या माध्यमाने सृष्टि दिसूं लागली. शरीरधारीचे सर्व आकलन, विचार – मी (म्हणजे स्वयं) प्रतिष्ठा – जीविका – या त्रिस्थळीतून प्रस्थान करू लागले. सतत वृद्धिंगत होणाऱ्या प्रतिष्ठा आणि जीविका यांच्यातील भयाने त्यांच्या एकूण प्रक्रियेस भाव-भंगिमांचा गंधोन्मादि लेप दिला. परिणामी स्वयं व समूहस्वयं हे दोघेही प्रतिष्ठेचे बळी ठरले, गुलाम ठरले. भाव-भंगिमांच्या आरोह-अवरोहात, शरीरधारी मनुष्य-प्राणी स्वतःचे पारदर्शकत्त्व विसरला; अगतिक होवून त्याने स्वतःतील 'बाष्पवृत्ति' जागृत केली, – ज्यामुळे दर्शन म्हणजे दिसणे, जड म्हणजे तणावपूर्ण होते, ते अश्रु, म्हणजे बाष्प, – सतत अश्रु गाळणे म्हणजे बाष्पवृत्ति. – हे सर्व त्याने केवळ प्रतिष्ठेसाठी केले. प्रतिष्ठा म्हणजे नेमके काय हे समजावितांना महाकाव्य सांगते –

या प्रतिष्ठेचे अठरा हजार प्रमुख भाग असून त्याचे उपभाग अधिक आहेत, जी दिली जाते – घेतली जाते, गुजगोष्टी करते – करविते, खाते – खाऊ घालते, अशा षड्विध लक्षणांनी युक्त, परिवर्तनशील जीव भावनांची एकत्रित सांगड म्हणजे प्रतिष्ठा आहे. यासच प्रीति – म्हणजे हवीहवीशी वाटणारी – असेही म्हणतात. ही प्रीति किंवा प्रतिष्ठा अश्वत्थ आहे. (अ म्हणजे नाहीं, श्व म्हणजे अस्तित्व आणि थ म्हणजे – आज किंवा या क्षणी.) ही प्रतिष्ठा जीवमात्रांना आ-भा-सिल होते. (आ म्हणजे पर्यंत, भा म्हणजे जीवांचे तेज, स म्हणजे संज्ञा उत्पन्न होणे किंवा जाणवणे.) ही अश्वत्थ प्रतिष्ठा अशी आभासित होते. ही नियती देवीची सखी, राज्ञी असून 'माया'चेच विस्तित रूप आहे! प्रकृतिचाच हा एक परिपोष असतो.

प्रातःस्मरणीय भगवान् वेदव्यासांनी समजाविलेली प्रतिष्ठा ही अशी आहे. या प्रतिष्ठेसाठी, प्रगतीच्या चरमसीमेवर असलेल्या त्या मानव समाजात महा-संघर्ष घडला. या महाभारताने – आचार्य, मातुल, बंधु, सखा, संबंधी, कुटुंबीय यांना तर नामशेष केलेच, पण त्याहीपेक्षा श्रीकृष्णाच्या म्हणजे वार्ष्णेय कृष्णाच्या तोंडून अर्जुनास, – तूं ही शंका सोडून दे – असे उत्तर देवविले. आजच्या विज्ञानाच्या भाषेत न्यूटनच्या 'हाऊ' (कसें) या प्रश्नाचे समाधान ॲरिस्टॉटलच्या 'व्हाय' (कां) या प्रमेयपद्धतीने दिले गेले.

सांदिपनी-शिष्य श्रीकृष्ण अनुशासित असला तरी, नंतरच्या कालात अनुशासन अस्तित्वात नव्हते. नेमके इथेच आणि इथूनच, वेदांत आणि गूढविद्या, हे विचार परिपोषासाठीं अनिवार्य असलेले दोन, 'ज्ञान प्रवाह' वेगळे झाले. परिणामी विचार-संकर आणि त्यांची दिशाहीन वृद्धि यांना सबल करण्यासाठी पुढील काळात व्यक्ति, समूह, स्वतःचे अस्तित्त्व टिकविण्यासाठीं प्रत्यही नव-नवीन वाद-वादंगे उत्पन्न करते झाले. विचार कसा करावा यापेक्षा व्यक्ति, समूह, प्रतिष्ठा तथा जीविका या 'चौचाल' मार्गाने विचारधारा दृढ झाली. विचार कसा करावा हे स्पष्ट सांगणारे धर्मशास्त्र, गूढविद्या मोडीत निघाले. 'वैचारिक वाताहातीचे नवे महाभारत' घडण्याचे संकेत सर्वत्र गोंगाटून एकवटूं लागले.

या सर्व प्रकारातून – जुने जाऊ द्या मरणालागूनि – असा आधार घेऊन विचार कसा करावा हे शिकविणाऱ्या वेदविद्या, गूढविद्या यांच्या संहितांना विरोध करणे हे शहाणपणाचे ठरले. खरोखरीच ऋषी, मुनी, संत, महात्में, धर्मशास्त्र – यांनी मानव समाजासाठी कांहीही केले नाहीं कां, असा आणखीही एक प्रश्न उभा राहिला, पुनः एकदा विचार अकर्मण्यतेकडे प्रवास करूं लागले. संत-सज्जनांनी, साधु-महात्म्यांनी, जे जे केले ते ते सर्व 'गूढ' होते, कूट होते.

त्यांनी केलेल्या कूट रचनांचा परिपोष काय आहे किंवा होता –

मनुष्य हा श्वसन करणारा प्राणी आहे. कोणतेही आकारमान (फ्लेक्झिबल इलेक्ट्रो-मॅग्नेटिक सिस्टम) श्वसन करीत असते. श्वस किंवा श्वास म्हणजे अस्तित्व किंवा आकारमान टिकविण्यासाठी केलेली नियमित प्रक्रिया, (कंटिन्युअस प्रोसेस) मेंदू तरतरीत राहून, शरीरांतर्गत स्नायु-तणाव कमी होऊन, श्वसन केल्याने, अधिक काळापर्यंत 'जिवंत' राहाता येते. हे श्वसन म्हणजेच आयुष्य असेही आपण म्हणत असतो.

सांप्रत काळी, प्राणवायु कमी आणि अवांतर वायु अधिक अशी विषय श्वसनक्रिया आपण सर्व करीत असतो. शरीरातील पेशींना गरजेपेक्षा कमी प्राणवायु मिळाल्याने त्या अकाली वृद्ध झाल्या आणि आपणांस निरूत्साह, जाड्यत्व आले. आपल्या प्रत्येक कृतीत, चालीत, वागण्यात, एक विशिष्ट लय असते, एक संगीत असते. ही लय, संगीत, त्यां त्यां व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा मूलभूत घटक असते. आपल्या अस्तित्त्वाचा, आपल्या जिवंतपणाचा तो चालता-बोलता पट असतो. गूढविद्यांच्या भाषेत या लयीस, या संगीतास, शरीरातून अव्याहतपणें उत्सर्जित होणाऱ्या 'धिः' स्पंदन लहरी असे म्हणतात. आधुनिक विज्ञानाच्या भाषेत यांना 'अट्रॅक्टंट केमिकल्स' असे म्हणतात. या धिःस्पंदन लहरी जेव्हा असमान किंवा व्यय अवस्थेत जातात तेंव्हा त्यांच्या परिणामास व्याधि, (व्यय+आ+धिः = व्याधि) असे म्हणतात. या धिः स्पंदन लहरींच्या विशिष्ट वहनामुळे आपले मस्तिष्क, स्मृती आणि विचार यांचे, चयन आणि मंथन करून योग्य निर्णयाप्रत कार्यरत होत असते. यांच्या विशिष्ट पद्धतीच्या सम्यक वहनामुळे स्वयं – प्रतिष्ठा – धन यांच्यातील वेगळेपण आपण अनुभवू शकतो. या प्रक्रियेस सम+आ+धिः किंवा समाधि असे म्हणतात. एकूण काय आपणा सर्वांस योग्य श्वसनक्रिया करता आली पाहिजे, हे निश्चित.

सर्व धर्मांतील संत-सज्जन यांच्या रचना, छंदानुगामी म्हणजे श्लोक, ओवी अशा काव्यप्रकारात आहेत. या रचनांमध्ये विशिष्ट

शब्दसमूह आणि नादसमूह एकत्रित आहेत. संत-महात्म्यांनी आपल्या या समाजासाठी काय केले, या प्रश्नाचे समाधान शोधण्यासाठी त्यांच्या छंदानुगामी रचनेत आपण आपला 'श्वास' 'एक' केला पाहिजे. 'एक श्वास' केल्याने आपले संगीत, आपली लय, एका विशिष्ट कोनात 'समेत' येते. यामुळे रक्तदाबादि क्रियांवर अवलंबून असणाऱ्या सर्व प्रक्रिया एका विशिष्ट गतीत 'स्पंदित' होतात, त्यामुळे अन्नरसोत्सर्गी तेजशलाका (बायोप्लाझ्मिक रेडिएशन्स) सर्व शरीरसंचारी होतात, परिणामी, धि:स्पंदन लहरी व्याधिकडे न जाता समाधिकडे प्रवास करतात. त्यांमुळे आपण अधिक 'प्राण' घेऊ शकतो. अधिक 'तरूण' होऊ शकतो. आपण 'योग्य' विचार करू शकतो.

वातावरण कितीही दूषित असले तरीही त्यात 'प्राणवायु' असतोच, 'व्याधि'ग्रस्त अवस्थेमुळे तो आपण योग्य 'प्रमाणात' घेऊ शकत नाही.

संतांच्या छंदानुगामी रचना निसर्ग, प्राणी, सृष्टी यांना सांधणारा 'सेतु' असतो. वृक्ष, वल्ली, वनस्पती यांच्यातून उत्सर्जित होणारा नाद आणि धि:स्पंदन लहरी, यांना एकरूप करणारा विशेष 'शुद्ध ताल' संतांच्या छंदानुगामी रचनेत असतो. मनुष्य – प्राणी – वनस्पती हे तीनही सृष्टिचक्राचेच परिपोषित भाग असतात. या तिन्हींना एकत्रित, एकसंघ अवस्थेत स्पंदित करणारा लय-नाद-ताल या त्रिवेणी संस्कारांचे एकरूप म्हणजे 'वेणुनाद' असतो. अशी वातावरण एकतानता उत्पन्न कशी करावी याचे एकुलते एक उत्तर, म्हणजे संत-सज्जनांच्या छंदानुगामी रचनेत आपला श्वास मिसळणे हेच आहे. यांस 'समश्वसन' असे गूढविद्या म्हणते.

आता हे समश्वसन करण्याचा परिपाठ म्हणजे श्लोकांच्या किंवा ओव्यांच्या निर्दिष्ट लयीत, छंदात, नेहमीची श्वासप्रक्रिया एकरूप केली, म्हणजेच आपल्या सर्व क्रियांचा श्वास सतत छंदानुगामी केला असता, आपल्या शरीरातील संपूर्ण रासायनिक ऊर्जा (केमिकल व्होल्टेज) परिवर्तीत होऊन, शरीराचा संपूर्ण मेटाबॉलिझम बदलतो, असमानता समानतेत बदलते. जीवन-मृत्यु या 'अंतरातून' आपण 'स्वतंत्र' होत असतो.

'गूढ' हे अनुभवाने समजत असते. अनुभव म्हणजे, घटनाक्रमांचा 'अनुशासित' परिणाम.

आजमितीस या जगात वेगवेगळ्या एकशे तेहेतीस धर्मविचारांच्या प्रणाली असून, पैकी; सनातन (हिंदु), बौद्ध, जैन, शीख, कन्फ्युशियस, ताओ, शिन्तो, इस्लाम, यहुदी, ख्रिश्चन आणि पारसी या धर्मविचारसरणींना मानणाऱ्यांची संख्या, एकूण जगाच्या लोकसंख्येच्या तीन-चतुर्थांश इतकी आहे. या अकरा आणि उरलेल्या सर्व धर्मांचे संस्थापक, मुखंड, उद्गाते यांनी आपल्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा कालखंड, कोणत्या ना कोणत्या प्राण्यांच्या संगतीत व्यतीत केलेला दिसेल. प्राण्यांशी असलेला यांचा 'अनुबंधकाल' हाच यांच्या जीवनक्रमात 'परिवर्तन काल' झालेला आपणांस दिसतो. सनातन धर्माच्या आश्रमीय अनुशासन पद्धतीत प्राण्यांना 'यश' असेच संबोधिले आहे. कमी अधिक प्रमाणात, श्रीमद्भगवद्गीता आणि उद्गाता श्रीकृष्ण यांचेशी – यांच्या जीवनक्रमांशी – सर्व धर्माचार्य अधिक निकटचे दिसतात. आज विश्वात लिपि असलेल्या तीनशे ऐंशी भाषा असून, लिपि नसलेल्या तरीही बोलीभाषा (कलोक्वियल) दहा हजारांहून अधिक आहेत. लिपि असलेल्या सर्व भाषांमधून श्रीमद्भगवद्गीता भाषांतरित झालेली दिसते. म्हणजे जगात ज्यांस ज्यांस अक्षर ओळख आहे तो तो 'श्रीकृष्ण' हा शब्दसमूह जाणतो. भारतातील सर्वच भाषांमधील लोकगीतांवर, लोककथांवर आणि लोककलांवर श्रीराम किंवा श्रीकृष्ण यांच्या स्मृतींची छाप दिसते.

त्याचबरोबर बहुतेक संत-महंतांच्या सर्व अनुभवांचे अनुबंध श्रीराम, श्रीकृष्ण यांचेशी, म्हणजेच वैष्णवतंत्र विचारप्रणालीशी तादात्म्य कां पावावेत – याचेही उत्तर श्रीमद्भगवद्गीतेच्या इतर अध्यायांशी संबंधित आहे. सांदिपनीशिष्य, श्रीकृष्ण हा त्यां काळातील वैष्णवतंत्र अनुशासनात 'सिद्ध' झालेला शेवटचा 'पुरुषोत्तम' होता. त्याच्या एकट्याच्याच विचारप्रवाहात 'मनुष्य' उत्पन्न करण्याची पूर्ण प्रक्रिया एकवटली होती, संपूर्ण महाभारताचे उत्तरदायित्त्व त्याने 'स्वत:'कडेच घेतले. पुढील काळातील 'मनुष्य' उत्पन्न करण्याची असामान्य 'धर्मकामास्यु वृत्ति' तथा शुद्ध विचार वहन करणारा श्रीकृष्ण हा एकमेव ज्ञानब्रह्म ठरला, नंतरच्या अपूर्वत्त्वास पूर्णत्त्वांत नेणारा तो कॅटॅलिटिक एजंट झाला म्हणून पुढील युगात कृष्णभक्ति वृद्धिंगत झाली. 'भक्तिमार्ग' ही विचारधारा जीवनाचेच एक अंग झाली. नाम, जप, तप, यज्ञ, या जीवन साफल्य साधनांचा, आदेश आणि उपदेश स्वयं श्रीकृष्णच झाला. तो 'कर्मयोगी' या संज्ञेस योग्य ठरला, पूजनीय ठरला.

रहस्य, छंद, वृत्त किंवा कूट अशा पद्धतीच्या विचारांचे संस्कार, तंत्रशास्त्र करीत असते. तंत्रशास्त्राच्या अध्ययनात अक्षरशास्त्र, उच्चारशास्त्र, छंदशास्त्र, यंत्रलेखन, कूटलेखन असे अठराशे विषय अंतर्भूत होतात. छंदानुगामी रचनानिश्चित अनुवाक, – म्हणजे विशिष्ट उच्चार-पद्धतीवर आधारलेली असते. अशा रचनेत छंदांतर्गत शब्दसमूह घन (पॉजिटिव्ह) त्याचा ताल म्हणजे उच्चार ऋण (निगेटिव्ह) असतात. यांच्या निर्दिष्ट पद्धतीच्या आवर्तनाने प्रचंड शक्तिचे विद्युत् चुंबकीय क्षेत्र (इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड) उत्पन्न होते. ज्या शरीरातून ही प्रक्रिया सातत्याने सुरू आहे त्यां शरीरातील कुण्डलिनिमार्ग – ऑप्टिक बीम – कार्यरत होतो. सभोवतालचे वातावरण आणि आवर्तनकारी शरीर यांच्यात विशिष्ट पद्धतीची सायुज्यता – रेझोनन्स – उत्पन्न होते.

म्हणून संत-सज्जनांनी या समाजासाठी काय केले – हे जाणण्यासाठीं त्यांच्या छंदानुगामी रचनाकृतीत आपण आपला श्वास मिसळला पाहिजे. परिपूर्ण शास्त्रीय सत्यावर आधारलेल्या विचारधारांना 'अंधश्रद्धा' म्हणणे यांस बुद्धिमत्ता कसे म्हणावे याविषयीं विचार तथा मीमांसा करणेची आज नितांत आवश्यकता उत्पन्न झाली आहे.

या सर्व विचारांच्या सत्य प्रकाशात 'गूढ'

विषयाचे लिखाण, भाष्य, मीमांसा तथा परिचर्चा करणेपूर्वी 'अवधान' असणे अगत्याचे आहे. व्यक्तिगत मोठेपणा, स्तुती, लाचारी, लोभ, असूया, अप-समज किंवा मत-मतांतरे यांना अवधानाच्या कसोटीवर घासावे– तपासावे लागते. अन्यथा गूढविद्येच्या प्रांतात लिखाण, सभा किंवा परिचर्चा करणे असंयुक्तिक असते. प्राणीमात्रांचे जीवन ही नुसतीच 'समस्यांची मालिका' नसते, तर समस्यांचे निराकरण करणारा 'मनुष्य' होण्यासाठी, पार करावा लागणारा तो 'पुरुषार्थ सोपान' असतो.

आपल्या सर्वांचे जीवन हा साप-शिडीचा खेळ असतो. याचे फासे नेहमीच खेळाडूस हवे तसे पडत नसतात. ते 'अवधान'पूर्वक पाडावे लागतात. सनातन धर्म विचारांचे, संत-कृतींचे, गूढविद्येचे आकलन 'अवधान' संपन्नतेवर अधिष्ठित असते.

वेद, उपनिषद, अरण्यके, धर्मशास्त्र यांनी जीवन तरण्याचा आनंदमय मार्ग सांगितला.

अव्याहत उद्रेकांमुळे उत्पन्न होणाऱ्या आंदोलित, अस्थिर विपन्न अवस्थेतून आनंदमय मार्ग कसा शोधावा हे 'अनुभवसिद्ध' करण्यासाठीं तंत्रग्रंथांची निर्मिति झालेली आहे.

इंद्रधनुष्यातील प्रकाशमान होणाऱ्या रंगछटा प्रत्येकास दिसत नाहीत, तर, प्रकाश परावर्तनाच्या विशिष्ट 'कोनात' असलेल्यासच दिसतात. ध्रुवीय प्रदेशात दिसणारे प्रकाश-पडदे पृथ्वीच्या इतर भागात दिसत नाहीत म्हणून प्रकाश-पडदे अस्तित्वात नसतात असे म्हणणे आततायीपणाचे ठरेल. आपणास जे दिसत नाहीं, जे समजत नाहीं, ते ते सर्व बुद्धिगम्य नाहीं असे म्हणून समजावून घेण्याचा समजुतदारपणा आपण सोडून देवूं नये. गूढविद्यांच्या अध्ययनातही एक विशिष्ट 'कोन' असतो, तो कोन साधला की, 'गूढ' चमत्कार राहात नाहीं, ते 'सत्य', आकलनीय 'अनुभव' होत असते.

सृष्टिचक्राचा विशिष्ट पद्धतीने होणारा क्रमविकास गूढ आहे, पृथ्वीचे स्वत:भोवती फिरणे गूढ आहे. जीवन हे गूढ आहे, त्याबरोबरच मृत्युही गूढ आहे. ज्याचा बुद्धिजन्य उलगडा– (सायंटिफिक व्हेरिफिकेशन) आपल्याकडे नसतो त्यांस आपण 'चमत्कार' म्हणत असतो. या प्रत्येक चमत्काराचेही एक शास्त्र असते, नियम असतात, याच्या अनिश्चिततेचेही नियम असतात (लॉ ऑफ अन्-सर्टेनिटी). या सर्व चमत्कारांचा 'साक्षात्कार' गूढविद्येच्या, तंत्रशास्त्राच्या निष्ठावान अध्ययनाने होत असतो.

अव्यभिचारी निरीक्षण तथा अनिर्बंध परीक्षण या मार्गाने 'विज्ञान' जसजसे 'प्रज्ञाना'त रूपांतरित होईल तसतसे गूढविद्या 'अंधश्रद्धा' आहे की, 'अवधान श्रद्धा' आहे हे अध्ययनाने आपणांस समजूं शकेल.

रचनात्मक तांत्रिक परंपरेचा अनुशासित अंतेवासि, महासन्निध धाम अनुशासक, हाजिर-ए-इमाम हाजी मलंग बाबा आणि श्री साईनाथांच्या प्रेरणेने केलेले सदर लिखाण-प्रयोजन, या दोन महान साधकांनाच अर्पण केले आहे.

(गूढविद्या आणि तदनुषंगिक विचार परंपरा 'निष्ठावान्' जाणत असतात. निष्ठावान् होण्यासाठी 'अवधान' आवश्यक असते आणि अवधानासाठी 'बंदगी' (सबमिशन) अपरिहार्य असते.)

आपण सर्व एकदिलाने, एक श्वासाने, एक विचाराने, हाजिर-ए-इमाम साहिबांची 'कदम बोसी' करून–

गूढविद्यांचे 'वेणुनाद' तुम्हां, आम्हां, आपणां सर्वांस, कमी विकसनशील अवस्थेतून अधिक विकसनशील अवस्थेप्रत जाण्याच्या मार्गात 'पथदर्शी' होवोत; या संकल्पासह, महासन्निध अनुशासक बाबांच्या 'रूबरूं' (समोर) आपण सर्व 'खास बंदगी' आज अदा करूं,– या चिंतनात, या जन्मात, या भूमीत– आणि 'इथेच' 'जन्मांतर' 'निरंतर' संपते.

शिवम् शान्तम् अद्वैतम्!

---

## साई–अनुभव...

### उदीचा प्रभाव

गोव्यात सर्वच धर्मांचे लोक राहातात. लहानपणी मी काही मुसलमानांच्या घरी साईबाबांचे फोटो पाहिले होते. त्यावेळी ते मुस्लिम धर्माचे कोणी पुण्यपुरुष असावेत असा माझा समज झालेला होता. कालांतराने साईबाबा हे सर्वधर्मीय लोकांचे श्रद्धास्थान असल्याचे वाचनात आले. सर्वधर्मसमभाव मानणाऱ्या साईविषयी मला हळूहळू उत्कंठा वाटू लागली. प्रत्येक गुरुवारी मनोभावे साईंची शोडषोपचारे पूजा मी सुरू केली. पुढे १९७८ साली सपत्निक व मुलांसह मी साईदर्शन घेऊन आलो. त्यांची शोडषोपचारे पूजा करताना मला मानसिक समाधान लाभत होते. नंतर मी १९८६ साली व १९९१ साली पुन्हा कुटुंबासह शिरडीला जाऊन आलो. बाबांच्यावर माझा दृढ विश्वास बसला.

माझी आई गेल्या एक वर्षापासून हृदय विकाराने आजारी आहे. तिचे वय आज ऐक्याऐंशी वर्षे आहे. हृदयविकाराचा झटका आल्यावर तोंडावाटे काहीही घेईनाशी झाली. तिला रामबंदर येथील सरकारी इस्पितळात दाखल केली. घरात अन्न शिजत असताना, परिस्थिती बरी असताना माझ्या आईची तशी उपासमार होत होती. मी बाबांना साकडे घातले व साईंची उदी भक्तिभावाने आईच्या तोंडात घातली. एके रात्री अर्धवट झोपेत असताना नाकातून पोटात घातलेली ट्यूब तिने ओढून बाहेर काढली. मी चमच्याने थोडे पाणी तिच्या पोटात घातले. ते ती प्याली. आम्हास अतिशय आनंद झाला. साईंची उदी प्रभाव दाखवत होती. माझ्या आईची प्रकृती हळूहळू सुधारू लागली. बाबांनी माझ्या आईला चालते-बोलते केले. बाबांच्या उदीच्या प्रभावाचे मला इतरही अनेक अनुभव आले आहेत.

–रोहिदास नाईक

# श्री साईंचे सत्य चरित्र

## —अध्याय १८ वा—

सटीक गद्य अनुवाद–
**ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)**
बंड गार्डन रोड, पुणे.

''मद-अनुग्रहः – १''

(माझ्यावर, म्हणजे खुद्द हेमाडपंतांवर झालेल्या बाबांच्या कृपाप्रसादाचे वर्णन भाग-१)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरु साईनाथांना नमस्कार असो.

हे सर्वश्रेष्ठ व नित्य सद्गुरो! तुझा जयजयकार असो. हे प्रत्यक्ष परब्रह्मच (सत्य+ब्रह्म) असलेल्या सद्गुरो! तुझा जयजयकार असो. ईश्वराच्या मोह घालणाऱ्या शक्तीला ताब्यात ठेवणाऱ्या (माया+नियंत्या) तुझा जय असो. तू आपल्या भक्तांना अनुभव देऊन ही अखिल सृष्टी खोटी (जगत्+मिथ्या) आहे, असे दाखवून देतोस. हे आरंभ व अंत नसलेल्या (अन्+आदि+अंता), सुख-दुःख, शोक-हर्ष इत्यादी द्वंद्वांपलीकडे असलेल्या (अतीता) व कोणत्याही मनोविकारांनी क्षुब्ध न होणाऱ्या सद्गुरो! तुझा विजय असो. आत्मस्वरूपाची ओळख करून देणारा (निज+रूप+बोधिता) तूच एक आहेस. मिठाची बाहुली (सैंधवाची पुतळी) सागरात आंघोळ करण्यासाठी शिरली (रिघाली) तर ती बाहेर येईल काय! असे कधी घडणे शक्य नाही. तुझ्याबाबतीतही तसेच असते. (एकदा का कोणी तुझ्या दर्शनाला आला की तो तुझ्याजवळ कायमचा चिकटतो.) वेद व श्रुती ज्याच्याबद्दल रात्रंदिवस (अहर्निशी) वादविवाद करतात व ज्याचा कोणाला तर्कही करता येत नाही (अलक्ष्य), ते परब्रह्म तू नुसत्या बोटाने आपल्या भक्तांना सहज दाखवितोस. दैवयोग आलाच आणि एकदा का तुझा वेढा (गर्का) पडला की तेथे हा आपला किंवा हा परका असल्या हलक्या विचारांना (कु+तर्का) तेथे जागा नसते. (ओ. १-५)

मागील अध्यायात ब्रह्माच्या गुंत्याचे उकलून स्पष्ट करणे (आविष्करण) झाले. ब्रह्मजिज्ञासूवरच्या लोभाचा ताबा (आवरण) ब्रह्मज्ञान प्राप्त होण्यासाठी कसा अडथळा आणणारा (प्रतिबंध+कारक) असतो, याचे वर्णन झाले. आता (श्रोत्यांनी) माझ्यावर झालेल्या अनुग्रहाची कथा आदराने ऐकावी, म्हणजे त्यांच्या मनाला बाबांच्या मार्गदर्शन करण्याच्या स्वभावाची प्रचिती येईल. हीसुद्धा एक गोड कथा आहे. ती मी जशीच्या तशी (यथा+अर्थता) सांगतो. श्रोत्यांनी आपल्या कल्याणासाठी ती स्वस्थ चित्ताने ऐकावी. कथा ऐकण्यासाठी श्रोते तत्पर (सादर) असले, म्हणजे वक्त्याला उल्हास व उत्सुकता (आदर) वाटते व दोघांच्या हृदयात प्रेमाचा पाझर फुटून ते आनंदयुक्त होतात. (ओ. ६-९)

साईबाबा अगदी थोडासुद्धा रागलोभ (बुद्धिभेद) न करता, ज्याचा जसा अधिकार असेल तसाच त्याला खऱ्याखुऱ्या (साचार) मार्गाचा उपदेश करतात. कित्येकांचे असे मत आहे की गुरुने सांगितलेले (मंत्र किंवा उपदेश) दुसऱ्या कोणाला सांगितले तर ते विफल होते (त्याचे फळ मिळत नाही). परंतु हे केवळ काल्पनिक व अर्थाशिवायचे उगाचच ढोंग (स्तोम) आहे. प्रत्यक्ष काय, पण स्वप्नात सांगितलेला चांगला उपदेशदेखील (सत्+बोधक) सगळ्यांना सांगितला पाहिजे. याला काही आधार किंवा पुरावा (प्रमाण) नाही, असे म्हणाल तर बुधकौशिक ऋषींचा आधार आहे. त्यांनी स्वप्नात दीक्षारूपाने प्राप्त झालेले **'रामरक्षा स्तोत्र'** सर्वांना कथन केले आहे. सद्गुरु हे वर्षाऋतूतील ढग (घन) आहेत. मोठ्या कौतुकाने ते स्वानंदरूपी पाण्याचा (जीवन) वर्षाव करतात, तर ते काय कोंबून ठेवण्यासाठी! स्वतः मनसोक्त पिऊन सर्वांना पाजावे. लेकराची हनुवटी धरून त्याच्या आरोग्यासाठी माता जशी त्याला मायाळूपणे औषधाची गोळी (गुटी) पाजते, तसेच बाबांचे

(उपदेश करण्याचे) हस्तकौशल्य (हातवटी) होते. उपदेश करण्याचा त्यांचा मार्ग गुप्त नव्हता. आपल्या भक्तांचा हेतु कोणत्या रीतीने अचानक ते पुरवित असत, ते लक्ष देऊन ऐका. (ओ. १०-१६)

सद्गुरुचा सहवास धन्य होय! त्याचे महत्व कोण वर्णन करु शकेल! सद्गुरुचे एकेक बोल (उक्ती) आठवले की आपली ते वर्णन करण्याची स्फूर्ती उचंबळून येते. ईश्वराची भक्तिभावाने स्तुतिपूजा (अर्चन) केली असता आणि गुरुची सेवा व पूजा केली असता गुरुकडून प्राप्त होणारे (गुरु+गम्य) ज्ञान प्राप्त होते, इतर साधने फुकट (फोल) जातात. विक्षेप (मनाचा गोंधळ) आणि आवरण (मोहाचा पडदा) यांच्यामुळे संसाराचा मार्ग अंधुक (संकीर्ण) झालेला असतो. गुरुच्या उपदेशरूपी दिव्याचे किरण अडथळ्याशिवायचा (निर्विघ्न) मार्ग दाखवितात. गुरु प्रत्यक्ष ईश्वर आहे. ब्रह्मा, विष्णू व महेश्वर (शंकर) आहे. गुरुच वास्तविक परमेश्वर आणि परात्पर (सर्वात श्रेष्ठ) ब्रह्म आहे. (पहा गुरुगीता– **गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुर्साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥३२॥**) गुरु माता आहे व पिताही आहे. देव रागावला (कोपला) तर गुरु वाचवितो (त्राता); परंतु गुरु रागावला तर कोणीही वाचवू शकत नाही, हे सदासर्वदा जाणावे. (पहा गुरुगीता– **शिवक्रुद्धे गुरुस्त्राता। गुरौ क्रुद्धे शिवो न हि। तस्मात्सर्व प्रयत्नेन श्रीगुरु शरणं व्रजेत्॥४४॥** संत कबीर तर गुरुच्या स्तुतीत याच्याही पुढे जातात. **गुरु गोविन्द दोनो खडे, का के लागू पाय। वलिहारि गुरु की जिन, गोविन्द दियो मिलाय॥** गुरु व गोविन्द (साक्षात् ईश्वर) दोघेही समोर उभे राहिले, तर कोणाचे पाय आधी धरावे? गुरुचीच श्रेष्ठता मानली पाहिजे; कारण त्यांच्यामुळेच गोविन्दाची (ईश्वराची) भेट होते.) गुरु प्रवृत्तीचा (प्रापंचिक व्यवहाराचा) मार्ग दाखविणारा, पुण्यक्षेत्रे व व्रते यांची माहिती सांगणारा, तसेच निवृत्ती (संसारातील उपाधीपासून मुक्तता करून घेणे) बद्दल, धर्म व अधर्म (शास्त्रसंमत व शास्त्रविरुद्ध आवरण) यांच्याबद्दल, विरक्ती (ऐहिक सुखोपभोगाबद्दल अनासक्ती) बद्दल आणि वेदश्रुतीबद्दल व्याख्यान करणारा (प्रवक्ता) आहे. (ओ. १७-२२)

बुद्धीला सावध करून (डोळे उघडून) संत स्वस्वरूपाचा सोहळा दाखवितात आणि अतिशय कोमल अंतःकरणाचे व दयाळू ते भक्तीसंबंधीच्या आगळ्या इच्छाही (डोहळे) पुरवितात. त्यामुळे भक्तांची विषयांबद्दलची वासना मावळते, झोपेतही ज्ञानच बोलले जाते (चावळे) आणि संतांची कृपा होऊन विवेक व वैराग्य ही जोडीने एकत्र वाढणारी (जावळे) फळे हाती येतात. संतांचा सहवास घडला, त्यांची सेवा घडली व त्यांच्यावर प्रेम जडले, तर संत स्वतः भक्तांची इच्छा पुरविणारे कल्पवृक्ष असल्याने (भक्त+काम+कल्प+द्रुम) त्यांच्या सर्व कष्टांचे ते निवारण करतात. (म्हणून श्रोत्यांनी) सदा संतांना चिकटून राहावे (सत्+परायण), संतांच्या कथा ऐकाव्यात आणि त्यांचे चरण वंदावेत, म्हणजे सर्व पापे धुऊन (पाप+क्षालन) निघतील. (ओ. २३-२६)

(इंग्रजांच्या अमदानीत) लॉर्ड रे हे मुंबई राज्याचे राज्यपाल (इलाखाधिपती म्हणजे गव्हर्नर) असताना त्यांनी क्रॉफर्ड या नावाच्या मुंबई शहराच्या महापालिकेच्या आयुक्ताच्या (म्युनिसिपल कमिशनराच्या) कारभाराबद्दल चौकशी मांडली होती (क्रॉफर्डशाही घातली पालथी). (मुंबई शहरातील सध्याच्या 'महात्मा फुले' मार्केटचे पूर्वीचे 'क्रॉफर्ड मार्केट' हे नाव याच अधिकाऱ्याचे इ.स. १८६९ मध्ये दिलेले नाव होते.) त्यावेळी प्रसिद्ध पावलेले एक गृहस्थ साईबाबांच्या भक्तीला लागले. हा तीन प्रकारच्या दुःखांनी (ताप+त्रय म्हणजे आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक दुःखे) भरलेला संसार खोटा आहे, हे पटल्यामुळे व व्यापारधंद्यात तोटा आल्यामुळे त्यांच्या मनाला मोठा वीट (कंटाळा) आला आणि ते सरसामान (लोटा) घेऊन घराबाहेर पडले. चित्त अस्थिर झाल्याने दूर प्रवासाला जावेसे त्यांना वाटले व कुठेतरी सुखाने एकटेच (एकान्तात) राहावे, असा मनाचा विचार पक्का केला. जीव जेव्हा मोठ्या संकटात पडतो तेव्हा त्या कष्टावस्थेत त्याला देव आठवतो आणि मग तो देवाला एकसारखा हाका मारून (करी हाकाटी) त्याच्या पाठीशी लागतो परंतु जोपर्यंत पापकर्मे करणे कमी होत नाही (दुष्कर्मां लागे ओहोटी) तोपर्यंत देवाचे नाव आठवत येत नाही. (पण ते एकदा का ओहोटीस आले की) मग त्या जीवाची भक्ती (सप्रेमता) पाहून देव त्याची संतांशी भेट करवून देतो. तसेच या भक्ताचे झाले. त्यांना संसाराने फार बेजार झालेले (कातावलेले) पाहून त्यांच्या स्नेह्यांनी त्यांना हिताचा चांगला सल्ला दिला, तो ऐका, ''जा हो! आनंद समर्थ साईच्या दर्शनाला शिरडीला जा ना! त्या अत्यंत दयाळू संताला विनवा ना! त्यांचा एक क्षणही सहवास लाभला की लगेच आपले चंचल मन शांत (निश्चल) होते, तात्काळ हरिचरणी जडते आणि मन तेथून परत येणे अवघड होते. देशोदेशीचे लोक तेथे जमतात, साई महाराजांच्या चरणी लोळण घेतात, त्यांच्या आज्ञेत वागतात आणि त्यांची सेवा करून आपले इच्छित मनोरथ (अभीष्ट) प्राप्त करून घेतात. अशी साईबाबांची कीर्ती प्रसिद्ध आहे. लहानथोर (आबालवृद्ध) सर्व त्यांना जाणतात. त्यांना जर तुमची दया (काकुळती) आली, तर तुमच्या दुःखाचे निवारण होईल. आजकाल (सांप्रत) शिरडी हे मोठे पवित्र स्थान आहे. रात्रंदिवस तेथे यात्रा चालू असते. तुम्हीसुद्धा दर्शन घेऊन पहा. संतांचे दर्शन नेहमीच कल्याणकारी असते.'' पाऊस न पडल्याने उदास व द्रव्यहीन (अवर्षणे उद्विग्न अकिंचन) झाले असता ढगांनी अकल्पितपणे खूप पाऊस पाडावा किंवा भुकेने व्याकूळ झाले असताना जसे पंचपक्वान्न ताटात वाढले जावे, असेच त्या स्नेह्यांनी दिलेल्या सल्ल्याचे झाले (तितकाच आनंददायक तो सल्ला झाला). त्या भक्ताला तो सल्ला मानवला आणि अनुभव घेऊन पहावा, असे मनाला वाटून त्यांनी शिरडीचा रस्ता धरला. शिरडीत पोहोचल्यावर बाबांचे दर्शन घेतले, पायी लोटांगण घातले आणि तात्काळ त्यांचे डोळे तृप्त होऊन (निवाले नयन) मनाला समाधान झाले. सनातन (पुरातन काळाच्या), स्वयंज्योति (स्वयं प्रकाशित), निरंजन (अदूषित) पूर्णब्रह्म साईचे रूप (ध्यान) पाहून त्यांचे मन सुप्रसन्न झाले. त्यांना वाटले पूर्वपुण्याईच्या बळाने (पूर्व+अर्जित सभाग्यता) हे पाय हाती लागले आणि दर्शनाने मनाला शांतता व

निश्चितता (चिंतारहित स्थिती) लाभली. (ओ. २७-४२)

त्यांचे आडनाव (उपनाम) साठे होते. ते निश्चयाचे मोठे पक्के होते. त्यांनी गुरुचरित्र पोथीचे (हा फार जुना, गोड, रसाळ व प्रासादिक ग्रंथ, म्हणजे श्री सरस्वती गंगाधर यांनी क्षेत्र औदुंबर, श्री नरसोबाची वाडी, श्री गाणगापूर निवासी श्री समर्थ सद्गुरु नृसिंहसरस्वती महाराज यांचे लिहिलेले चरित्र होय! हा ग्रंथ महाराष्ट्रात पूर्वीपासून फार प्रसिद्ध आहे आणि याचे हजारो ठिकाणी नियमाने रोज अध्ययन, पठण होते व प्रसंगानुसार पारायणे व सप्ताहही होतात.) पारायण नेम धरून खंबीरपणाने आरंभिले. सप्ताह पूर्ण होण्याच्या रात्री (निशीं) बाबांनी त्यांना दृष्टांत दिला. आपल्या हातात पोथी घेऊन बाबा स्वत: त्यांना अर्थ समजावून सांगू लागले. स्वत: आसनावर बसून समोर साठ्यांना बसवून गुरुचरित्राची पोथी घेऊन बाबा निरूपण करायला तयार झाले. बाबा ग्रंथाचे आवर्तन (पारायण) करीत होते, पुराणिकासारखे कथा सांगत होते आणि साठे स्वस्थचित्त बसून श्रोत्याप्रमाणे आदरपूर्वक गुरुकथा ऐकत होते. साठे विचारात पडले की हे काय असे उफराटे (उलटे)? त्यांना मोठे आश्चर्य वाटले, त्यांचा कंठ प्रेमाने दाटून आला आणि (मनात म्हणाले), "हे दयाळा साईनाथा! अज्ञानरूपी अंध:काराच्या उशीला (अज्ञान+तम+उशीसी) मानेपाशी ठेवून वासनारूपी कुशीवर (ऐहिक सुखभोगांकडे तोंड करून) जे घोरत पडले असतील, त्यांनाही तू जागे करतोस. अशाच प्रसंगी (मी घोरत पडलो असताना) पहा! मला थापटी मारून गुरुचरित्ररूपी अमृत (पीयुषासी) हे कृपाळा! तू मला पाजलेस." असो. असा दृष्टांत घडल्यावर साठे संपूर्ण (तत्वतां) जागे झाले आणि ही घडलेली सगळी गोष्ट त्यांनी काकासाहेब दीक्षितांना सांगितली. ते म्हणाले, "काकासाहेब! या दृष्टांताचा अर्थ काही कळत नाही. बाबाच ते जाणण्याला समर्थ आहेत. बाबांच्या मनात काय आहे, हे समजत नाही. तुम्हीच त्यांना सर्व विचारा ना! गुरुचरित्राचा पाठ (पारायण) पुन्हा सुरु करावा की झाला एवढा पुरा समजावा? बाबांचा हेतु काय आहे, ते विचारावे म्हणजे मनाला शांती (विसावा) वाटेल." मग काकासाहेबांनी योग्य वेळ पाहून बाबांना साठ्यांच्या स्वप्नाबद्दल सांगितले आणि म्हणाले, "देवा! या दृष्टांताने आपण साठ्यांना काय जाणविले? सप्ताह असाच सुरू ठेवावा का येथून पुढे थांबवावा? आपणच साठ्यांना याचा अर्थ स्पष्ट करून सांगावा (विवरावा) आणि त्यांना मार्ग दाखवावा. साठे मोठे भावार्थी भक्त आहेत. त्यांच्यावर कृपा करून त्यांची (दृष्टांताचा हेतु जाणण्याची) ही इच्छा (आर्ती) पुरी करावी एवढीच माझी आपल्या चरणी विनंती आहे." मग बाबांनी आज्ञा केली, "एक आवृत्ती (पारायण) आणखी एकदा होऊ द्या. ही गुरुची पोथी वाचल्याने भक्त पापरहित (निर्मळ) होतात. या पोथीचे पारायण केले तर वाचणाऱ्याचे कल्याण होईल, परमेश्वर प्रसन्न होईल आणि संसारातील मोहाचे पाश (भव+बंधन) सुटतील. (ओ. ४३-५७)

(बाबांनी साठ्यांना स्वप्नात दिलेल्या दृष्टांताचा माझ्या मते आणखी असाही अर्थ असावा – "आपल्या हातात पोथी घेऊन बाबा त्यांना अर्थ समजावून सांगत होते. स्वत: आसनावर बसून समोर साठ्यांना बसवून पुराणिकासारखे निरूपण करीत होते." म्हणजे मला वाटते, भक्ताने पोथीचे पारायण कसे करावे किंवा ती रोज कशी वाचावी, याचे प्रात्यक्षिकच बाबा दाखवित होते. कोणत्याही श्रोत्याला समोर बसवून किंवा बाबांचे चित्र वा मूर्ती समोर ठेवून पोथीचे निरूपण मधून मधून अर्थासह केले तर पोथी वाचल्याचे खरोखरच सार्थक होईल. साठ्यांकडून पोथीचे आणखी एक पारायण करून घेण्यात साठ्यांनी या शिकवणीप्रमाणे पोथी पुन्हा वाचावी असा तर बाबांचा हेतु नसेल? असो. पुढे अध्याय ४१ मध्येही बाबांनी डहाणूच्या देव मामलतदारांच्याही स्वप्नात येऊन ज्ञानेश्वरी वाचण्याबद्दल असेच सांगितले आहे. ("पोथी समजते का मज विचारिलें॥१६१॥ बाबा वदती पोथी पढतां। फारचि आपण घाई करितां। वाचा पाहू ती मजदेखितां। निकट बैसतां मजपाशीं॥१६४॥")

हे जेव्हा बाबा बोलले तेव्हा मी तेथे बाबांचे पाय चेपत होतो (पाद+संवाहन) मला आश्चर्य वाटले (विस्मय+आपन्न) आणि मनात विचार आला, "बाबा! हे असे कसे? साठ्यांना अगदी थोड्या श्रमाने (अल्प+आयासे) फळ मिळाले. माझी या पोथीच्या पारायणाची वर्षानुवर्षे तशीच गेली आणि साठ्यांना सातच दिवसात त्याचे फळ मिळाले! साठ्यांनी गुरुचरित्र सात दिवसात एकदाच वाचले (एकच पाठ केला) आणि मी तर गेली चाळीस वर्षांपासून ते वाचत आहे, त्याचा काहीच का विचार नाही? एकाला सात दिवसात फळ आणि दुसऱ्याची सात वर्षे (बाबांचे प्रथम दर्शन घडल्यापासूनची सात वर्षे) फळ न मिळता फुकटच का! हा दयारूपी मेघ केव्हा वर्षाव करेल म्हणून मी चातक (केवळ आकाशातून पडणारे पावसाचे थेंब पिणारा पक्षी) वाट पहात आहे. असा एक दिवस येईल की ज्या दिवशी हा संतचूडामणी (संत+अवतंस) प्रसन्न होईल आणि मला उपदेश देऊन माझ्या मनाची हौस फेडेल! (असला मत्सर बहुतेक शिष्यांच्या किंवा भक्तांच्या बाबतीत घडत असतो. त्यांना समजत नसते की गुरू शिष्याचा किंवा देव भक्ताचा अधिकार पाहून योग्य वेळी अनुग्रह करीत असतात, पण त्यांना धीर नसतो. हेमाडपंतांनाच ते नाराज झालेले पाहून राधाबाई देशमुखीणीच्या कथेच्या रूपाने बाबांनी नाही का लगेच अनुग्रह केला व पुढेही अध्याय ४१ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे होळीच्या दिवशी मूर्तीरूपाने त्यांच्या घरी आले आणि पुढे आपल्या देहत्यागानंतर श्री साईसच्चरितासारखा अप्रतिम व प्रासादिक ग्रंथ लिहून घेतला!) भक्तवत्सल श्री गुरु साई यांची नवलाई पहा. माझ्या मनात जे विचार (वृत्ति) आले ते त्यांनी तात्काळ जाणले. अज्ञाना (अविद्ये) मुळे असेच कोट्यानुकोटी बऱ्या-वाईट वासना (उत्कट इच्छा) माणसाच्या मनात लागोपाठ येतात. त्या सर्वांची जाण बाबांना असते. "मन चिंती ते वैरी न चिंती" (वैऱ्याच्यासुद्धा मनात येणार नाही असे दुष्ट विचार एखाद्याविषयी आपल्या मनांत येऊ शकतात) ही म्हण सर्वांना खात्रीपूर्वक ठाऊक आहेच. इतर कोणाला आपल्या मनातले दुष्ट विचार कळत नसले तरी साई महाराज ते तात्काळ जाणतात. परंतु

अतिशय कृपाळू अशी ती माऊली ते सर्व दुष्ट (निंद्य) विचार पोटात घालते (आवरून ठेवते) आणि परोपकाराच्या चांगल्या (अनिंद्य) विचारांना योग्य वेळ पाहून चालना (प्रोत्साहन) देते. म्हणून माझ्या मनातले ते विचार जाणून बाबा मला म्हणाले, "उठ, त्या शाम्याकडे (माधवराव देशपांड्यांकडे) जा आणि पंधरा रुपये दक्षिणा घेऊन ये. त्याच्यापाशी थोडा वेळ बैस. एकमेकांशी गोष्टी करा आणि दक्षिणा देईल ती घेऊन लगेच परत ये." साईनाथांना माझ्यावर कृपा करावीशी वाटली म्हणून दक्षिणेचे निमित्त करून मला म्हणाले, "आताच्या आता शाम्याकडे जा आणि माझ्यासाठी रुपये मागून आण." अशी आज्ञा झाल्यावर तेथे बसण्याची कोणाला हिंमत (प्राज्ञा) होईल! बसलो तर आज्ञाभंग (अवज्ञा) होईल म्हणून मी आज्ञा घेऊन तात्काळ उठलो आणि शामरावांकडे गेलो. शामरावही नुकतेच स्नान करून धोतर नेसत बाहेर उभे (ठेले) होते. स्नान नुकतेच आटोपून धुतलेली वस्त्रे नेसून ते तोंडाने नामस्मरण करीत धोतराची चूण (निरी म्हणजे वस्त्र नेसताना हाताच्या बोटांवर पाडलेली एकावर एक घडी) घालीत होते. मला ते म्हणाले, "काय मध्येच कुठे? मशिदीतून आलात वाटते? तोंडावर (चर्येवर) अस्वस्थता का बरे? असे आज एकटेच का? या बसा. मी आताच न्हालो. हा पहा धोतर चुणीत आलो. मी जातो आणि देवावर पाणी घालून लगेच परत आलो समजा. आपण पानाचा विडा खा (तांबूल भक्षण). तोवर मी पूजाविधी आटोपून घेतो. मग आपण सावधानपूर्वक शांतपणे गोष्टी करू." माधवराव घरात गेले. मग तेथेच खिडकीवर नाथभागवताची पोथी (भागवताच्या एकादश स्कंधावरील एकनाथ महाराजांची मराठी टीका) होती ती सहज हातात घेतली. दैवयोगाने (यदृच्छेने) ग्रंथ उघडला आणि कल्पना नसताना जेथे वाचायला आरंभ केला तर सकाळी जो अर्धवट मी टाकून दिला होता तोच भाग वाचायला आला. मनाला खूप आश्चर्य वाटले. सकाळी जे वाचन आळसाने वाचायचे टाकले (हेळसिले) ते बाबांनी पुरे करविले आणि वर मला शिस्त (नियमन) लावून दिली. नियमन, म्हणजे नियमाने (ठराविक गोष्ट ठराविक वेळी न चुकता करणे) वाचन, हे निश्चितपणे व संपूर्णपणे वाचून (परिशीलन) झाले नसताना ती नियमित उपासना अपुरी टाकून आपल्या जागेपासून हलू नये. (ओ. ५८-७९)

आता या नाथभागवतासंबंधी थोडीशी लहानशी गोष्ट (उपकथा) ओघाने आठवली ती टाकता येत नाही. तरी श्रोत्यांनी ती आदरपूर्वक ऐकावी. गुरुभक्तीच्या रसाने पूर्ण भरलेले (परिप्लुत) हे नाथभागवत (एकनाथी भागवत) साईबाबांची कृपा पावलेले (साई+कृपा+पात्र+भूत) काकासाहेब (हरि सीताराम) दीक्षित दररोज वाचत असत. अखिल जगाच्या उद्धारासाठी नारायणाने (श्री विष्णू भगवानाने) ब्रह्मदेवरूपी भूमीत जे पेरले, ज्यापासून ब्रह्मदेवाने नारदरूपी शेतात (क्षेत्रीं) पिकांची कणसे (ज्यात धान्याचे दाणे भरलेले आहेत असा धान्याचा तुरा) उगवली (बीज आणले), ज्या शेतातल्या कणसांच्या कणसांची व्यासमुनींनी (बादरायणीं) दहा लक्षणांनी, म्हणजे गुणधर्मांनी युक्त संग्रह (संवगणी) केला (सृष्टीची उत्पत्ती, देव, वीर इ. पुराणासाठी लागणाऱ्या दहा लक्षणांनी युक्त श्रीमद्भागवत महापुराण रचले), ज्याची (व्यासपुत्र) शुकदेवाने परीक्षित राजारूपी (पांडवांचा नातू, जो त्यांच्यानंतर हस्तिनापूरचा सम्राट झाला आणि सर्पदंशाने मृत्यू येणार हे कळल्यामुळे शुकमुनींकडून भागवताची पोथी ऐकत बसला होता) खळ्यात (उघड्या जागेत) निवडणी करून मळणी (कणसे झोडपून किंवा बैलांकडून पायांनी तुडवून धान्य काढणे.) केली (यासाठी पहा. श्रीमद्भागवत पुराण, स्कं. २, अ. ९, श्लो. ३१-४५), ज्याला श्रीधर स्वामींनी (चौदाव्या शतकातील गीतेचे व भागवताचे संस्कृत भाषेतील टीकाकार) हडप मारले (सूपाने वारा घालून कचरा काढला), ज्याचे जनार्दनस्वामींनी (इ.स. १५०४-१५६८ दौलताबादच्या दत्ताचा अनुग्रह पावलेले संतकवी, एकनाथ महाराजांचे गुरु) माप केले (मोजणी केली किंवा किंमत ठरविली) आणि ज्यापासून पैठणच्या एकनाथ महाराजांनी स्वादिष्ट गोड (रस+भरित) अशा पुष्कळ (उमाप) पक्वान्नांचे जेवण तयार केले, त्या भागवत महापुराणातील अकरावा स्कंध म्हणजे भक्तिरसाच्या सुखाचा खजिनाच (खाणच) आहे. ते हे बत्तीस खणांचे (भागांचे म्हणजे अध्यायांचे) जणूकाय श्रीकृष्ण भगवानांचे क्रीडा करण्याचे स्थान (वृंदावन, गोकुळाशेजारीचे एक पौराणिक स्थान) काकासाहेब नित्य वाचत असत. (येथे हेमाडपंतांनी एकनाथी भागवताला बत्तीसखणी, म्हणजे बत्तीस अध्यायांचे म्हटले आहे. ते बरोबर नाही. एकनाथी भागवताचे फक्त एकतीसच अध्याय आहेत. मूळ संस्कृत भागवत पुराणातील अकराव्या स्कंधाचे, ज्याची एकनाथी भागवत ही मराठी टीका आहे, त्याचेही एकतीसच अध्याय आहेत. तसेच एकनाथी भागवताच्या एकतीसाव्या अध्यायातील ४६६ व्या ओवीतही 'एकतिस खणांचे वृंदावन' असेच म्हटले आहे. **हा एकादश नव्हे जाण। एकतिसां खणांचे वृंदावन। एथ नित्य वसे श्रीकृष्ण। स्वानंदपूर्ण निजसत्ता॥४६६॥** तेव्हा वाचकांनी येथे 'बत्तीसखणी' ऐवजी 'एकतीसखणी' असे वाचावे.) या नाथभागवताचे काकासाहेब दीक्षित दिवसा निरूपण करीत असत आणि रात्री (एकनाथ महाराजांनीच रचलेले) भावार्थ रामायण वाचीत असत, जो ग्रंथदेखील गुरुची आज्ञा म्हणून दीक्षितांना प्रमाणभूत झाला (यथार्थ ज्ञानाचे साधन झालेला) होता. नाथभागवत म्हणजे भक्तिसुखरूपी अमृताचे सारच आहे आणि जणूकाय ज्ञानेश्वरीचा (ज्ञानेश्वरांच्या भगवद्गीतेवरील मराठी टीकेचा) दुसरा अवतारच आहे. (ज्ञानेश्वरीनंतर सुमारे २८० वर्षांनंतर लिहिलेला तितक्याच महत्त्वाचा दुसरा ग्रंथ आहे.) खरोखरच हा एकनाथ महाराजांचा महाराष्ट्रावर मूर्तिमंत उदंड (मोठा) उपकार आहे. पहाटे स्नान करून, नित्य कर्म, साईपूजन व इतर देवांची पूजा-अर्चा, आरती (निरांजन) व नैवेद्य वगैरे आटपून, दुधाचा प्रसाद (पय:+प्रसाद) व थोडा फराळ (अल्प+आहार) करून श्रोत्यांसह नित्यनियमाप्रमाणे दीक्षित ही पोथी सविस्तरपणे व आदरपूर्वक वाचत असत. ज्याच्या गोडीमुळे भगवत्परायण तुकाराम महाराजांनी भंडारा नावाच्या डोंगरावर एकान्तात एक हजार पारायणे केली, त्याची गोडी काय वर्णावी! हा ग्रंथ महाप्रासादिक (ईश्वराच्या प्रेरणेने रचलेला

व श्रोत्यांना कृतार्थ करणारा) आणि दिव्य (अलौकिक) आहे आणि दीक्षित निष्ठावंत शिष्य होते म्हणून समर्थ साईंनी लोकांच्या उद्धारासाठी तो वाचण्याची त्यांना आज्ञा केली होती. या उद्धवगीतेत (भागवताच्या अकराव्या स्कंधाला 'उद्धव गीता' असे म्हणतात. उद्धव हा श्रीकृष्णाचा यादव-कुळातला सेवक होता, ज्याला श्रीकृष्णाने निजधामाला जाण्याअगोदर केलेला उपदेश या स्कंधात आहे) भगवंत प्रगट होतो म्हणून तिचे जे भक्त पारायण करतात, त्यांना रानावनात (तपश्चर्येसाठी) न जाताच भगवंताची प्राप्ती होते. महाभारतात श्रीकृष्ण व अर्जुन यांचा संवाद (श्रीमद्भगवद्गीता) आहे. त्यापेक्षा श्रीकृष्ण व उद्धव यांचा संवाद (उद्धव गीता) रसाळ (स+रस) आहे. तो उपदेश या नाथभागवतात एकनाथ महाराजांच्या प्रेमळ शब्दांत जशाच्या तसा वर्णिलेला आहे. असो. असा हा प्रासादिक ग्रंथ ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरी (भावार्थदीपिका) सह समर्थ कृपाळू साईनाथ शिरडीत दररोज वाचवित असत. (ओ. ८०-९४)

सखाराम हरी उर्फ बापूसाहेब जोग (बाबांचे आणखी एक भक्त मेघाच्या मृत्यूनंतर, म्हणजे इ.स. १९-१-१९१२ नंतर बाबांची मशिदीतील दुपारची आरती शेवटपर्यंत यांनीच केली होती.) यांना हा ग्रंथ (नाथभागवत) रावबहादुर साठ्यांच्या वाड्यात वाचण्याची बाबांची आज्ञा (नियोग) होती व तिचा भक्तांना फार उपयोग होत होता. दररोज (प्रति+अही) बाबा कित्येक भक्तांकडून त्यांच्या कल्याणाच्या इच्छेने या ग्रंथाचे कळवळून श्रवण करवित असत. बाबांचे अनुग्रह करण्याचे कौशल्य (कुसरी) अगाध होते. भक्त जवळ असो की दूरगावी (देश+अंतरीं) असो बाबा त्याच्या हृदयात जवळच (सन्निधच) राहून नाना तऱ्हेने (परोपरीने) त्याला उपदेश करीत असत. आपण जरी मशिदीत बसत असत तरी कोणाला काहीतरी कार्य नेमून देऊन त्याला आपली शक्ती देऊन ते पूर्ण करवून घेत असत. बापूसाहेब जोगांना रा. ब. साठ्यांच्या वाड्यात पोथी वाचावयाला सांगत व जोग ती नित्यनेमाने वाचीत आणि श्रोतेही ऐकायला येत असत. दुपारी जेवणानंतर जोगसुद्धा नेहमी बाबांकडे जाऊन त्यांचे चरण वंदून, उदी (विभूति) घेऊन, पोथी वाचणे सुरू करण्याची आज्ञा घेत असत. ते कधी ज्ञानेश्वरी वाचीत तर कधी नाथभागवताचे मोठ्या आनंदाने पारायण सुरू करीत आणि अर्थाचे व्याख्यान करीत असत. अशाप्रकारे जोगांना पोथी वाचण्याची आज्ञा दिल्यानंतर जे जे भक्त बाबांच्या भेटीला येत त्यापैकी कित्येकांना ते लगोलग ती पोथी ऐकण्यासाठी पाठवत असत. कधी कधी बाबा स्वत: लहान-सहान (संक्षिप्त) गोष्टी सांगत व श्रोता ते कानात (निज+कर्ण+संपुटी) साठवू लागे तोच बाबा त्याला म्हणत, "जा, उठ. वाड्यात पोथी ऐकायला जा." तो भावार्थी श्रोता पोथी ऐकायला गेल्यावर पोथीतही अशीच कथा निघे की ज्यामुळे बाबांनी पूर्वी सांगितलेली गोष्ट मनात आणखी दृढ होई आणि तिचा अर्थ पूर्णपणे समजे. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी किंवा एकनाथांची वाणी बाबांच्या गोष्टीचाच पुनरुच्चार (अनुवाद) करे आणि याचे श्रोत्यांना आश्चर्य वाटे. एखाद्या पोथीचा नेमका (विवक्षित) भाग वाचावा अशी आज्ञा (नियोग) नसतानाही, बाबांनी आधी सांगितलेल्या गोष्टीच्या सुसंबंधाचा भाग (सुयोग) पोथीत जोगांच्या वाचण्यात येत असे. भगवद्गीता आणि भागवत हेच दोन ग्रंथ भागवत धर्माचे सारभूत आहेत, जे जोग दररोज वाचत असत. भगवद्गीतेवरील मराठी टीका म्हणजेच ज्ञानेश्वरी, जिचे नाव 'भावार्थदीपिका' ही आहे आणि भागवताचा अकरावा स्कंध हा एकनाथ महाराजांच्या नाथभागवतातील परमार्थ निरूपणाचा आधार (भूमिका) आहे. (ओ. ९५-१०८)

असो. या भागवत धर्माच्या रूढीप्रमाणे (प्रचार) नित्यक्रम म्हणून मीही ते नेहमी (निर्+अंतर) वाचीत असे, परंतु त्यादिवशी त्यात खंड (अंतर) पडला. त्यातील एक कथा अर्धी वाचली आणि मंडळी मशिदीत जाण्यासाठी निघाली. मीही पोथी वाचता वाचता तशीच ठेवली आणि मशिदीकडे धाव मारली. मनात इच्छा होती की बाबांच्या गोष्टी ऐकाव्यात, परंतु बाबांच्या मनात दुसरेच काही होते. भागवत वाचण्याचे सोडून इतर काही कष्ट करण्याने बाबांना संतोष (तृप्ती) वाटत नव्हता. म्हणूनच नित्य पाठापैकी बाकी राहिलेला भागवताचा भाग बाबांनी माझ्याकडून जबरदस्तीने (नेटेपाटें) वाचविला, असे वाटते. असे बाबांचे मोठे कौतुक आठवले की हृदयात प्रेमाचा पूर लोटतो. (ओ. १०९-११२)

असो. येथे नाथभागवताची कथा संपली आणि त्याबद्दलची लहानशी गोष्टही सांगून झाली. माधवरावांची पूजा आटोपली आणि स्वारी बाहेर आली. "अहो! बाबांचा निरोप आहे. तोच घेऊन मी घेऊन आलो आहे." "शाम्याकडून पंधरा रुपये दक्षिणा घेऊन ये." मी बाबांची सेवा करत बसलो होतो तोच एकदम बाबांना तुमची आठवण झाली आणि ते मला म्हणाले, "ऊठ, शाम्याकडे जा आणि दक्षिणा घेऊन परत ये. त्याच्या घरी बैस, घटकाभर (विळभर) त्याच्याबरोबर गोष्टी कर आणि बोलूनचालून मग परत ये." हे ऐकून माधवराव आश्चर्यचकित झाले आणि म्हणाले, "रुपयांऐवजी नमस्कार घेऊन जा. हीच आमची दक्षिणा." त्यावर मी म्हणालो, "असो. हे एक झाले. पंधरा नमस्कार बरोबर घेतले (पदरी बांधले). परंतु गोष्टी करायला बसा की लवकर (वहिलें)! काय गोष्टी सांगता त्या सांगा आणि माझी ऐकण्याची इच्छा पुरवा ना (फेडा श्रवणपांगा)! बाबांच्या पवित्र यशगाथेरूपी गंगेत बुडी मारून पापांचे क्षालन (दुरित+भंगा) करू या." तेव्हा माधवराव म्हणाले, "तुम्ही बसा. या देवाचा (माधवराव साईबाबांना देव म्हणून संबोधित असत आणि त्यांना अरेतुरे म्हणण्याचीही त्यांचीच फक्त छाती होती.) खेळ असाच आहे. तुम्हीसुद्धा सर्व जाणताच आहात. क्षणभर आराम करा. हे घ्या पान व हा घ्या काथा. डब्यात चुना व सुपारी आहे. हा मी एका मिनिटात डोक्यात टोपी घालून (तयार होऊन) आलोच. साईबाबांच्या लीला अमर्याद (अगाध) आहेत. किती म्हणून मी तुम्हाला सांगू! शिरडीत आल्यापासून आपण थोड्या का पाहिल्यात! मी तर केवळ खेड्यातला अडाणी माणूस (खेडवळ), आपण सगळी शहरात राहणारी सुशिक्षित माणसे. आपणांजवळ त्या अतर्क्य (अकळ) लीला मी काय वर्णन कराव्यात (वानाव्या)!" असे म्हणून माधवराव घरात

गेले, देवाला फूलपान वाहिले, लगेच टोपी घालून बाहेर आले आणि माझ्याबरोबर बोलत बसले, "या देवाच्या (साईबाबांच्या) लीलांची कल्पना करता येत नाही. त्याचे कौशल्य कोणाला बरे समजेल! त्याच्या खेळाचा पारच (अंतच) लागत नाही. खेळ खेळून तो खेळा-निराळा असतो. तुम्ही विद्येचे केवढे भोक्ते (विद्या संपादन करण्याची केवढी आवड असणारे)! एकाहून एक विद्वान (ज्ञानी)! आम्हा गांवढळांना बाबांचे हे न समजणारे (अकळ) चरित्र कसे कळणार? ते स्वत: गोष्टीवार्ता न करता आम्हापाशी तुम्हाला कशाला धाडतात? त्यांची करणी त्यांनाच ठाऊक. त्यांचे वागणे (वृत्ती) माणसाचे (मानवी) नव्हे (देवासारखे आहे). आता ओघाने एक चांगली गोष्ट आठवली आहे. तर काहीतरी गोष्टी करून वेळ साजरी करू या. आमच्या प्रत्यक्ष दृष्टीसमोर घडलेला प्रकार मी कथन करतो. ज्याच्या मनात जसा निश्चय असेल, तसा बाबा पार पाडीत असत. परंतु कधीकधी ते माणसाचा फार अंत पहात असत आणि भक्ताच्या भक्तीची व प्रेमाची परीक्षा घेतल्यावरच (कसास लाविती) उपदेश देत असत." 'उपदेश' हा शब्द कानी पडताच मला साठ्यांच्या गुरुचरित्राची गोष्ट आठवली आणि जणूकाय माझ्या चित्तात एकदम वीजच (सकृत्+दर्शनी विद्युल्लता) चमकली. शाम्याकडे मला पाठविण्याची बाबांची ही योजना मशिदीतील माझ्या चंचल मनाला स्थिर करण्यासाठी तर नसेल ना! बाबांची करणी विलक्षण (अघटित घटना) असते. असो. ही जी वृत्ती उठली ती मी मनात तशीच दाबून ठेवली. कथा ऐकण्याची इच्छा (आर्ती) दुप्पट वाढली (दुणावली) आणि ती पुरविण्याचा मी निश्चय केला. मग बाबांच्या थोड्या थोड्या गोष्टी सुरू झाल्या आणि त्यांची भक्तवत्सलता पाहून मनाला आनंद वाटू लागला. (ओ. ११२-१३४)

नंतर शामरावांनी आणखी एक कथा सांगितली. ते म्हणाले, "एक देशमुखीण होती. तिच्या मनात आले की संतांची भेट घ्यावी. साईबाबांची कीर्ती ऐकून संगमनेरच्या लोकांबरोबर ती बाई बाबांच्या दर्शनाच्या ओढीने शिरडीला आली. खाशाबा देशमुखाची ती आई होती. राधाबाई तिचे नाव होते. साईबाबांच्या चरणी निष्ठा धरून तिने त्यांचे दर्शन घेतले. दर्शन यथास्थित झाले. वाटेचा थकवा (शीणभाग) गेला आणि श्रींच्या पायी प्रेम (अनुराग) जडले. तिला आपल्या उद्दिष्टाची (कार्यभाग) आठवण झाली. तिच्या मनाची तीव्र इच्छा होती की साईसमर्थांना गुरु करावे, म्हणजे ते योग्य (यथार्थ) उपदेश करतील आणि आपला परमार्थ साधला जाईल. बाई वयाने म्हातारी होती आणि तिची बाबांवर अत्यंत निष्ठा होती. बाबांकडून काहीतरी उपदेश घ्यावा, असा तिने मनात ठाम निश्चय केला. जोपर्यंत बाबा माझ्यावर कृपा करून एखादा स्वतंत्र कानमंत्र मला देत नाहीत तोपर्यंत शिरडी सोडून दुसऱ्या ठिकाणी जावयाचे नाही, असे तिने ठरविले. श्री साईबाबांच्याच तोंडचा मंत्र घ्यावयाचा. इतर ठिकाणचा घेतला तर तो पवित्र नव्हे. श्री साईबाबा पुण्यकारक महान संत (पवित्र संत+अग्रणी) आहेत. तेच मजवर अनुग्रह (कृपा) करोत, असा अंत:करणात दृढ निश्चय करून त्या बाईने खाणेपिणे वर्ज्य केले आणि धरणे धरून (हट्ट करून) बसली. आधीच ती वयाने म्हातारी, पोटात तीळभरही अन्न नाही आणि घोटभर पाणीही नाही. उपदेशावर श्रद्धा भारी. म्हातारी तीन दिवस रात्रंदिवस उपाशी राहिली. जोपर्यंत बाबा उपदेश देणार नाहीत, तोपर्यंत तिने अन्नपाण्यावाचून व्रतस्थ (प्रयोपवेशी) राहण्याचे ठरविले. मंत्राचा उपदेश घेतल्याशिवाय शिरडीचे जाणे-येणे काय कामाचे? मुक्कामावर उतरल्या जागी तिने धरणे घेतले आणि कठीण प्रसंग (निर्वाण) उभा केला. अन्न-पान सोडले व तीन दिवस तप केले आणि ती देशमुखीण थकून अगदी उदास (निराश) झाली. माधवरावांना विचार पडला की हा प्रकार बरा (भला) नव्हे. या नशीबाला (भवितव्याला) काय म्हणावे? म्हातारी तर मरणाला भीत नाही! मग ते मशिदीत बाबांपाशी जाऊन बसले आणि बाबा त्यांना नित्याप्रमाणे काळजीने (आदराने) कुशल वृत्त विचारू लागले, "शामा! आज काय विचार आहे? खबर (समाचार) सर्व ठीक आहे ना? तो नारायण तेली (हा शब्द एखाद्या अंत:स्थ दुष्ट वृत्तीला अनुलक्षून वरचेवर बाबा म्हणत असत.) फार बहकला (चळला) आहे आणि मला अतिशय छळत आहे (गांजी अनिवार मजलागी)." आधीच म्हातारीचा निर्धार पाहून शामा दु:खी होता. त्याने बाबांना लगेच विचारले की आता खरोखर कसे काय करावे? "हे काय देवा गौडबंगाल (गूढ चमत्कार)? (गौड व बंगाल हे दोन देश जादूविद्या व नजरबंदीकरिता प्रसिद्ध आहेत.) तुमचा खेळ दुसऱ्यांना कळत नाही. एकेक माणसे गावात तू आणतोस आणि त्यांची खबर आम्हाला विचारतोस. ती बरेच वय असलेली देशमुखीण तुझ्यापाशी हेतु (हेत) धरून तीन दिवस अन्नपाण्यावाचून उपाशी राहिली आहे. ती म्हातारी फार हट्टी आहे. तुझ्यापायी तिची निष्ठा पक्की (कट्टी) आहे. तू तर तिच्याकडे ढुंकूनही पाहत नाहीस. तिला उगीच कष्टी का करतोस? आधीच ती वाळलेली लुकडी बाई (शुष्क काष्ट), हट्टी (दुराग्रही) आणि महाखाष्ट (समजूत पडण्यास कठीण), अन्नाशिवाय तिचे प्राणच नष्ट होतील, असे स्पष्ट मला वाटते. लोक म्हणतील, 'म्हातारी उपदेशाची इच्छा घेऊन दर्शनाला गेली, पण साईबाबांना दया आली नाही आणि तिला मरणाच्या स्वाधीन केले.' बाबा! असा दोषारोप (प्रवाद) घडू देऊ नका. तिला तिच्या हिताची गोष्ट (हित+वाद) सांगा, तिच्यावर कृपा (प्रसाद) करा आणि हे अपयश (अप्रमाद) घालवा. म्हातारीच्या अंगात आता शक्ती (त्राण) उरलेली नाही. तिचे प्राण कासावीस होतील आणि ती मरून जाईल व तुम्हाला दुष्कीर्ती (अपशरण) येईल. म्हातारीचे व्रत पुरे होणे फार कठीण (दुर्धर) आहे. आम्हाला मोठी चिंता पडली आहे. दुर्दैवाने म्हातारी मेली तर वाईट (अनुचित) गोष्ट घडेल. म्हातारीने त्रागा मांडला आहे. तिच्यावर तू कृपा, दया केली नाहीस तर तिची मला धडगत (आशा वाटण्यासारखी स्थिती) दिसत नाही. आपल्या तोंडाने तिला काहीतरी सांगा." (ओ. १३५-१६०)

आता अध्यायाची सीमा झाली (मर्यादा संपली). श्रोत्यांची पुढची गोष्ट ऐकण्याची इच्छा पुढच्या अध्यायात भक्तिरसाची जोड मिळून खरोखरी (साचार) पुरी होईल. पुढे बाबांनी प्रेमळपणे त्या म्हातारीला जो उपदेश

(पृष्ठ क्र. ३५ वर)

# क्षेत्रपाल देव



अखिल विश्वब्रह्मांडाचा क्षेत्रपाल देव हा कालपुरुष आहे. यासच महान्काल किंवा महांकाळ असे म्हणतात. अव्याहतपणे चाललेल्या या विश्वसर्जनाच्या सोहळ्याचा एकमेव देव हा जगत: पितरौ या नावाने ओळखला जातो. त्यासच भगवान शिव किंवा शंकर असेही म्हटले जाते. विश्वब्रह्मांडाचे अखंडपणे चाललेले सर्जनत्व हे शिवातून म्हणजे पावित्र्यातून होत असल्याने शिव हा अखिल ब्रह्मांडाचा अधिष्ठाता देव मानला जातो. विश्वसर्जनाच्या मुलगामी विचाराशी मुलत: तीन विचार असतात. (१) परिपूर्ण पावित्र्य (ॲबसोल्यूट प्युरिटी), (२) परिपूर्ण ज्ञान (ॲबसोल्यूट नॉलेज) आणि (३) परिपूर्ण साधनासिद्धि (ॲबसोल्यूट पेनन्स). हे तीनही ज्याच्यात एकत्र आहेत अशा देवास देवांचा देव महादेव असे म्हटले जाते. शिव आणि त्याची शक्ती यांच्या कामकलांमधून विश्वसर्जनाचा निरंतर उत्सव विकसित तथा विलासित होत असतो. अखंडितपणे वर्धमान होणाऱ्या या जीवसृष्टीच्या पवित्र यज्ञात शिवाचे म्हणजे पावित्र्याचे स्थान अनन्यसाधारण असणे साहजिकच आहे. सनातन धर्माच्या विचारपरंपरांमध्ये कमी विकसनशील अवस्थेमधून अधिक विकसनशील अवस्थेकडे विश्वाच्या क्रमविकासाच्या मार्गाने आत्मा किंवा जीव प्रवास करीत असतो. या सनातन सत्याच्या अनुसरणामध्ये पावित्र्यपूर्ण विचारांच्या वृत्तींचा विकास म्हणजेच आत्म्याचा विकास असेही सांगितले आहे. या आत्म्यासच मह, स्व, शारीरिक, हंस, दीप आणि शिव इत्यादी वेगवेगळ्या नावाने संबोधिले गेले आहे.

देव या संकल्पनेचा मूळ विचार तपासीत असता देव हा शब्द मूळ द्यु:। (तेज) या धातुपासून बनलेला आहे. या विश्वब्रह्मांडाची पहिली देवमाता ही आदिती असून पहिला पिता इरावान (इरा म्हणजे पाणी) मेघ असून या मेघाचे अधिष्ठान सूर्यावर अवलंबून असते म्हणून पृथ्वीच्या विचारात सूर्य पिता आणि त्याची राज्ञी म्हणजे पृथ्वीमाता असे मानले जाते. आदिती हीच पृथ्वी आहे. आदिती सा उत्तानपादा मही (दि स्कॅटरर्ड ग्रेट न्यूड–दि अर्थ) या पृथ्वीचे स्त्रीरूपकत्व म्हणजे पृथ्वीचे गर्भाशय हे वारूळाच्या रुपात पूजिले गेले. यासच सांतेरी असेही म्हणतात. वारूळ हे पृथ्वीच्या गर्भाचे प्रतीक तर वारूळस्थ नाग हे पुरुषलिंगाचे प्रतीक अशा परंपरेने महामातेची म्हणजे पृथ्वीची पूजा करणेची प्रथा पृथ्वीवरील सर्वच मानववंश करीत आलेले दिसतात. नंतरच्या काळात निश्चित अशा क्षेत्रपाल देवांची पूजा करण्याची प्रथा आली. क्षेत्र म्हणजे भूमि– तिचे पालन करणारे देव म्हणजे क्षेत्रपाल देव. भारताचा क्षेत्रपाल देव हा भैरवनाथ मानला गेलेला आहे. भैरवनाथ हा नागाच्या रूपात पूजला गेलेला दिसतो आणि भैरवी किंवा पृथ्वी ही महामातेच्या रूपात पूजली गेली आहे. या क्षेत्रपाल देवांचे सामान्यत: दोन भाग होतात. यांना शैव तथा वैष्णव अनुसरण पद्धति असे मानले जाते.

## जोतिबा

**या** क्षेत्रपाल देवाचे मुख्य केंद्र किंवा ठाणे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील वाडी रत्नागिरी (जोतिबाचा डोंगर) या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्रातील नाना जाति-जमातींचा हा कुलदेव आहे. खंडेराय किंवा खंडोबा या प्रमाणेच याची प्रकृति लोकाभिमुख आहे. भारतातील प्रमुख क्षेत्रपाल भैरवनाथ किंवा भैरोबा याचेशी खंडोबा आणि जोतिबा हे जिव्हाळ्याच्या नात्याने निगडीत दिसतात. महाराष्ट्रातील वैष्णवपद्धतिच्या पुरुषदेवांपैकी विठ्ठल किंवा विठोबा आणि व्यंकटेश किंवा व्यंकोबा हे विष्णुरूपाशी निगडीत झालेले दिसतात. वैष्णव विचारसरणीचा मूलगामी धागा हा कर्नाटक तथा आंध्रमधून उदयास आलेला आहे. वैष्णव विचारसरणीबरोबर हे दोनही देव भारतात इतरत्र अधिक प्रगाणात पूजिले गेलेले दिसतात. विठोबा हा कृष्णाच्या बाललीलांवर दावा सांगणारा आहे तर व्यंकटेश विष्णुरूप असल्यामुळे विष्णुरूपावर दावा सांगणारा आहे. बालाजीची पत्नी पद्मावती ही त्याच्या डोंगराखाली येऊन राहिलेली आहे तर विठोबाची पत्नी रक्षमाई किंवा रखमाई ही देखील वेगळ्या मंदिरात राहणारी आहे. भारतातील वेगवेगळ्या धनगरांच्या कथेप्रमाणे विठोबाची पत्नी पदूबाई म्हणजे पद्मावती हिच आहे. असे अनेक बाबतीत समरूप असलेले हे दोन क्षेत्रपाल देव विष्णुरूप झालेले दिसतात.




## शिरडी येथील 'श्री खंडोबा'

खंडोबा आणि जोतिबा हे दोन देव शिवरूप बनण्याच्या प्रयत्नात असूनही आपली मूळ प्रकृति स्वतंत्र सांभाळून आहेत. वेगवेगळ्या माहात्म्य कथांनी यांना शिवावतार बनविण्याचा आटोकाट प्रयत्न करूनही मूर्तीविधानाच्या तथा उपासनेच्या बाबतीत त्यांचे स्वतंत्र अस्तित्त्व सतत जाणवते आहे. या जोतिबासच रवळनाथ असेही म्हटले जाते. दक्षिण किनारपट्टी, कोंकण, गोमंतक येथे हा याच नावाने प्रसिद्ध आहे. खंडोबा, जोतिबा आणि रवळनाथ यांचे प्रकृतिसाम्य एकच दिसते.

### माहात्म्यकथा

केदारमाहात्म्य या नावाने इसवी सनाच्या सहाव्या शतकात संस्कृतात रचिली गेलेली एक मूळ कथा असून हरी गोपाळ अंगापूरकर नामक एका जोतिबा भक्ताने शके १७०१ मध्ये रचलेला ३६ अध्यायांचा एक ओविबद्ध ग्रंथ केदारविजय या नावाचा असून हा आजपर्यंत तीन वेळा प्रकाशित झालेला आहे. (पहा– श्रीकेदारविजय: प्रकाशक– शिवाजीराव आबाजीराव सावंत– श्रीरामतत्त्व प्रकाशन, बेळगाव– तिसरी आवृत्ति– शके १८९३) भविष्योत्तर पुराणातील केदारखंडाच्या आधारे आपण हा ग्रंथ रचित आहोत असे हा ग्रंथकार म्हणतो. मूळ केदारमाहात्म्य देखील याच भविष्योत्तर पुराणावर आधारलेले आहे. या माहात्म्याशिवाय कवच सहस्त्रनामस्तोत्र, अष्टके तथा अन्य स्तोत्रसाहित्यही संस्कृत भाषेत उपलब्ध दिसते. ५०-६० वर्षांपूर्वी श्रीक्षेत्रमाहुली, सातारा येथील श्री. सखारामशास्त्री बापूशास्त्री भागवत यांनी रचलेले संस्कृत भाषेतील श्रीकेदारलिंग मानसपूजा स्तोत्रम् शके १८५७ मध्ये मराठी भाषांतरासह प्रकाशित झाले आहे. मराठी भाषेत अनेक स्तोत्रे, अष्टके, पदे, अभंग, आरत्या आदि उपासनासाहित्य उपलब्ध दिसते. श्री. गणेश तात्याशास्त्री सागावकर यांनी रचलेली ३२ मराठी गेय पदे श्रीकेदारपदरत्नमाला या नावाने शके १८१८ (सन १८९६) मध्ये कोल्हापूरहून प्रकाशित झाली होती. लोकसाहित्याच्या नितांत सुंदर संभारात अनेक स्त्रियांनी रचलेल्या जोतिबाविषयी स्फुट ओव्या जोगवा आदि आढळतात. नाथभुजंग या नावाने रचना करणारा भुजंगनाथ नामक भराडी जातीच्या एका जोतिबा भक्ताने कीर्तनाख्यान रचलेले दिसते. याची अनेक पदेही भराडी तथा धनगर समाजात आजही गायली गेलेली दिसतात. केदारविजय या ओविबद्ध मराठी रचनेत तथा केदारमाहात्म्य या मूळ संस्कृत रचनेत अशी कथा आहे– उत्तरेतील हिमालयात बद्रीकेदार या क्षेत्री आचार्य पौगंड ऋषी आणि त्यांची पत्नी विमलांबुजादेवी हे दांपत्य पुत्रप्राप्तीसाठी तप करीत होते. त्यांच्या तप:साधनेमधून केदार रवळेश्वर नामक पुत्र जन्मला. हिमालयातील बद्रीविशालाचाच हा अंश असल्याने याला केदार, केदारनाथ, केदारेश्वर, केदारलिंग, केदारज्योति अशी नावे मिळाली. हा मुलत: ज्योतिरूप असल्याने याला ज्योतिर्लिंग असेही म्हटले गेले. याचेच जोतिबा असे लौकिक नाव रूढ झाले. रवळेश्वर किंवा रवळनाथ या नावाचे कारण तो आचार्य जमदग्नि ऋषींच्या रवाग्निचा म्हणजे क्रोधाग्निचा अंश आहे. रेणुकावधानंतर जमदग्निने त्यागिलेला क्रोध परशूराम, नवनारायण, समुद्र, अरण्य तथा अन्य यांनी वाटून घेतला होता. नवनारायणांकडे आलेला क्रोध म्हणजे अग्निस्फुल्लिंगे एकत्रित येऊन जोतिर्लिंग जन्मास आला. रवाग्निपासून जन्मला म्हणून त्यास रवळेश्वर असे म्हणतात. अशाप्रकारे प्रगटलेला हा हिमकेदार करवीरनिवासिनी महालक्ष्मी किंवा अंबाबाई हिच्या आग्रहाने दक्षिणेत आला. म्हणून त्यास दक्षिणकेदार असेही म्हणतात. कोल्हासूराच्या उत्पातामुळे करवीर नगरातून बहिष्कृत झालेली लक्ष्मी त्या नगरीत पुन: प्रतिष्ठित करण्याचे महत्कार्य दक्षिणकेदाराने स्वीकारले. कोल्हासूराच्या सहाय्याला रत्नासूर, रक्तभोज, महिषासूर इत्यादि अनेक बलाढ्य दैत्य होते, तर केदारनाथाच्या सहाय्याला सिद्ध, भैरव, मातृका चर्पटांबा (चोपडाई), महालक्ष्मी आणि यमाई या शक्तिदेवता होत्या. केदारनाथ अश्वारूढ झाला आणि कोल्हासूर, रत्नासूर आदि दैत्यांचा तथा त्यांच्या सैन्याचा धुव्वा उडवला. रत्नासूर जेथे पडला त्या पर्वतास रत्नागिरी असे नाम मिळाले आणि कोल्हासूर जेथे पडला ते स्थान कोल्हापूर बनले. माता लक्ष्मी किंवा महालक्ष्मी (अंबाबाई) ही पुन्हा कोल्हापूरात प्रतिष्ठित झाली आणि तिच्या आग्रहाने केदारनाथ किंवा जोतिर्लिंग रत्नागिरीवर विसावला. जोतिबाचे हे स्थान पन्हाळगड, पावनगड आदि दूर्गांनी वेढलेल्या सह्याद्रिच्या एका फाट्यावर असून कोल्हापूरापासून वायव्येकडे १२ मैल हे स्थान आहे. याची समुद्रसपाटीपासून उंची ३१०० फूट आहे. या डोंगरावर दोन मैल परिघाचे पठार आहे. या डोंगराच्या पूर्वेस दोन मैल अंतरावर इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात खोदलेली महायान बौद्ध लेणी पोहाळा या गावी आहेत.

या रत्नागिरीवर जोतिर्लिंग, केदारेश्वर तथा चर्पटांबा (चोपडाई देवी) या तीन देवतांच्या मंदिरांचा मुख्य गट आहे. पुरातन स्थानाच्या जागी आजचे केदारलिंगाचे मंदिर इसवी सन १७३० मध्ये राणोजीराव शिंदे यांनी बांधले. केदारेश्वराचे मंदिर इसवी सन १८०८ मध्ये दौलतराव शिंदे यांनी बांधले. चोपडांबाचे मंदिर इसवी सन १७५० मध्ये प्रीतीराव चव्हाण, हिम्मतबहादूर यांनी बांधले. देवालयाचे आवार पूर्वपश्चिम २३४ फूट आणि दक्षिणोत्तर २७० फूट बांधलेले असून त्यात सर्व बाजूंनी ओवऱ्या बांधलेल्या आहेत. या आवारात प्रवेश करण्यासाठी

तीन महाद्वारे आहेत. पश्चिम द्वाराच्या उत्तरेकडील भिंतीवर ३२ ओळींचा एक संस्कृत शिलालेख आहे. यानंतरचे ४ थे मंदिर रामेश्वराचे असून ते १७८० मध्ये मालोजीराव निकम पन्हाळकर यांनी बांधले. जोतिबाच्या उत्तरेकडे दोन फर्लांग अंतरावर यमाई देवीचे मंदिर आहे. हे मंदिरही शिंदयांनीच बांधले आहे. जोतिबाच्या दक्षिण दरवाजानजिक २५ ते ३० फूट अंतरावर तांत्रिक बगाड विधीचा चौथरा आहे. या चौथऱ्यावरील पाच फूट उंचीच्या षटकोनी स्तंभावर सातवे नामक गावातील पाटलांना बगाडाचा मान मिळाल्याची नोंद कोरलेली आहे. या व्यतिरिक्त डोंगरावर मुख्य देवालयाच्या आवाराबाहेर पूर्वेकडे षष्ठी (सटवाई) देवीचे ठाणे आहे. पश्चिमेकडे दत्तात्रेय व रामलिंग यांचे स्थान आहे. इतरत्र तुकाई, मंगळाई, महिषमर्दिनी, बालभैरव, कालभैरव, तोरणभैरव इत्यादि परिवार देवताही दिसतात. डोंगरावर जामदग्नि तीर्थासारखी दहा-पंधरा आणखीही तीर्थे आहेत.

सटवाई किंवा षष्ठी ही दक्षिणेतील क्षेत्रपाल देव स्कंद याची पत्नी म्हणून ओळखली जाते. संतानदात्री तथा प्रसुतिदेवता म्हणून ही ओळखली जाते. रामलिंगाच्या देवळाजवळ रेणुका, परशूराम आणि दत्तात्रेय यांची देवळे दिसतात. महाराष्ट्रातील अनेकविध जातीधर्माचे लोक जोतिबाचे उपासक दिसतात. यात मुसलमान तथा जैन धार्मियांचाही समावेश दिसतो. ग्वाल्हेरचे राजे शिंदे आणि कोल्हापूरचे हिम्मतबहादूर चव्हाण यांचेही हे परंपरागत चालत आलेले कुलदैवत दिसते. कोल्हापूरचे राजाज्ञे हे सरदार घराणे आपल्या मुद्रेवर जोतिबाचे नावही कोरीत असत.

श्री जनोद्धारावतारस्य
रत्नशैल निवासने।
राजारवलनाथस्य भद्रा मुद्रा विराजते॥

अशी ही प्राचीन मुद्रा आहे.

शिंदे आणि चव्हाण या राजघराण्यांनी या देवाच्या नावे शेकडो एकर जमिनींचे उत्पन्न लावून दिलेले दिसते. जोतिबाचे पुजारी गुरव आहेत. सेवकवर्गात कामगार, कारकून, नाईक, शिपाई, सोवळेकरी, कामाठी, मोलद्दार, समईवाला, झांजवाला, झिलवाला, पूजक, फुलारी, जामदार, चोपदार, भोई, हौरी, पानकर, डोली, कर्णेकरी, दिवट्या, गारदीवाला, आयनेवाला, शिंपी, परीट, सोनार, तांबट आदिंचा समावेश होतो. येथील उत्सवात गुलाल आणि खारीक खोबरे यांना विशेष महत्त्व दिसते. चैत्री पौर्णिमेच्या उत्सवात दुपारी बारा वाजता जोतिबाची पालखी सजते. या पालखीत देवाची उत्सवमूर्ती ठेवली जाते. वादक आणि मानकऱ्यांच्या तांड्यासह ही पालखी वाजतगाजत, गुलाल खारीक खोबऱ्याची उधळण होत 'जोतिबाच्या नावानं चांगभलं' असा गजर करीत दुपारी तीनच्या सुमारास यमाई देवीच्या मंदिरासमोर येते. मग पालखी यमाई देवीच्या समोरील सदरेवर ठेवली जाते. जोतिबा आपल्याशी लग्न लावण्यासाठी आला आहे असे समजताच यमाईच्या मंदिराची दारे बंद होतात. नंतर देवीपुढे खंजीर ठेऊन लग्नविधी पार पाडला जातो. मूळ माहात्म्यकथेनुसार या जोतिबाचे केदारनाथ नामक शिवस्थानाशी नाते असले तरी प्रत्यक्षात त्याचे लौकिक स्वरूप भिन्न असून ते जसेच्या तसे टिकून आहे. येथे श्रावण शुक्ल पंचमीला म्हणजे नागपंचमीला विशेष मोठा उत्सव असतो. जोतिबाशी नागाचे काय नाते असावे– केदारस्तवराज, केदारकवच आणि केदारसहस्त्रनामस्तोत्र आणि रवळनाथस्तवराजा या चार रचनांच्या प्रारंभी रवळनाथाचे वर्णन असे येते– 'खड्ग, त्रिशूल, डमरू आणि पानपात्र ही आयुधे आपल्या चार हातात धारण करणारा, रत्नागिरीचे भूषण असलेला, युद्धदीक्षा घेतलेला, अश्वावर आरूढ झालेला, दैत्यांचा नाश करणारा अशा या कुलदेवतेचे मी सतत स्मरण करून त्यास नमस्कार करतो.' केदारकवचाचे आरंभी– 'केयुरादि रत्नमय अलंकार, नाना प्रकारचे सर्पयुक्त हार, सुवर्णवस्त्रांनी सुशोभित, हाती खड्ग, पानपात्र, डमरू आणि त्रिशूल धारण करणारा, अश्वावर आरूढ होऊन दैत्यांचा संहार करणारा केदारेश्वर मला सद्बुद्धि देवो.' स्तवराजामध्ये– 'ज्याच्या डाव्या दोन हातात पानपात्र आणि त्रिशूल, उजव्या दोन हातात डमरू आणि खड्ग, जो शेषावर आरूढ झाला आहे अशा लिंगभूषीत, जोतिरूप, कृपाळू देवाला मी हा भक्त वंदन करतो आहे.' अशा तऱ्हेचे वर्णन दिसते.

'जोतिर्लिंग' हा शब्द दोन पद्धतिंने लिहिला जातो. एक ज्योतिर्लिंग तथा जोतलिंग. जोत म्हणजे नांगर. मूळ संस्कृत शब्द योक्त्रम. याचेच अपभ्रंश रूप लांगल. त्याचे प्राकृत रुप नांगर. म्हणजे नांगराचा देव आणि ज्योतिचा देव अशा दोनही पद्धतिने जोतिबाचा संबंध येतो. जोताचा म्हणजे शेतकऱ्याचा हा देव जोतिबा किंवा जोतबा म्हणजे नांगर हा शेतकऱ्याचा मूळ कुलदैवत मानला गेला आहे. मागे आपण पाहिले की जोतिबा हा शिंदे आणि चव्हाण या दोन सरदार घराण्यांचा कुलदेव आहे. शिंदे या आडनावाच्या घराण्याचा कुलस्वामी जोत किंवा ज्योत असून यांचे देवक समुद्रवेल आहे. शिंदे हे नाव दहाव्या शतकातील शिलालेखात दिसते. त्यावेळी या नावाचा संबंध सिंधु नदीशी लावलेला दिसतो. असा उल्लेख कऱ्हाड येथील शिंदयांच्या कोरीव लेखात आलेला दिसतो. सिंध प्रांतात असलेल्या अनेक लोकांचा कुलदेव जोत किंवा ज्योति असे दिसतात. जोतिबाच्या यात्रेत 'चांग भला' असा घोष करतात. 'चांग भला' हा शब्द चंगा भला म्हणजे धष्टपुष्ट, बरा असलेला, 'कसे काय बरे आहे ना' अशा अर्थीही वापरला जातो. महाराष्ट्रात जसे एकमेकांना रामराम केले जाते तसेच सिंधु नदीच्या तीरावर दोन व्यक्ति एकमेकांस भेटल्यानंतर 'चंगा भला' असे अभिवादन करतात. समुद्रवेल नावाची एक वनस्पती असून ही वेल समुद्राच्या पाण्याच्या भरतीची हद्द दाखविते. शिंदे घराणे किनाऱ्यावर आल्यानंतर तेथील समुद्रवेल या वनस्पतीची पाने घेऊन त्याची त्यांनी पूजा केली. शिंदे हे मुलत: महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर आले आणि त्यानंतर त्यांनी कऱ्हाड प्रांतात आपले राज्य स्थापले. आता ज्यास ज्योत म्हणून आपण ओळखतो ती मुलत: एक पेटलेली पणती होती. भारताच्या वायव्येकडील तथा उत्तरेकडील बहुतेक सर्व भागात असलेल्या देवळांमध्ये पूर्वी मूर्तीची पूजा होत नव्हती. ज्वालेची किंवा ज्योतिची पूजा होत असे.

तेथील भागात एक दीप अखंडपणे जळत असतो. त्या त्या भागातील ग्रामसंघटना या दिव्याच्या तेलाची व्यवस्था करीत असतात. म्हणून मुलत: ज्योति आहे लिंग (रूप) जिचे अशी देवता म्हणजे ज्योतिर्लिंग अशाही संज्ञेने ओळखले जाते. चव्हाणांचे मूळ कुलदैवत ज्वालामुखी आहे. देवघाटी, कांगडा आदि भागातून, उत्तरेकडून हे चव्हाण घराणे महाराष्ट्रात आलेले दिसते. आपल्याबरोबर दिपज्योति उपासनेसाठी ते इकडे घेऊन आले. म्हणून एकूण असे – की ज्योति म्हणजे अग्नि ही वेदकाळातील मूळ देवता – याचे उत्पत्तिस्थान हिमालयातील कांगडा जिल्ह्यातील ज्वालामुखी देवी. येथील क्षत्रिय वंश सिंध प्रांतात गेला. सिंध प्रांतातून त्यांच्या वंशजांबरोबर पश्चिम किनाऱ्यावर असा प्रवास करीत त्यांच्या वंशजांबरोबर हा अग्निदेव किंवा दिपज्योति महाराष्ट्रात आली. पुढील काळात मूर्तीपूजेसाठी मूर्ती स्थापना झाली आणि नंतर या ज्योतिस अखंड तेवणाऱ्या नंदादीपाचे स्थान मिळाले. ही ज्योत स्त्री किंवा पुरुषदेवता यांच्याही मंदिरात सतत वापरली गेली. आजचे जोतिबाचे मंदिर आणि जामदग्नि तीर्थ यांची बांधणी राणोजीराव शिंद्यांनी केली आणि केदारेश्वराचे मंदिर दौलतराव शिंद्यांनी बांधले. या दोहोंनी शेकडो एकराच्या जमिनीही दान दिलेल्या आहेत.

शिंदे, सिंद किंवा सिंधीया उपनामक एक घराणे वाडी रत्नागिरीच्या परिसरातील कुंतल देश या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात इसवी सनाच्या आठव्या नवव्या शतकात सामंत राजे म्हणून सत्ता गाजवीत होते – कर्नाटकातील वनवासी संतलिगे या भागात राज्य करणारा ईश्वरदेव नामक एक सिंदवंशीय सामंत राजा (सन ११६५ ते ११७२) आपले वर्णन करहाट पुरवराधिश्वर असे करतो. करहाट किंवा करहाड येथे याचे पूर्वज राज्य करीत असत. दुसऱ्या एका खंडित ताम्रपत्रात भिम राजाचा पौत्र (नातू) तथा सम्राट मुंज राजाचा पुत्र असलेला आदित्यवर्मा नामक एका सिंदवंशीय राजाने जुन्निन नगरात (जुन्नर येथे) स्वत: वास्तव्य करीत असताना पंडित नवशिव नामक एका ब्राह्मणाला दिनांक ६ मार्च ९६५ या दिवशी इंद्रायणी नदीच्या काठी असलेले किन्हई नामक एक गाव दान दिल्याची नोंद आहे. हा आदित्यवर्मा स्वत:स महासामंत म्हणवितो. याने आपल्या पूर्वजांचा उल्लेख केलेला असल्याने हे सिंदवंशी सामंत राजघराणे कुंतल देशात रहात होते असे स्पष्ट होते.

कोल्हापूर येथील आज उपलब्ध असलेले श्रीमहालक्ष्मी मंदिर याचे वास्तूशिल्प पाहिले असता ते शिलाहार घराण्याच्या पूर्वकालीन दिसते. शिलाहार राजघराण्याच्या पूर्वी कुंतल देशात सिंदवंशी सामंत राजघराणे रहात असल्याचे अनेक पुरावे पुराणवस्तूशास्त्रास मिळालेले दिसतात. हे सिंदवंशीय राजपुरुष स्वत:ला फणीन्द्रवंशीय म्हणजे नागवंशात जन्माला आलेले असे म्हणवितात. या सिंदवंशीय किंवा शिंदेवंशीय राजांचे प्रमुख राजचिन्ह नाग हेच आहे. जोतिबाचे आजचे रूप अश्वारुढ असले तरीही त्याचे उपवाहन नाग हेच मानले गेल्याचे दिसते. हा देव वाजीवाहन आणि पन्नगवाहन मानलेला आहे. बऱ्याच वेळेला अनेक स्तोत्रांमध्ये (रवळनाथस्तवराजा) यास कुंडलीन असे म्हटलेले दिसते आणि धरणीधर (पृथ्वी मस्तकांवर धारण करणारा शेष नाग) असे वर्णन दिसते. प्रथम अमानवी रुपात पूजले जाणारे देवदेवता मानवीदेवांच्या आगमनानंतर त्यांच्या वाहनांच्या रूपात पूजले गेलेले सातत्याने जाणवते. वारूळ हे भूमिच्या सर्जनेंद्रियाचे प्रतीक असून नाग हे पुरुषतत्वाचे प्रतीक मानलेले आहे. नाग हा संतानदाता देव मानला असल्यामुळे अनेक जाति-जमातींमध्ये नागयुम्मांची पूजा करीत असतात. काही ठिकाणी वारूळाची पूजा करतात आणि वारूळाची माती प्रसाद म्हणून बरोबर नेतात. आजही खेडोपाडी मुख्य ग्रामदेवतेच्या मंदिराच्या आवारात किंवा झाडाच्या पायथ्याशी दगडावर कोरलेली नागयुग्मे दिसतात. दक्षिणेकडे मुरुगन किंवा कार्तिकेय याचीही पूजा नागाच्या रूपात होते. भैरवनाथ किंवा भैरोबा हा सर्परूप मानला आहे. त्याचे वर्णन सर्पालंकृत आहे. तो अंतरिक्ष नवनागांचा स्वामी आहे तसेच तो भूनागांचाही स्वामी आहे. रवळनाथ हा ही नागरूपातच पूजला जातो. त्याची क्षेत्रपाल देवता सातेरी, संतेरी, शांतलादेवी, शांतम्मा देवी ही वारूळाच्या रूपात पूजली जाते. जेजुरीचा खंडोबा कऱ्हा नदीच्या काठावर असलेल्या वारूळाच्या प्रतीकात बेलभंडाराने पूजला जातो. त्याला आदिमैलार असे म्हणतात. कर्नाटकातील बल्लारी प्रांतात मणिमैलार किंवा मण्णूमैलार या नावानेही खंडोबाची पूजा होत असते. काश्मीर तथा काराकोरम पर्वतराजीच्या भागात शेषनागाचे बोधचिन्ह हे नांगर मानलेले आहे. शेषाचा अवतार समजला जाणारा महाभारतातील बलराम किंवा बलभद्र हा ही हलधर या नावानेच ओळखला गेला आहे.

## रवळनाथ

**वा**रूळ हे पृथ्वीच्या गर्भाशयाचे रूप मानलेले आहे. तसेच वारूळस्थ नाग पुरुषतत्वाचे रूप मानलेले आहे. वारूळ म्हणजेच भूमि. दक्षिण कोकणपट्टी तथा गोमंतक या भागात वारूळाच्या रूपात पृथ्वीमाता सांतेरी या नावाने पूजली जाते. सांतेरी आणि रवळनाथ हे क्षेत्र आणि क्षेत्रपति या स्वरूपात पूजले गेलेले दिसतात. केदारनाथ आणि केदारेश्वर या ज्योतिबाच्या नावातील पूर्वपद हे क्षेत्रवाचक आहे (बद्रीकेदार). तसेच रवळनाथ तथा रवळेश्वर या नावातील पूर्वपदही क्षेत्रवाचकच आहे. ळ आणि ण यांच्या अभेदाने रोयण-रवळ-रवण असा शब्द बनतो. याचा अर्थ वारूळ असाच आहे. काही काही ठिकाणी रवणेश्वर तर काही काही ठिकाणी रवळेश्वर असाही हा शब्द वापरलेला दिसतो. हे दोनही शब्द वारूळाचे (सांतेरीचे) द्योतक असून रवळनाथ हा तिचा नाथ किंवा पति आहे.

महाराष्ट्रातील प्रधान क्षेत्रपाल देव भैरव किंवा भैरवनाथ आणि याची पत्नी योगेश्वरी यांचीही थोडी माहिती घेऊ. भैरवस्तुतिपर संस्कृत वाङ्मयात भैरवास स्कंदबांधव, शेषजा-धव (शेष कन्येचा पति) असे वर्णन दिसते. माता योगेश्वरीच्या आज गायिल्या गेलेल्या आरतीत शेषकन्या म्हणविशी 'तुझी अगाध लिला' असे वर्णन आलेले दिसते. पृथ्वीरूपी मातृशक्तीच्या एकूण चरित्रात पुरुषतत्वाचा स्वीकार ती पिता, पति, बंधु तथा पुत्र या नात्यांनी करते. जोगेश्वरी हे

नाव मूळ योगांबिका (जोगुळांबा), योगेश्वरी (जोगेश्वरी) अशा पद्धतिने उत्पन्न झालेले आहे. या दोन्हींचेही अर्थ संतानदात्रि माता असा आहे.

## म्हस्कोबा (म्हसोबा)

क्षेत्रपाल देवांमध्ये यमाई-ज्योतिबा, सांतेरी-रवळनाथ, महालसा-खंडोबा तसेच योगेश्वरी-भैरव किंवा म्हस्कोबा अशा क्षेत्रपाल देवी-देवतांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. भैरवरूप असलेला म्हस्कोबा किंवा म्हसोबा याचे मुख्य ठाणे पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील वीरगाव किंवा वीर येथे आहे. हा प्रमुखतया भटक्या विमुक्त तथा धनगर जमातींचा देव आहे. यासच वीरोबा किंवा विरोबा असे म्हणतात. श्री म्हस्कोबाचे चरित्र (इसवी सन १८८९) आणि श्रीनाथम्हस्कोबाचे चरित्र (१९३६) अशा याच्या चरित्रकथा आणि गाथा व यांच्या आवृत्त्या दिसतात.

धनगरांच्या एका कथेनुसार वीर गावाचा म्हस्कोबा किंवा श्रीनाथम्हस्कोबा हा मूळचा सोनारीचा भैरवनाथ आहे. कमळाजी नामक एका धनगराचा वाडा (मेंढे व गाईगुरांचा कळप) सोनारीला असताना तो नित्य भैरवाचे दर्शन, पूजन करीत असे. कालांतराने याचा वाडा निरा नदीच्या काठी बोरवनात आला. तरीही तो नित्याच्या पूजेच्या वेळी भैरवाचे ध्यान करायचा आणि ध्यानावस्थेत सोनारीला जाऊन पूजा करून यायचा. तेथील पुजाऱ्यांना या धनगराच्या पूजेचे रहस्य कळेना. त्यांनी हे रहस्य उलगडण्यासाठी सांघिकपणे लक्ष ठेवायचे ठरवले. तेंव्हा भैरवदेवाने कमळाजीला स्वप्नात सांगितले की तू इकडे येऊ नकोस, मीच तुझ्याकडे येतो. तुझ्या वाड्याच्या शेजारी असलेले वठलेले हिवराचे झाड पालवीने बहरले की समज मी तेथे आहे. त्याप्रमाणे एके दिवशी हिवराचे झाड पालवीने बहरले. भैरवनाथ पाच फणांच्या नागरूपाने बोरवनात आला. त्याने एका कुमारी गाईला वेढून आपल्या चार फणांनी तिच्या सडातील दूध प्यांला. नंतर लघुरूप धारण करून कमळाजीच्या घोंगडीचे आसन प्रेमाने स्वीकारले. असा क्रम वर्षभर नित्य चालू राहिला. एके दिवशी कमळाजीच्या वडिलांना हे समजले तेंव्हा ते घाबरले. तेंव्हा देवाने कमळाजीस सुचवले की तू मला जवळपास असलेल्या एकाद्या वारूळात ठेव. त्याप्रमाणे कमळाजीने केले. ते वारूळ ज्याच्या शेतात होते त्याच्या मुलांनी कमळाजीचा विरोध मोडून शेत नांगरीत असताना वारूळही नांगरून काढले. त्यामुळे ती मुले मरून पडली. तो शेतकरी कमळाजीची करूणा भाकू लागला. कमळाजीच्या भक्तिभावाने ती मुले पुन्हा जिवंत झाली. वारूळाच्या ठिकाणचा नांगर उपसून काढताच त्या जागी एका दगडाच्या रूपात देव प्रकट झाला. या दगडास तांदळा असे म्हणतात. आजही या म्हस्कोबाचे प्रतीक हा तांदळाच मानला जातो.

वरील कथेत भैरवनाथ पाच फणांच्या नागाच्या रूपात भक्तांना दर्शन देतो आणि वारूळात आश्रय घेतो. हे बहुतेक सर्व क्षेत्रपाल देवांना अवतरणित असलेले विशेषण ज्योतिबा, रवळनाथ, मुरुग, सुब्रमण्य या क्षेत्रपाल देवांशी साम्य सांगणारे दिसते. जनसामान्यात हा क्षेत्रपाल भैरव सर्पविषहारक मानला जातो. कसाही मोठा सर्पदंश झाला तर त्या मनुष्यास देवळात नेऊन लिंब पाजून श्रीनाथप्रदक्षिणा घातल्या म्हणजे तो मनुष्य बरा होतो ही प्रचिती सुशिक्षितांस अमान्य असली, अंधश्रद्धमूलक वाटली तरीही ही सत्यमूलक असून त्याचे प्रत्यक्ष प्रमाण सत्य दिसते. खानदेशातील अक्राणी महाल तालुक्यातील डोंगराळ भागात जर कोणा धनगरास पान लागले (सर्पदंश झाला) तर वीराच्या दिशेकडे, म्हणजे ज्या बाजूस वीर आहे तिकडे येऊन श्रीनाथाचे नाव घेतात, असाही अनेकांचा नित्याचा अनुभव दिसतो. सर्पविषहारकत्वाप्रमाणे संतानदातृत्वाचे सामर्थ्य या देवाजवळ असल्याची श्रद्धा त्याच्या उपासना क्षेत्रात आजही आढळते. पुणे, नगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, खानदेश, चंद्रपूर, बुलढाणा आदि भागातील भटक्याविमुक्त तथा धनगर समाजातील समाजात अनेकास स्वप्नदीक्षा होऊन त्यांना संतान होत असल्याच्या सत्यकथा आजही गायिल्या गेलेल्या दिसतात. म्हणून यास नौशा देव म्हणजे नवसास पावणारा देव असे म्हटले जाते.

माघ शुद्ध पौर्णिमा ते माघ वद्य दशमी या काळात म्हसोबाची किंवा म्हस्कोबाची जत्रा भरते. या जत्रेत देवाचे जोगेश्वरीशी लग्न लागते. जोगेश्वरी ही शेषकन्या मानली गेली आहे. हजारो भक्त या सोहळ्यात भाग घेतात. गुलाल, खोबऱ्याची मुक्त उधळण होते. 'चांग भले' नादघोष होतो. भक्तांचे अद्भुत पवाड (गीतनाट्य) पहावयास मिळतात. जेजुरीच्या खंडोबाचा किंवा ज्योतिबाचा जसा उत्सव होतो तसाच म्हस्कोबाचाही उत्सव असतो. येथेही देवीच्या सेविका यांना कोल्हाटीण म्हणतात. सतत ९ दिवस नाथाच्या रंगशिलेवर यांचे नृत्य होत असते.

### योगिनी कौलमत

आतापर्यंत चर्चिले गेलेल्या यमाई-ज्योतिबा, सांतेरी-रवळनाथ, म्हाळसा-खंडोबा, योगेश्वरी-विरोबा आदि लोकधर्मातील क्षेत्र आणि क्षेत्रपती युगुले यांना शाक्ततांत्रीयांनी भैरव आणि भैरवी यात परिणत केले आहे. श्रीत्र्यंबकस्तोत्रमाहात्म्यम् (जगदीश्वर शिळा प्रेस, मुंबई, शके १७९४) तथा पद्मपुराणात आलेले संदर्भ पाहता योगिनी कौलमताची एक स्वतंत्र शाखा एक शाक्ततंत्रीय संप्रदाय नाशिक जवळील त्र्यंबक क्षेत्रात नांदणाऱ्या एका लोकदेवीच्या उपासनेतून जन्मास आलेला दिसतो. श्रीत्र्यंबकक्षेत्रमाहात्म्य हे ३४ अध्यायांचे असून त्याची श्लोकसंख्या १७१८ आहे. या स्थलमाहात्म्यात ब्रह्मगिरी आदि पर्वत, गोदावरी आदि पुण्यप्रवाह, त्र्यंबकेश्वर आदि दैवते यांच्या माहात्म्यकथा आणि या स्थानातील सांस्कृतिक घटनांचे तथा स्थित्यंतरांच्या स्मृतीगाथा संकलित केलेल्या दिसतात. या ग्रंथाचा रचनाकाळ निश्चितपणे सांगता येणे शक्य नसले तरीही हा सांस्कृतिक इतिहास निःसंशयपणे इसवी सनाच्या १२ व्या – १३ व्या शतकापूर्वीचा आहे.

या शिवरूप ब्रह्मगिरीचा डावीकडचा फाटा निलगिरी नामक असून हा शिवाचा वामजानु मानला जातो. (अयम् निलगिरीस्तस्य वामजानुः प्रकिर्तीतः। अध्याय ७, श्लोक १) शिवाने आपल्या या वामांकावर निलगिरीवर पार्वतीला हाताने धरून